ISSN 0973-8452

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक


मनुष्याणाम् वृत्तीरर्थः।

# अर्थसंवाद

भारतीय सौर आषाढ - भाद्रपद १९३३

जुलै-सप्टेंबर २०११/खंड ३५, अंक २

- २०१० चा वैश्विक भूक निर्देशांक व भारत
- किमान वेतन व असंरक्षित माथाडी कामगार
- मराठवाड्यातील तेलबिया पिकांची संपादणुक
- आठवडा बाजार - ग्रामीण व्यापाराचे केंद्र
- सुवर्णजयंती शहरी रोजगार योजनेचे मूल्यमापन
- डॉ. सु. गो. भानुशाली: एक व्यासंगी अर्थतज्ज्ञ
- महाराष्ट्राच्या ग्रामीण विकासात ग्रामपंचायतींचे योगदान
- महाराष्ट्राच्या औद्योगिक संरचनेतील संक्रमण
- जागतिक मंदीचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम
- बुलढाणा जिल्ह्यातील विविध योजनांचे विश्लेषण
- ठाणे जिल्ह्यातील आदिवासींचा आर्थिक-सामाजिक अभ्यास
- अर्थ शब्दांची वाट पाहे



लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिध्दये। शोधचर्चाविवादार्थ संवादोऽयं प्रवर्तित:।।

National Research Journal मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

मनुष्याणाम् वृत्तिरर्थ:।

www.marthpari.org

# अर्थसंवाद

जुलै-सप्टेंबर २०११/खंड ३५, अंक २

प्रमुख संपादक
अविनाश रामलाल निकम

सहाय्यक संपादक
शंकर सुदामराव पवार

सल्लागार मंडळ
(२००९-१२)
लालासाहेब घाटगे
मोहन चौधरी
संतोष कदम
शिवाजी अंभोरे

संपादकीय पत्रव्यवहार
डॉ.अविनाश रामलाल निकम
मातृपितृ कृपा,प्लॉट नं.३०,
परिमल कॉलनी,
यशवंत क्लासेसच्या मागे,
शहादा-४२५४०९,
जिल्हा नंदुरबार.
मोबा: ९८२२६६५१४१

*लेखातील मते लेखकांचीच*

## अ नु क्र म


- **अविनाश रामलाल निकम,** शहादा
  संपादकीय संवाद............................................१०५
- **नंदकुमार विश्वनाथ मेटे,** यवतमाळ
  २०१० चा वैश्विक भूक निर्देशांक व भारत.................१०७
- **शेंडगे दत्तात्रय भगवानराव,** सातारा
  किमान वेतन व असंरक्षित माथाडी कामगार.................११८
- **बी.के.शिंदे, एम.एस.साबळे,** परभणी
  मराठवाड्यातील तेलबिया पिकांची संपादणुक...............१३०
- **सुनिता एस. राठोड,** कोल्हापूर
  आठवडा बाजार - ग्रामीण व्यापाराचे केंद्र..................१४०
- **जितेंद्र दगडू तलवारे,** धुळे
  सुवर्णजयंती शहरी रोजगार योजनेचे मूल्यमापन.............१४९
- **बी. आर्. जोशी,** पुणे
  डॉ. सु. गो. भानुशाली: एक व्यासंगी अर्थतज्ज्ञ...............१६२
- **जे. एस. पाटील,** कराड; **बी. जे. कदम,** कापशी
  महाराष्ट्राच्या ग्रामीण विकासात ग्रामपंचायतींचे योगदान......१६४
- **डी.सी.तळुले, एम.एच.शिंदे,** अहमदनगर
  महाराष्ट्राच्या औद्योगिक संरचनेतील संक्रमण..................१७४
- **मुरलीधर पंडीत गायकवाड,** मुरुड जंजिरा
  जागतिक मंदीचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम...........१८६
- **जे. डी. सांगोडे,** अमरावती
  बुलढाणा जिल्ह्यातील विविध योजनांचे विश्लेषण.............१९३
- **जयंवत शंकरराव इंगळे,** सातारा
  ठाणे जिल्ह्यातील आदिवासींचा आर्थिक-सामाजिक अभ्यास...१९८
- **शि. ना. माने,** सातारा
  अर्थ शब्दांची वाट पाहे .......................................२०५

**मराठी अर्थशास्त्र परिषद**

**कार्यकारी मंडळ २०११-१२**

अध्यक्ष

आप्पासाहेब गोविंद पुजारी (मंगळवेढा)

कार्याध्यक्ष

दिलीप खंडेराव पाटील (सांगली)

कार्यवाह खजिनदार

अनिल बाबुराव सूर्यवंशी (बार्शी)

प्रमुख संपादक-अर्थसंवाद

अविनाश रामलाल निकम (शहादा)

विश्वस्त

चारुदत्त गोखले (जळगाव)

ज.फा. पाटील (कोल्हापूर)

मधुकर शिंदे (इस्लामपूर)

सदस्य

रामकृष्ण टाले (नागपूर)

विकास सुकाळे (नांदेड)

ज्ञानोबा मोरे (उस्मानाबाद)

महंमद रफिक मुलाणी (बारामती)

तानाजी भोसले (सांगली)

श्रीरंग मंडले (सिंधुदुर्ग)

श्रीराम जोशी (जळगाव)

सुरेश ढाके (भुसावळ)

हरिहर तिवारी (वाशीम)

हसीम वलांडकर (वाळवा)

बाळासाहेब माने (इस्लामपूर)

विकास सुकाळे (स्थानिक कार्यवाह)



अक्षर रचना:

सुनील भांडारकर, शहादा.

मुद्रणालय:

सातपुडा ऑफसेट, जळगाव.



● कार्यालयीन पत्रव्यवहार:

(आजीव सदस्य नोंदणी, जाहिरात पाठविणे)

मुद्रक-प्रकाशक: अनिल बाबुराव सूर्यवंशी

कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद,

गोदाई, शिवशक्ती मैदानाजवळ, शिवाजीनगर,

बार्शी - ४१३ ४११, जि. सोलापूर.

दूरध्वनी: ०२१८४-२२४२९४,

भ्रमणध्वनी: ८८०५६९१४०६


● वर्गणी:

- परिषदेचे सदस्य:
  - आजीव सदस्य: रु.२०००/- (एकरकमी)
  - साधारण सदस्य: रु.३००/- (वार्षिक)
- संस्था सदस्य व अर्थसंवाद वर्गणीदार:
  - शैक्षणिक संस्था: रु.२५०/-(वार्षिक)
  - व्यावसायिक संस्था:रु.६००/-(त्रैवार्षिक)
  - ग्रंथालये: रु.१०००/-(पंचवार्षिक)
- वर्षगणना: १ एप्रिल ते ३१ मार्च

**हे दर फक्त मार्च २०१२ पर्यंतचे असून नवीन दरासाठी शेवटचे पृष्ठ पहावे.**

- संस्थांना आजीव सभासद होता येत नाही.
- कृपया आजीव सदस्य वर्गणी ***मराठी अर्थशास्त्र परिषद*** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच कार्यवाहांकडे पाठवावी.
- अर्थसंवादची वर्गणी ***मराठी अर्थशास्त्र परिषद*** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच प्रमुख संपादकाकडे पाठवावी.
- मनी ऑर्डर स्विकारली जात नाही.


● अर्थसंवादसाठी अनुदानाबद्दल आभार:

१) भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, दिल्ली

२) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

टिप: म.रा.सा.सं.मंडळाने अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

## संपादकीय संवाद

# यशस्वी अधिवेशन !

मराठी अर्थशास्त्र परिषदेचं पस्तिसावं अधिवेशन नांदेडच्या पीपल्स महाविद्यालयात नुकतंच पार पडलं. अध्यक्षस्थानी डॉ. आ. गो. पुजारी हे होते. सैध्दांतिक, भारतीय अर्थव्यवस्था तसेच महाराष्ट्राची अर्थव्यवस्था या तिनही स्तरावरील विषयांवर अनेक अभ्यासकांनी आपले शोधनिबंध सादर केले.

नांदेड अधिवेशनाने अनेक उच्चांक गाठले आहेत याची चर्चा मनमोकळेपणाने झाली पाहिजे. अधिवेशनात शोध निबंध सादरकर्त्यांची संख्या १२५ च्या वर पोहोचली. सदस्यांनी या अधिवेशनाला मोठ्या संख्येने उपस्थिती दिली. ही संख्या ४३५ च्या वर गेली. सर्वच सत्रांना अभ्यासक श्रोत्यांनी गर्दी केली. एका वेळी दोन ठिकाणी सत्र चालले. याचा फायदा असा झाला की, शोधनिबंध सादरकर्त्यास पुरेसा वेळ देता येणं सूत्रसंचालकांना शक्य झालं. उद्घाटन व समारोप सत्रास खचाखच भरलेला मंडप हे ही नांदेडमध्ये पहायला मिळालं. पत्रकारांचा उत्तम प्रतिसाद हे ही वैशिष्ट्य म्हणावं लागेल. *तुमची परिषद मराठवाडा तसेच महाराष्ट्राच्या विकासासाठी उपयुक्त ठरणार आहे का?* हा एका पत्रकाराने विचारलेला प्रश्न बोलका आहे. या अधिवेशनाची *अर्थविश्व* ही स्मरणिका अतिशय अप्रतिम तयार करण्यात आली. खरंच स्मरणात रहावी, अधिवेशनात येऊ न शकलेल्या सहकारी सदस्यांनी स्मरणिका न विसरता आवर्जून पहावी अशीच तयार झाली आहे. अजून दोन बाबींचा उल्लेख करावाच लागेल. प्रथम म्हणजे सर्वांना राहण्यासाठी केलेली उत्तम व्यवस्था. अधिवेशन यशस्वी करण्यासाठी लागणारं, सर्वात महत्त्वाचं म्हणजे नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांनी सक्षम प्राचार्य डॉ. व्ही. एन्. इंगोले, स्थानिक कार्यवाह डॉ.विकास सुकाळे यांच्या माध्यमातून केलेलं कार्यक्रमाचं उत्तम नियोजन. उत्तम टीम-वर्कचं प्रदर्शन. उपस्थित सर्वांनाच संस्मरणीय

होईल, असेच हे एक यशस्वी अधिवेशन पार पडले. या अधिवेशनात परिषदेच्या वतीने कार्याध्यक्ष डॉ. डी. के. पाटील, कार्यवाह डॉ. अनिल सूर्यवंशी, विश्वस्त प्रा. चारुदत्त गोखले, विश्वस्त डॉ.मधुकर शिंदे तसेच कार्यकारी मंडळ सदस्य यांनी यशस्वितेसाठी प्रयत्न केले.

या अंकात विविध विषयांवरील शोधनिबंधाचा समावेश केला आहे. वैश्विक भूक निर्देशांक, माथाडी कामगारांचे वेतन, मराठवाड्यातील तेलबिया पीक, आठवडा बाजार, सुवर्णजयंती शहरी रोजगार योजना, ग्रामपंचायतींचे आर्थिक योगदान, महाराष्ट्राची औद्योगिक संरचना, राज्यशासन पुरस्कृत विविध योजना यासारख्या विषयांचा समावेश आहे. सद्यस्थितीच्या आर्थिक घडामोडींवर आधारित *जागतिक मंदीला भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम* या लेखाचा समावेश आहे. *अर्थ शब्दांची वाट पाहे* हा नियमित येणारा स्तंभ देखील आहे.

*अर्थसंवाद* चा अंक अधिक चांगला व्हावा यासाठी या अंकात काही बदल केले आहेत. अभ्यासक वाचकांना ते आवडतील अशी अपेक्षा आहे. या अंकामध्ये जाहिरात प्राप्त करून देण्यास परिषदेचे विश्वस्त प्रा. चारुदत्त गोखले, कार्यकारी मंडळ सदस्य व स्थानिक कार्यवाह डॉ.विकास सुकाळे यांचं सहकार्य लाभलं. नांदेड अधिवेशनात *अर्थसंवाद* अंकासाठी जाहिरात मिळविण्याची जबाबदारी कार्यकारी मंडळ सदस्यांवर सोपविण्यात आली. अंकासाठी ते निश्चितच मदत करतील अशी अपेक्षा आहे. जाहिरातीसाठी अंकांना विलंब होऊ नये याची काळजी आपण सर्व घेऊ या! सदर अंकातील सहभागी लेखकांचे आभार. *अर्थसंवाद* चा हा अंक वाचक स्वीकारतील, अशी अपेक्षा आहे.

**- अविनाश रामलाल निकम**

प्रमुख संपादक, 'अर्थसंवाद'

# २०१० चा वैश्विक भूक निर्देशांक व भारत

**नंदकुमार विश्वनाथ मेटे**, यवतमाळ,
सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग,
अमोलकचंद महाविद्यालय.

विकास ही संकल्पना फार गुंतागुंतीची आहे कारण ही एक सापेक्ष संकल्पना आहे. विकासाचा अर्थ नेहमी बदलत असलेला दिसतो. पूर्वी विकास या संकल्पनेचे स्वरुप संख्यात्मक होते आता ते बदलुन गुणात्मक बनलेले आहे. ११ ऑक्टोबर २०१० रोजी वैश्विक भूक निर्देशांक (2010 Global Hunger Index) वॉशिंग्टन स्थित (USA) International Food Policy Research Institute या संस्थेने जर्मनीतील Welt hunger hilfe या ना नफा संस्था व आयरलँड येथील 'Concern Worldwide' या स्वयंसेवी संस्थेने मिळुन १२२ देशाकरिता बनविलेला आहे. निवड केलेली ही सर्व राष्ट्रे एक तर विकसनशील राष्ट्रे आहेत किंवा ही राष्ट्रे विकासाच्या संक्रमणावस्थेत आहेत हा निर्देशांक बनवितांना विकसित राष्ट्रांना यातून वगळण्यात आले आहे कारण मुख्यत: विकसित राष्ट्रातील लोकांचे उत्पन्न हे भरपुर असल्यामुळे तेथे भूकबळी पहावयास मिळत नाही असे अभिप्रेत आहे.

## वैश्विक भूक निर्देशांकाचा उद्देश :

वैश्विक भूक निर्देशांकाचा उद्देश हा भूकेच्या संदर्भात प्रदेशनिहाय (खंड निहाय) व देश निहाय फरकाच्या संदर्भात जागरूकता वाढवणे आणि भूक निवारणासाठी त्वरीत कार्यक्रम आखणे हा आहे.

दैनंदिन जीवनात आपण भूक (Hunger), न्युनपोषण/अवपोषण (Undernutrition) व कुपोषण (Malnutrition) हे शब्द बऱ्याचदा एकाच अर्थाने वापरतो पण त्यात मूलभुत असा फरक आहे.

## भूक (Hunger) :

भूक म्हणजे अन्नाची कमतरता किंवा उणीव होय. अन्न व कृषी संस्थेच्या(FAO) मते कोणत्याही व्यक्तीला सुदृढ व उत्पादक जीवन जगण्यासाठी कमीत कमी उपभोगाद्वारे १८०० किलो उष्मांक (कॅलरीज) मिळणे आवश्यक असते. एखादया व्यक्तीला तितक्या कॅलरीज मिळत नसतील तर तो भुकेला आहे असे समजावे.

**न्युनपोषण/अवपोषण (Undernutrition) :**

न्युनपोषणाचा संबंध उर्जा (engergy), प्रथिने(Protein), पोषक द्रव्य (जीवनसत्त्व) (Vitamins) आणि खनिजद्रव्य (Minerals) यापैकी एकाची किंवा सर्वांची उणिव असण्याशी असतो. न्युनपोषण हा अपुऱ्या अन्नाच्या सेवनाचा परिणाम (संख्यात्मक किंवा गुणात्मक) असतो.

**कुपोषण (Malnutrition) :**

कुपोषणाचा व्यापक अर्थ न्युन पोषणाबरोबरच अधिक पोषणाशीही असतो. म्हणजेच कुपोषण हे न्युनपोषणाबरोबरच अधिक पोषणामुळे देखील होते. अधिक पोषण म्हणजे उपभोगाव्दारे आवश्यकतेपेक्षा जास्त उष्मांक मिळणे होय. थोडक्यात असंतुलित आहारामुळे आरोग्याची स्थिती बिघडुन जाते.

**वैश्विक भूक निर्देशांक तयार करण्याची पध्दत:**

वैश्विक भुकेचे मोजमाप व त्याचा शोध घेण्यासाठी तयार केलेला GHI (Global Hunger Index) हा एक बहुआयामी दृष्टीकोण असुन तो पुढील तीन घटकांना एकत्रित करुन बनविला जातो व या तिन्ही घटकांना समान भारांक दिलेला असतो.

१. एकुण लोकसंख्येपैकी कमी पोसलेल्यांची/ अवपोषित(Undernourished) संख्या

२. पाच वर्षापेक्षा कमी वय असलेल्या मुलांपैकी कमी वजन (Underweight ) असणाऱ्या मुलांची संख्या (वयानुसार वजन नसणे म्हणजे कमी वजन होय) व

३. पाच वर्षापेक्षा कमी वय असलेल्या मुलांमधील मृत्युदर.

वरील तीन घटकांना विचारात घेऊन पाच प्रकारच्या स्थितीपैकी एखादा देश कुठे आहे हे जाणून घेतले जाते.

थोडक्यात GHI बनवत असतांना जे तीन घटक विचारात घेतले जातात त्यांच्या भारांकाची बेरीज जर एखाद्या देशाकरीता ४.९ पेक्षा कमी किंवा ४.९ असेल तर त्या देशात भुकेची तीव्रता कमी

**तक्ता क्र. १**
**भुकेच्या स्थितीचे वर्गीकरण**

| स्थिती | गुण (Score) |
|---|---|
| कमी (Low) | ≤ ४.९ |
| साधारण (Moderate) | ५.०-९.९ |
| गंभीर (Serious) | १०.००-१९.९ |
| धोक्याची स्थिती (Alarming ) | २०.००-२९.९ |
| भयावह धोक्याची स्थिती (Extremely alarming) | ≥३०.० |

आहे असे म्हटल जाते. याउलट जर तिनही घटकांच्या भारांकाची बेरीज ३० पेक्षा जास्त किंवा ३० असेल तर त्या देशात भुकेची स्थिती ही अतिशय धोक्याची आहे असे म्हटले जाते. ० किंवा १०० गुण हे अवास्तव समजले जात असल्यामुळे केवळ वरील पाचच शक्यता विचारात घेतल्या जातात. एखाद्या राष्ट्राला ० गुण मिळाले (तीन घटक विचारात घेऊन) तर त्याचा अर्थ असा होतो की , त्या देशात एकही व्यक्ती भुकेलेली नाही व जर एखादया राष्ट्राला १०० गुण मिळाले तर त्या राष्ट्रातील सर्वच व्यक्ती हया भुकेलेल्या आहेत असा होतो. परंतु अशा दोनही प्रकारच्या स्थिती जगातल्या कुठल्याच देशात पाहावयास मिळत नाही.

पुढील तक्त्यात १९९० व २०१० चा देश निहाय वैश्विक भूक निर्देशांक व गुण

**तक्ता क्र. २**
**देशनिहाय व वर्ष निहाय भुक निर्देशांक व त्यात झालेला बदल**

| स्थान | देश | १९९० | २०१० |
|---|---|---|---|
| १ | सिरीयन अरब रिपब्लीक | ७.३ | ५.२ |
| ४ | कोलंबिया | ९.१ | ५.७ |
| ५ | मोरोक्को | ७.३ | ५.८ |
| ९ | चीन | ११.६ | ६.० |
| १४ | पेरू | १५.० | ६.९ |
| १५ | उझबेकिस्तान | - | ७.१ |
| १६ | एक्वाडॉर | १२.९ | ७.२ |
| २२ | थायलंड | १६.५ | ८.५ |
| २५ | निकाराग्वा | २३.४ | ९.९ |
| २६ | घाना | २३.४ | १०.० |
| २९ | व्हियेतनाम | २४.८ | ११.५ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३४ | फिलिपिन्स | १९.० | १३.० |
| ३६ | इंडोनेशिया | १९.५ | १३.२ |
| ३७ | नामिबिया | १९.२ | १३.६ |
| ३९ | श्रीलंका | २१.१ | १४.५ |
| ४० | युगांडा | १९.१ | १५.० |
| ४१ | कॉंगो रिपब्लिक | २२.४ | १५.२ |
| ४७ | नायजीरिया | २४.४ | १७.८ |
| ५० | म्यानमार | २९.५ | १८.८ |
| ५२ | पाकिस्तान | २४.७ | १९.१ |
| ५४ | उत्तर कोरिया | १६.२ | १९.४ |
| ५५ | केनिया | २०.३ | १९.८ |
| ५६ | नेपाळ | २७.५ | २०.० |
| ५८ | कंबोडिया | ३१.५ | २०.९ |
| ५८ | सुदान | २६.४ | २०.९ |
| ५८ | झिम्बाब्वे | १८.६ | २०.९ |
| ६७ | भारत | ३१.७ | २४.१ |
| ६८ | बांग्लादेश | ३५.८ | २४.२ |
| ६९ | लाइबीरिया | २२.९ | २४.३ |
| ७० | झांबिया | २५.६ | २४.९ |
| ८० | इथियोपिया | ४३.७ | २९.८ |
| ८१ | चाड | ३७.६ | ३०.९ |
| ८२ | एरिट्रिया | - | ३५.७ |
| ८३ | बुरूंडी | ३१.८ | ३८.३ |
| ८४ | कॉंगो डमो. रिपब्लिक | २४.७ | ४१.० |

दर्शविलेले आहेत त्यावरुन आपणास १९९० च्या तुलनेत २०१० मध्ये त्या देशांच्या भुकेच्या स्थितीत किती बदल झालेला आहे हे समजुन येते. (वरील तक्त्यात सर्वच राष्ट्रे घेतलेली नाहीत.)

**जागतिक, प्रादेशिक व राष्ट्रीय प्रवृत्ती :**

१. १९९० च्या वैश्विक भूक निर्देशांकाच्या (GHI) तुलनेत २०१० च्या वैश्विक भूक निर्देशांकात थोडी सुधारणा झालेली दिसते. १९९० मध्ये (GHI) हा १९.८ होता तो घटून २०१० मध्ये १५.१ झाला.

२. पाच वर्षापेक्षा कमी वय असलेल्या कमी वजनाच्या मुलांची संख्या २.६ नी घटलेली दिसते.

३. जागतिक अन्न व कृषी संस्थेच्या मते (FAO) २००९ मध्ये एकुण एक बिलीयन लोक हे भुकेलेले होते. त्यात आता घट होऊन ती संख्या ९२५ मिलीयन झाली आहे.

४. सर्वात जास्त प्रादेशिक (GHI) हा दक्षिण आशियाचा असुन तो २२.९ आहे. त्या खालोखाल सब-सहारन आफ्रिकेचा(२१.७) आहे. परंतु १९९० च्या तुलनेत दक्षिण आशियाने चांगली प्रगती केलेली दिसते.

५. दक्षिण आशिया हे सर्वात जास्त गरीब राहणाऱ्या लोकांचे घर आहे म्हणजेच दक्षिण आशियामध्ये सर्वात जास्त लोक गरीब आहेत.

६. सर्वेक्षित एकुण १२२ देशांपैकी २९ देश हे धोक्याच्या स्थितीत (Alarming) किंवा अतिशय धोक्याच्या स्थितीत (Extremely Alarming) आहेत. सब-सहारन आफ्रिकेतील बुरूंडी, चाड, द डेमोक्रॅटिक रिपब्लिक ऑफ काँगो व एरिट्रिया ही राष्ट्रे अतिशय धोक्याच्या स्थितीत असलेली दिसतात.

जगातील काही राष्ट्रे भूकबळीच्या संदर्भात साधारण स्थितीत किंवा अतिशय धोक्याच्या स्थितीत असु शकतात. जसे अफगाणिस्तान, इराक, सोमालिया व पापुआ - न्यूगिनी परंतु अपुऱ्या माहितीच्या उपलब्धतेमुळे २०१० मध्ये त्यांच्याकरिता भूक निर्देशांक (GHI) बनवला गेला नाही.

**गरिबी व भूक यातील संबंध :**

गरिबी व भूक यात अगदी जवळचा सहसंबंध असतो जर गरिबी मध्ये घट झाली तर भुकेलेल्यांची संख्या कमी होते. कल्याणकारी राज्याचा एक भाग म्हणून आज जगातील प्रत्येक राष्ट्र (मग ते भांडवलशाही समाजवादी, मिश्र अर्थव्यवस्था, हुकुमशाही, राजेशाही इ.) गरिबी निर्मुलनाचा प्रयत्न करीत असलेले दिसतात. त्यातही अशी राष्ट्रे जे विकासाच्या संक्रमणावस्थेत आहेत. परंतु २०१० च्या GHI नुसार या बाबत देखील प्रादेशिक निहाय फरक असलेला दिसतो.

१. दक्षिणआशिया मध्ये गरिबीत ८% नी घट झाली त्याचा परिणाम म्हणुन तेथील GHI फक्त ३ % ने घटला.

२. लॅटीन अमेरिका किंवा कॅरेबियन राष्ट्रांमधील गरिबीत १ % घट झालेली असतांना तेथील GHI मध्ये मात्र ३.५ % ने घट झाली.

१९९० च्या तुलनेत २०१० मध्ये GHI मध्ये झालेली घट सब-सहारन अफ्रिकेत १४% होती. दक्षिण आशियामध्ये २५% तर पुर्व आणि उत्तर आफ्रिकेच्या जवळील देशामध्ये ३३% होतो.

दक्षिण आशिया व सब-सहारन आफ्रिकेमध्ये भुकेसाठी जबाबदार असणारी कारणे मात्र पूर्णपणे वेगवेगळी असलेली दिसतात. २०१० च्या GHI मध्ये दक्षिण आशियासाठी भुकेसाठी जबाबदार कारणे सांगत असतांना त्यात कमी पौष्टिक आहार, शैक्षणिक मागासलेपणा व स्त्रियांचे समाजामधील असणारे दुय्यम स्थान ही प्रमुख कारणे सांगितली आहेत.

तर सब-सहारन आफ्रिकेमध्ये कमी प्रभावशील सरकार, संघर्ष, राजकीय अस्थिरता व एच.आय.व्ही. व एड्स् सारख्या रोगांचा उच्च दर ही कारणे सांगितली आहेत.

**विजयी राष्ट्रे (यशस्वी राष्ट्रे) :**

२०१० च्या GHI नुसार पुढील तक्त्यात दर्शविलेल्या राष्ट्रांनी १९९० च्या तुलनेत त्यांच्या भूक निर्देशांकात(HI) केलेली घट प्रतिशतमध्ये दर्शविली असुन तो त्यांच्या HI मधील सकारात्मक बदल दर्शवितो जो उल्लेखनीय आहे. उदा.१९९० च्या तुलनेत २०१० मध्ये पेरू या राष्ट्राच्या HI मध्ये -५४ ने घट झालेली आहे.

**तक्ता क्र. ३**

**भूक निर्देशांकात झालेली घट**

| देश | भूक निर्देशांकातील घट (प्रतिशत मध्ये) |
|---|---|
| पेरू | - ५४ |
| सौदी अरेबिया | - ५५ |
| इराण, इस्लामिक रिपब्लिक | - ५६ |
| घाना | - ५७ |
| निकारग्वा | - ५८ |
| ट्यूनिशिया | - ५८ |
| मेक्सिको | - ६२ |
| तुर्की | - ६२ |
| मलेशिया | - ६३ |
| कुवैत | - ७३ |

**अयशस्वी राष्ट्रे:**

पुढील तक्त्यातील राष्ट्रांनी १९९० च्या तुलनेत २०१० मध्ये त्यांच्या भूक निर्देशांकात(HI) नकारात्मक प्रतिसाद किंवा बदल दर्शविलेला आहे. उदा.१९९० च्या तुलनेत २०१० मध्ये काँगो डेमो. रिपब्लिक या राष्ट्राच्या HI मध्ये +६६ ने वाढ झालेली आहे.

तक्ता क्र. ४

भूक निर्देशांकात झालेली वाढ

| देश | भूक निर्देशांकातील वाढ (प्रतिशत मध्ये) |
|---|---|
| काँगो डेमो. रिपब्लिक | +६६ |
| कॅमरून | + २१ |
| बुरूंडी | + २० |
| उत्तर कोरिया | + २० |
| स्वित्झर्लंड | + १४ |
| झिम्बाब्वे | + १२ |
| गिनी-बिसाऊ | + ८ |
| लाइबीरिया | + ६ |
| झांबिया | +६ |

**धोक्याच्या किंवा अतिशय धोक्याच्या स्थितीतील राष्ट्रे :**

२०१० च्या GHI नुसार धोक्याच्या स्थितीत(Alarming) किंवा अतिशय धोक्याच्या स्थितीत (Extremely Alarming) एकूण १२२ सर्वेक्षित देशांपैकी २९ राष्ट्रे आहेत ते पुढील प्रमाणे आहेत (सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्यात भारत एक आहे. २००९ मध्ये भारताचा HI जो २३.९ होता तो घटण्याऐवजी वाढून २०१० ला २४.१ झालेला दिसतो. आपल्या शेजारील पाकिस्तान हा सन २००८ च्या HI मध्ये धोक्याच्या स्थितीत (२०.० ते २९.९) होता आज तो गंभीर स्थितीत (१०.० ते १९.९) असलेला दिसतो. म्हणजेच त्याने आपल्या HI मध्ये चांगल्या पध्दतीने घट केलेली असुन तो एक सकारात्मक बदल दिसतो.

## तक्ता क्र. ५
## धोक्याच्या किंवा भयावह धोक्याच्या स्थितीतील राष्ट्रे

| स्थान | देश | वैश्विक भूक निर्देशांक | | |
|---|---|---|---|---|
| | | २०१० | २००९ | १९९० |
| १ | काँगो डेमो. रिपब्लिक | ४१.० | ३९.१ | २४.७ |
| २ | बुरूंडी | ३८.३ | ३८.७ | ३१.८ |
| ३ | एरिट्रिया | ३५.७ | ३६.५ | - |
| ४ | चाड | ३०.९ | ३१.३ | ३७.६ |
| ५ | इथियोपिया | २९.८ | ३०.८ | ४३.७ |
| ६ | सिएरा लियोन | २८.९ | ३३.८ | ३२.७ |
| ७ | हैती | २८.० | २८.२ | ३३.५ |
| ८ | कॅमरून | २७.९ | २६.९ | २३.० |
| ९ | . मादागास्कर | २७.५ | २८.३ | २८.१ |
| १० | मध्य अफ्रिका सं.रा. | २७.४ | २८.१ | ३०.० |
| ११ | यमन सं.रा. | २७.३ | २७.० | ३०.१ |
| १२ | अंगोला | २७.२ | २५.३ | ४०.६ |
| १३ | नाइजर | २५.९ | २८.८ | ३६.५ |
| १४ | तिमोर लेस्टे | २५.६ | २५.४ | - |
| १५ | झांबिया | २४.९ | २५.७ | २५.६ |
| १६ | लाइबीरिया | २४.३ | २४.६ | २२.९ |
| १७ | बांग्लादेश | २४.२ | २४.७ | ३५.८ |
| १८ | भारत | २४.१ | २३.९ | ३१.७ |
| १९ | मोझंबिक | २३.७ | २५.३ | ३७.४ |
| २० | जिबूती | २३.५ | २२.९ | ३०.८ |
| २१ | रवांडा | २३.१ | २५.४ | २८.९ |
| २२ | गिनी-बिसाऊ | २२.६ | २३.१ | २०.९ |
| २३ | टोगो | २२.४ | २३.१ | २७.८ |
| २४ | बुर्कीना फासो | २१.१ | २०.४ | २२.७ |
| २५ | कंबोडिया | २०.९ | २१.२ | ३१.५ |
| २६ | झिम्बाब्वे | २०.९ | २१.० | १८.६ |
| २७ | सुदान | २०.९ | १९.६ | २६.४ |
| २८ | टांझानिया | २०.७ | २१.१ | २२.९ |
| २९ | नेपाळ | २०.० | १९.८ | २७.५ |

**भुकेच्या समस्येवर उपाय :**

कोणत्याही देशात भुकेच्या समस्येवर उपाय शोधण्याची व कृती करण्याची जबाबदारी व भूमिका ही त्या देशातील सरकारची असते. सरकारच्या हस्तक्षेपाद्वारे या गंभीर समस्यांची सोडवणूक होण्यास निश्चितच मदत होईल. स्त्रीला तिच्या गर्भावस्थेच्या काळात संतुलित आहार मिळत असल्यास ते बाळ गर्भातच सुदृढ होते व त्या मातेला योग्य तो आहार मिळत नसल्यास बाळ जन्मापासूनच कुपोषित असते. त्यामुळेच स्त्री जेंव्हा माता बनते त्यावेळेस तिला योग्य तो पोषक आहार उपलब्ध करुन दिला पाहीजे, मातांना त्यांच्या लहान मुलांना स्तनपान करण्यासाठी प्रोत्साहित केले गेले पाहिजे व आयोडिनयुक्त मीठ उपलब्ध करुन दिले पाहिजे, त्याच बरोबर मुली व स्त्रियांच्या आरोग्य, आहार व सामाजिक स्थितीमध्ये अनुकूल बदल घडवुन आणला पाहीजे.

मुलीचे अल्पवयात लग्न होणे, दोन मुलांमधील अंतर कमी असणे व माता कुपोषित असल्याने मुलेही कुपोषित होणे अशा प्रकारची पारंपरिक वाढत्या कुपोषणामागची कारणे दिली जातात. त्यावर मात करण्यास मात्र सरकार बहुतांश वेळेस अपयशी ठरल्याचे दिसते. परंतु सरकारने याबाबत प्रभावी धोरण आखून त्याची काटेकोर अंमलबजावणी करत असताना इतर संस्थांचेही सहकार्य घेतले तर भुकेच्या समस्येला नियंत्रित करुन सोडवणुक करणे शक्य होईल.

**काही तथ्य :**

भारतीय प्रशासकीय सेवेतुन (IAS) निवृत्त झालेले अरुण भाटीया जे पुणे येथील आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था (Tribal Research & Traning Institute) चे आयुक्त होते त्यांनी 'Malnutrition- related deaths in tribal children' या नावाने अहवाल लिहिला होता त्यात ते म्हणतात की, "आदिवासींमध्ये असणारा प्रश्न हा आरोग्यविषयक नसून तो आर्थिक आहे. जर आपण त्यांची क्रयशक्ति वाढविली तर(पहा) त्यांच्या आरोग्य स्थितीत नाट्यमय बदल होईल."

१९९२-९३ च्या पहिल्या 'National Family Health Survey' नुसार भारतातील जवळजवळ निम्मी मुले ही कमी पोसलेली (Undernourished) होती.

९ मे २००६ रोजी जागतिक बँकेने भारताच्या संदर्भात 'The Current Malnutrition Crisis in India' नावाचा अहवाल तयार केला होता. त्यात असे म्हटले आहे की, भारतातील जवळजवळ सहा कोटी मुले ही कमी वजनाची (Underweight) असून दोन मुलांपैकी एक मुल हे सहा मोठया राज्यातील आहे. ती सहा राज्ये म्हणजे महाराष्ट्र, ओरिसा, बिहार, मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश व राजस्थान होय.

महाराष्ट्र सरकारने डॉ. बंग यांच्या अध्यक्षतेखाली 'Child Mortality Evaluation Committee' नियुक्त केली होती. त्यात त्यांनी महाराष्ट्रातील बालमृत्यू व कुपोषणासाठी येथील सामाजिक आर्थिक व प्रशासकीय कारणे जबाबदार धरली आहेत. जर येथील खेड्यामध्ये व वस्त्यांच्या (hamlets) ठिकाणी साधी

सार्वजनिक आरोग्य सुविधा पुरविली तर अशा ठिकाणचा बालमृत्यू थांबविला जाऊ शकतो.

कोवळी पानगळमध्ये डॉ.अभय बंग म्हणतात महाराष्ट्रात फक्त वैद्यकीय कारणामुळे जवळजवळ १.२० लक्ष ते १.७५ लक्ष मुले प्रत्येक वर्षी मरण पावतात. पुढे जाऊन त्यांनी असा धोक्याचा इशारा दिला आहे की, जर अधिकारी वर्ग अशा मुलांच्या व्यथा व दुःखा संदर्भात असाच असंवेदनशील राहिला तर येणाऱ्या २० वर्षात येथील ३८ लक्ष मुले मृत्यु पावलेली असतील.

UNICEF ने प्रकाशित केलेल्या आपल्या 'The State of the World's Children २००८' अहवालात Marzi Babille (Head of the Children Health) म्हणतात जगात प्रती तीन सेकंदाला एक मुलगा मृत्यू पावतो. स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळेस भारताच्या स्थूल देशी उत्पादनाचा वृद्धी दर हा २.५% होता. पाठीमागील काही कालावधीपासून भारताच्या विकासाचा दर जो ५.६% च्या दरम्यान होता तो वाढून आज प्रतिवर्ष जवळ-जवळ ८-९% दरम्यान असलेला दिसतो.

११ व्या पंचवार्षिक योजनेमध्ये स्थूल देशी उत्पादनातील वृध्दीच्या दराचे उद्दीष्ट ९% ठेवले आहे. या सर्व चांगल्या गोष्टी होत असतांना आदिवासींमधील भूकबळी व कुपोषणासंदर्भात ओरिसा, महाराष्ट्र, छत्तीसगढ, झारखंड व राजस्थान येथून नेहमी बातम्या येत असलेल्या दिसतात.

१९९०-९२ या दरम्यान कमी पोसलेल्या (Undernourished) बालकांची टक्केवारी २० होती. ती घटून २००४-०६ या दरम्यान १६ झाली. असे असले तरी एकूण कमी पोसलेल्या बालकांची संख्या मात्र वाढलेली आहे.

२००८ च्या GHI नुसार जागतिक स्तरावर अन्नधान्याच्या किंमतीत होणारी वाढ देखील भुकेस जबाबदार ठरत आहे. अन्नधान्याचा उपयोग आज जैव - इंधनाकरिता केला जात आहे. त्यामुळे खाण्यासाठी अन्न अपुरे पडत आहे किंवा त्यामुळे त्याच्या किमतीत वाढ होण्यास मदत होत आहे. (FAO) च्या मते २००६ मध्ये अन्नधान्याच्या किंमतीचा निर्देशांक ९% ने वाढला होता. तो २००७ मध्ये २३ % ने वाढला व मे २००७ ते मे २००८ या कालावधी मध्ये तो ५०% ने वाढला. गव्हाच्या किंमतीत २००३ पासुन दुप्पट वाढ झाली. तर मका व लोणी च्या किंमतीत तिप्पट वाढ झालेली दिसते तर तांदुळाच्या किंमतीत चार पट वाढ झाली होती.

२०१० च्या WHO च्या अहवालानुसार २००५-०६ मध्ये भारतातील पाच वर्षापेक्षा कमी वय असलेल्या मुलांपैकी ४४% मुले ही कमी वजनाची होती. तर २०१० च्या GHI नुसार भारत हा असा देश आहे ज्या ठिकाणी जगातील पाच वर्षापेक्षा कमी वय असणाऱ्या एकुण कमी वजनाच्या मुलांपैकी ४२% मुले ही भारतातील आहेत

नोबल पुरस्कार विजेते व 'बचत गटाच्या माध्यमातून गरिबीमुक्त विश्वाची निर्मिती' चे संस्थापक मोहंमद युनूस म्हणतात, *जगातील एकूण लोकसंख्येपैकी ४०% जनतेच्या हातात*

*१४ % उत्पन्न असलेले दिसते. याचा अर्थ असा निघतो की, ६०% जनता केवळ ६% उत्पन्नावर गुजराण करते. जगातील निम्म्या लोकसंख्येचे दरडोई उत्पन्न केवळ २ डॉलर आहे तर १०० कोटी लोक एक डॉलरपेक्षा कमी उत्पन्नावर गुजराण करतात.*

२००८ च्या GHI नुसार ९२३ मिलियन व्यक्ती दररोज भुकेलेल्या दिसतात. त्यापैकी ९०७ मिलीयन व्यक्ती ह्या विकसनशील राष्ट्रातील आहेत असे FAO म्हणतो. त्याच बरोबर जगातील ९६९ मिलीयन व्यक्ती ह्या १ डॉलरपेक्षा कमी उत्पन्नावर आपली गुजराण करतात. त्यापैकी १७% म्हणजे जवळ-जवळ १६५ मिलियन व्यक्ती ह्या ०.५० डॉलरपेक्षा कमी उत्पन्नावर गुजराण करतात.

शेवटी असे म्हणावेसे वाटते की, जगामध्ये उत्पन्नाच्या वितरणात एवढी विषमता जर असेल तर येथे भूकबळी किंवा कुपोषण होणार नाही ही अपेक्षा ठेवणे कितपत उचित असेल?

संदर्भ :


1. 2010 Global Hunger Index the challenge of Hunger: Focus on the Crisis of Child Undernutrition.
2. 'Kovli Pangal' ,Each year two lakh deaths in Maharashtra' a, report by Child Mortality Study and Action Group Maharashtra.
3. Tribal Research Bulletin.
4. Poltical Economy of Hunger in Adivasi Areas, Centre for Environment and Food Security, New Delhi, 2005.
5. Yojana A Development Monthly January 2007
6. UNICEF's report on 'The State of World' Children 2008'.
7. Global Hunger Index The Challenge of Hunger 2008.
8. Developmentas Freedom, Amartya sen, Oxford Press, New Delhi.
9. *'बचतगटांच्या माध्यमातून गरिबीमुक्त विश्वाची निर्मिती सामाजिक व्यवहार आणि भांडवलशाहीचे भवितव्य'* मोहंमद युनूस अनुवाद-गोविंद गोडबोले, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.


- ✲ -

# किमान वेतन व असंरक्षित माथाडी कामगार

**शेंडगे दत्तात्रय भगवानराव, देऊर (सातारा)**
प्रा.संभाजीराव कदम महाविद्यालय.

**प्रस्तावना :**

असंघटीत श्रमिकांची सौदा शक्ती कमी असल्याने त्यांच्या आर्थिक शोषणाची शक्यता जास्त असते. शेतमजूर, बांधकाम क्षेत्रातील मजूर, माथाडी, हमाल, इतर श्रमजीवी अशा असंघटीत व असंरक्षित कामगारांना जीवन निर्वाहाचे साधन म्हणून वेतनाचे निर्धारण करणे आवश्यक असते. कारण वेतनाची प्राप्ती श्रमिकांकरिता वर्तमान आणि भविष्यकाळात त्यांची कामगिरी उंचाविण्यास प्रेरणा देणारी ठरते.

महाराष्ट्रातील असंरक्षित व असंघटीत कामगारांमध्ये माथाडी कामगारांची संख्या पाच लाखांपेक्षाही जास्त आहे. माथाडी कामगारांचे काम नैमित्तिक स्वरूपाचे असून त्यांना कामाची शाश्वती नाही, तसेच त्यांना 'काम असेल तेवढेच दाम' अशी स्थिती असल्याने आजही महाराष्ट्रातील असंख्य माथाडी कामगारांना नियमित रोजगाराची हमी, किमान निर्वाह वेतन, कामाच्या ठिकाणची व्यवस्था व सामाजिक सुरक्षितता इत्यादीबाबत असमाधानकारक स्थिती आहे. असंरक्षित माथाडी श्रमिकांचे हक्क अबाधित राखण्यासाठी राज्यात 'माथाडी अधिनियम' मंजूरी करून पुरोगामी व क्रांतीकारक पाऊल उचललेले गेले. 'माथाडी अधिनियम, १९६९'मुळे असंरक्षित माथाडी श्रमिकांना नियमीत रोजगार, वेतन निर्धारण कामाच्या ठिकाणची सुस्थिती व सामाजिक सुरक्षिततेबाबतचे विशिष्ट अधिकार न्यायालयामार्फत बजावणीक्षम झाले आहे. असंघटीत व असंरक्षित माथाडी कामगांराना जीवन निर्वाह वेतन मिळण्याबाबत व त्यांचे जीवनमान उंचविण्यासाठी शास्त्रीय विश्लेषणातून वास्तव स्थितीत बदल घडवून आणणे आवश्यक आहे.

**भारतीय संविधान व किमान वेतन :**

दुर्बलांना सुद्धा माणुसकीचे अधिकार उपभोगता आले पाहिजेत हा भारतीय संविधनातील समाजवादाचा उद्देश आहे. म्हणजेच खऱ्या व्यक्तिस्वातंत्र्याचा किंवा लोकशाहीचा तो आर्थिक क्षेत्रातील विस्तार आहे. संविधानातील चौथ्या भागात विधीनिर्धीष्ठ केलेल्या राज्य धोरणाच्या निर्देशक तत्त्वामध्ये अभिप्रेत मानवतावादी समाजजीवन प्रस्थापित करण्यासाठी कामगांराना निर्वाह वेतन दिले जावे या

संकल्पनेचा अंतर्भाव झालेला आहे. यासाठी संविधानातील कलम ३९(क) नुसार उपजीविकेचे पुरेसे साधन मिळण्याचा हक्क स्त्री व पुरूष नागरीकांना सारखाच असावा, कलम ३९ (ड) नुसार स्त्री व पुरूष कामगारांचे आरोग्य व ताकद याचा दुरूपयोग करून घेण्यात येऊ नये, आणि नागरिकांना आर्थिक गरजेपोटी त्यांचे वय किंवा ताकद यास न पेलणाऱ्या व्यवसायात शिरणे भाग पाडू नये, कलम ४१ व कलम ४२ मध्ये कामाच्या हक्कासाठी लोकसहाय्याचा हक्क, कामाबाबत न्याय व मानवोचित परिस्थिती उपलब्ध करण्यासाठी राज्य सरकार तरतुद करील असे विहीत केलेले आहे. कलम ४३ मध्ये राज्य यथायोग्य विधिविधानाद्वारे किंवा आर्थिक सुसंघटन करून सर्व कामगारांना काम, निर्वाह वेतन, समुचित जीवनमान आणि फुरसतीचा आणि सामाजिक व सांस्कृतिक संधीचा पूर्ण उपयोग याची शाश्वती देणारी अशी कामाची परिस्थिती उपलब्ध करून देण्यासाठी राज्य प्रयत्नशील राहील अशी महत्त्वपूर्ण तरतूद करण्यात आलेली आहे.

**किमान वेतनामागील तात्त्विक भूमिकाः**

साधनांवर किंवा एकूण अर्थव्यवहारांवर ज्यांचे नियंत्रण आहे त्या मालकवर्गाची मर्जी राखली नाही तर आपल्याला मिळणारी तुटपूंजी कमाईसुध्दा बंद होईल अशी भीती असंघटीत व असंरक्षित श्रमिकाला वाटते. असंघटीत कामगारांमध्ये सौदाशक्ती नसल्यामुळे ते केवळ आर्थिक नव्हे तर धार्मिक, पारंपारीक, राजकीय किंवा आर्थिक राजकीय व सामाजिक व्यवहारातही आपल्या इच्छेनुसार निर्भयपणे वागू शकत नाही, ही अन्याय्य व्यवस्था आहे. भरपूर मेहनत करूनही आपल्या व कुटुंबियांच्या प्राथमिक गरजा भागविण्या इतपतही उत्पन्न त्यांना मिळत नाही हे आर्थिक शोषण आहे.

श्रमिकांची वेतन पातळी कमी असलेल्या स्थितीत श्रमिक दारिद्रय रेषेवर आपले जीवन जगत असतो. यातुन उद्‌भवणा-या असंतोषतून औद्योगिक शांतता भंग होणे व अन्य दुष्परिणाम टाळण्यासाठी श्रमिक आणि त्याच्या कुटुंबाच्या किमान गरजा भागतील व त्यांचे समुचित जीवनमान सुधारण्यासाठी सामाजिक व सांस्कृतिक संधीचा पूर्ण उपयोग होईल याची शाश्वती देणारी अशी कामाची परिस्थिती उपलब्ध करून देणे हे प्रत्येक सुसंस्कृत समाजाचे व पुरोगामी विचारसरणीच्या शासन यंत्रणेचे कर्तव्य ठरते. यासाठी शासन संविधानात विधिनिर्धिष्ट केल्यानुसार प्रत्येक श्रमिकाला निर्वाह वेतन उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील राहते.

जेव्हा कामगारांची मजूरी ही कुटुबांच्या प्राथमिक गरजा भागविण्यासाठी जेमतेम पुरेशी असते तेंव्हा त्यांचा जीवनस्तर हा न्यूनतम निर्वाहस्तर असतो. न्यूनतम निर्वाहस्तर हा दारिद्र्याच्या स्तरापेक्षा वरचा स्तर आहे. असे कामगार आपल्या विविध सामाजिक गरजा भागविण्याकरिता संपूर्णपणे असमर्थ असतात हे उघडच आहे. निर्वाह वेतन म्हणजे कामगार आपल्या सर्व प्राथमिक गरजांबरोबरच विभिन्न

सामाजिक गरजासुध्दा सहजपणे भागवू शकतील इतके वेतन होय. सामाजिक गरजांमध्ये प्रामुख्याने सामान्य शिक्षण, प्रवास, औषधयोजना, करमणूक व विमा हया बाबींचा समावेश होतो. जीवन मजूरी किंवा पर्याप्त मजूरी याचा अर्थ इतका की, ज्यामुळे कामगाराला योग्य निर्वाह करणे शक्य होऊ शकेल. यासाठी शासन संविधानाच्या चौकटीत किमानवेतन कायदा करून वेतन निर्धाराचा समन्वय राखण्याचा प्रयत्न करित असते.

**किमान उत्पन्न पातळीमागील आदर्श विचारः**

प्रा. डॉ.अमर्त्य सेन - सेन हे स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते असले तरी खुल्या अर्थव्यवस्थेमुळे सामान्य माणूस व्यवस्थेतून बाजूला पडत असेल तर त्यासाठी राज्यसंस्थेच्या हस्तक्षेपाची व सामाजिक प्रयत्नाची आवश्यकता असते. अर्थशास्त्रात दारिद्र्य म्हणजे उत्पन्न किंवा उपभोग कमी असणे होय. परंतु प्रा. डॉ.अमर्त्य सेन यांच्या मते गरजा भागविण्यामध्ये अपयशी ठरणे किंवा चांगल्या राहणीमानसाठी लायक नसणे असाही त्याचा अर्थ होतो.

व्यक्तीच्या दृष्टीने श्रमिकांमध्ये काम करण्याची क्षमता नसणे म्हणजे निरपेक्ष दारिद्र्य होय. याउलट श्रमिकांमध्ये काम करण्याची क्षमता असूनही ती वापरू न शकणे ही सापेक्ष दारिद्र्य संकल्पना होय. उदरनिर्वाहा पुरतेसुध्दा व्यक्ती बाजारपेठेतून धान्य खरेदी करू शकत नाही, कारण त्याच्याकडे पूरसे निर्वाह साधन उपलब्ध नसते तसेच कोणत्याही प्रकारची मालकी नसते. प्रा. डॉ.अमर्त्य सेन यांच्या मते दारिद्र्य हे सापेक्ष किंवा निरपेक्ष असून राष्ट्राच्या अकार्यक्षमतेमुळेही हा प्रश्न निर्माण होतो.

**किमान वेतन अधिनियम :**

किमान वेतन अधिनियमाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे कामगारांच्या आर्थिक शोषणास प्रतिबंध करणे असा आहे. केंद्रसरकारच्या अनुसूचीत यादीतील ४५ उद्योग आणि विविध राज्यातील अनुसूचीत उद्योगांच्या यादीतील एकूण १५९६ उद्योगांना किमान वेतन अधिनियम लागू केलेला आहे. महाराष्ट्रात ७७ उद्योग या कायद्याखाली येत आहेत. त्यापैकी ५१ उद्योगांची किमान वेतने ठरलेली आहेत आणि त्यापैकी ३२ उद्योगांत महागाई भत्ताही दिला जातो. महाराष्ट्रातील असंरक्षित माथाडी कामगारांसाठी माथाडी अधिनियम १९६९ च्या कलम ३ (ड) मधील तरतुदी अन्वये विशिष्ट परिस्थितीतच किमान वेतन देण्याची तरतूद आहे.

किमान वेतन निश्चितीबाबतचे सर्वसाधारण निकषः अ) कुटुंबातील उपभोक्ते नवरा, बायको, व दोन मुले मिळून ३ घटक ब) भारतीय आहारानुसार किमान २७०० उष्मांक मिळवून देणारे अन्न घटक आवश्यक क) कुटुंबासाठी वार्षिक ७२ यार्ड कापड ड) सरकारच्या औद्योगिक गृहनिर्माण घरासाठी जेवढे भाडे दिले जाते तेवढे भाडे आणि इ)इंधन, वीज आणि इतर किरकोळ खर्चासाठी एकूण वेतनाच्या २० % रक्कम तसेच किमान वेतनासह जीवन निर्वाह किंमत निर्देशांकासह महागाई भत्ता दिला जावा, अशा तरतूदी केलेल्या आहेत.

किमान वेतन संकल्पनेच्या बाबतीत मा.सर्वोच्च न्यायालय व विविध चौकशी आयोग

यांच्या मते किमान वेतन कायद्यामध्ये किमान वेतन म्हणजे काय? न्याय वेतन म्हणजे काय? आणि जीवन वेतन म्हणजे काय? याबाबत स्पष्ट निकष निर्धारीत केले गेले नाहीत. मा.सर्वोच्च न्यायालयाने अपील नं.४३३६ (एन. एल.), १९९१ वरील निर्णय देताना किमान वेतनाबाबत स्पष्ट निर्देश दिले आहेत की, यापुढे अनुसूचीत उद्योगांतील कामगारांसाठी किमान वेतन निश्चित करताना कामगांराच्या मुलांचे शिक्षण, औषधोपचार आवश्यकता, करमणूक, पारंपारीक सण व समारंभ आयोजनाची किमान उपाययोजना, वृध्दापकालीन तरतूद व लग्न समारंभ इत्यादींसाठी एकूण देय वेतनाच्या २५% रक्कमेची जादा तरतूद करावी. न्यायालयाने तत्कालीन स्थितीचा विचार करून रू.२०० किमान वेतनाची अपेक्षाही व्यक्त केली होती.

मा. सर्वोच्च न्यायालयाने पुढे असेही स्पष्ट केले आहे की, भारताच्या संविधानात जीवन वेतनाची तरतूद केलेली आहे. अशावेळी वेतनात जीवन निर्वाहासाठी आवश्यक असणाऱ्या वरील सर्व घटकांचा समावेश व्हावा. असे किमान वेतन ज्या उद्योगांना देणे शक्य नाही त्यांनी आपला व्यवसाय बंद करावा असेही नमूद केले आहे.

**भारतातील असंघटीत कामगार व किमान वेतन :**

राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण अहवाल २००४-०५ मधील ६१ व्या फेरीतील आकडेवारीनुसार ४५७ दशलक्ष कामगारांपैकी ४२२ (९२ %) दशलक्ष कामगार असंघटीत क्षेत्रात आहेत. महाराष्ट्रात असंघटीत श्रमिकांची संख्या ४० दशलक्ष पेक्षा जास्त आहे.

२० सप्टेंबर, २००४ रोजी असंघटीत क्षेत्रातील उद्यमांसाठी अर्थतज्ञ अर्जुन सेनगुप्ता यांच्या अध्यक्षतेखालील राष्ट्रीय आयोगाच्या अहवालानुसार देशाच्या एकूण असंघटित कामगारांचे देशाच्या सकल आंतरदेशीय उत्पादनात (GDP) ६० % पेक्षा जास्त योगदान आहे. आयोगाने दिलेल्या माहितीप्रमाणे देशातील ८३ कोटी ६० लाख जनतेचे (असंघटित क्षेत्रातील कामगार व त्याच्या कुटुंबियांचे) दरडोई उत्पन्न प्रतिदिन रू. २० किंवा त्यापेक्षाही कमी आहे. म्हणजेच देशाच्या एकूण जनतेपैकी ७७ टक्के जनता ही अत्यंत हलाखीचे जीवन जगते.

आयोगाने किमान वेतन कायद्यातील तरतुदींच्या अंमलबजावणीतील त्रुटी दाखवून अनेक संघटीत तसेच असंघटीत नैमित्तिक व नियमित कामगांराना किमान वेतनदेखील मिळत नसल्याचे साधार मांडले आहे. २००४-०५ मध्ये राष्ट्रीय किमान वेतनाच्या (रू. ६६ प्रति दिवस) आधारे एकूण ग्रामीण भागातील नैमित्तिक कामगारांपैकी ८३.७२ टक्के तर बिगर कृषी नैमित्तिक कामगारांपैकी ६४.७ टक्के कामगारांचे वेतन राष्ट्रीय किमान वेतनापेक्षाही कमी होते. (अहवाल, परिशिष्ट, तक्ता अ.३.१ पृ. २५९)

राष्ट्रीय पातळीवरील किमान वेतनाचे दर प्रति दिन १९९६ मध्ये रू. ३५/-, १९९८ मध्ये रू. ४०/-, १९९९ रू. ४५/-,२००२ मध्ये रू. ५०/-, २००४ मध्ये रू. ६६/-, २००७ मध्ये

रू. ८० व नोव्हेंबर, २००९ मध्ये रू.१०० इतके वाढविण्यात आले. अलिकडेच एप्रिल, २०११ पासून हा दर रू ११५ प्रति दिन करण्यात आलेला आहे. राष्ट्रीय ग्रामीण कामगार आयोगाच्या १९९० मधील अहवालानुसार किमान वेतन अधिनियमातील वेतन सुधारणेबाबतच्या तरतूदीत किमान वेतन पातळीत बदलणारा महागाई भत्ता हा महागाई किंमत निर्देशांकातील बदलाप्रमाणे प्रत्येक सहा महिन्याला त्यामध्ये बदल होणे अपेक्षित धरले आहे.

## महाराष्ट्रातील असंरक्षित माथाडी कामगारः

माथाडी कामगार म्हणजे, मालाची चढ-उतार व वाहतुक करणे जसे की, बाजारपेठांमध्ये विविध मालांची पोती, कापड व कापसाच्या गाठी, माल उतरवून दुकानात अथवा गोदामात थप्पी लावणे, वजन करणे, गट लावणे, एका ठिकाणचा माल दुसरीकडे हलविणे (वारफेर), भराई, उतराई, वाराई, पोती शिवणे, मालाची स्वच्छता, निवड प्रतवारी, बांधणी (पॅकिंग) इ. अशी अनेक प्रकारची कामे करावी लागतात. अशी कामे करणा-या कामगारांना 'माथाडी कामगार' संबोधले जाते. तसेच "जे कामगार आपल्या डोक्याच्या आधाराने खांद्यावरून माल वाहून नेतात तसेच गोदीच्या बाहेरील कामगार आपल्या पाठीवरून मालाची चढ-उतार व वाहून नेण्याचे काम करतात अशा कामगारांना माथाडी कामगार असे म्हणतात." माथाडी काम हे सामुहिक (टोळी पध्दत) व मुकादमाच्या नेतृत्वाखाली चालते. अशा प्रकारची कामे प्रामुख्याने उत्पादन आस्थापना, किरकोळ व घाऊक व्यापारी बाजारपेठांमध्ये चालतात.

हमालांच्या वरील प्रमाणे माथाडी कामाचे स्वरूप पाहिल्यानंतर त्यांचे काम म्हणजे एकूण व्यवस्थेत सर्वसामान्यांना लागणाऱ्या प्रत्येक वस्तूसाठी माथाडी कामगारांच्या हाताचा, पाठीचा अथवा डोक्याचा आधार घ्यावा लागतो. उत्पादक व उपभोक्ता यांच्यामधील 'Life Line' म्हणजे माथाडी कामगार असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. तरीही श्रमिक बाजारात माथाडी कामगार हा कनिष्ठ श्रमिकवर्गापेक्षाही हलक्या दर्जाचा कामगार म्हणून ओळखला जातो. तरीही श्रमबाजारात माथाडी कामगारांना अतिशय तुच्छतेची वागणूक मिळते.

महाराष्ट्रात (२००६ अखेर) माथाडी अधिनियमप्रमाणे ३४ माथाडी मंडळे स्थापन करण्यात आली असून, त्यापैकी १० मंडळे मुंबई येथे कार्यरत आहेत. उर्वरीत २४ मंडळे राज्यातील इतर जिल्हयामध्ये कार्यरत आहेत. विविध माथाडी मंडळाच्या माध्यमातून ७३६७८ नोंदीत मालास व १६५२६१ नोंदीत कामगार यांना लाभ मिळवून दिला जातो. अद्याप जवळपास ३.५० लाखांपेक्षाही जास्त माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार अधिनियमाच्या लाभांपासून वंचीत आहेत.

## माथाडी अधिनियम :

महाराष्ट्रामध्ये माथाडी - हमाल कामगांराना आर्थिक व सामाजिक सुरक्षितता प्रदान करण्याच्या हेतूने संविधानाच्या कलम ३१ (ग) तसेच २५४ (२) नुसार समवर्ती सूचीमधील उद्दिष्ट पूर्तीसाठी

केंद्र व राज्य सरकार यांनी मिळून कामगार कायदे करण्याची तरतूद केलेली आहे. महाराष्ट्र हे देशातील पहिले व एकमेवाद्वितीय राज्य आहे की, 'माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी असंरक्षित कामगार अधिनियम, १९६९' हा असंरक्षित कामगारांचे मालकवर्गाकडून शोषण होऊ नये यासाठी स्वतंत्र कायदा केलेला आहे.

### माथाडी अधिनियमाद्वारे माथाडी-कामगारांना मिळणारे लाभ :

माथाडी अधिनियमातील तरतूदीनुसार विशिष्ट क्षेत्रासाठी 'माथाडी योजना' तयार करून अंमलबजावणीसाठी माथाडी मंडळाची नेमणूक केली जाते. माथाडी मंडळची रचना त्रीस्तरीय असून यात मालक व कामगार यांचे समान प्रतिनिधी असतात व त्यामध्ये शासन प्रतिनिधीही कार्यरत असतात. माथाडी कामगारांच्या लाभांबाबत निर्णय घेण्याचे अधिकार माथाडी मंडळास असतात.

माथाडी मंडळ कामगार व मालक या उभय पक्षांच्या चर्चेतून माथाडी कामगारांच्या नोकरीचे नियमन करणे, मजुरीचे दर, भत्ते, कामाचे तास, विश्रांतीच्या वेळा, पगारी रजा, आणि सेवेच्या शर्ती याबाबत निर्णय घेतात. मंडळाकडील कल्याणकारक तरतूदींमध्ये भविष्यनिर्वाह निधी, उपदान, नुकसान भरपाई, औषधोपचार सुविधा अशा बाबी येतात यासंबधीत प्रयोजनासाठी मालकांकडून लेव्ही स्वरूपात अंशदान घेऊन विविध निधींच्या तरतूदी केल्या जातात.

मुंबई व नागपूर प्रमाणे प्रत्येक ग्रामीण भागातील माथाडी मंडळानी वेतन वाढी या प्रत्येकवर्षी नियमितपणे व महागाई भत्त्याचे दर महागाई निर्देशांकाच्या आधारे निश्चित करणे अभिप्रेत असते, मात्र तसे होत नाही. मुंबईतील माथाडींसाठी हॉस्पीटलची सोय असून पुणे व नागपूर मध्ये माथाडींना वैद्यकीय सुविधा पुरविली जाते. तसेच विमा संरक्षणही दिले जाते. पुणे येथे कष्टकरी श्रमिकांसाठी हमाल पंचायतीने 'कष्टाची भाकर' हा उपक्रम राबवून श्रमिकांना पोषक आहार देण्याचा प्रयत्न करीत आहे.

असंरक्षित माथाडी कामगारांसाठी 'माथाडी अधिनियम, १९६९' असतानाही या कामगारांना पुरेसे संरक्षण मिळाले आहे, असे म्हणता येणार नाही. कारण माथाडी कामगारांच्या नैमित्तिक स्वरूपाच्या कामामुळे कोणीही मालक माथाडींना आपला नोकर मानायला तयार नसतात. काम असेल तेवढे दाम व काम संपल्यानंतर मालक व कामगार असा संबंध त्यांच्यात राहत नसल्याने कामगार कल्याणाची नेमकी जबाबदारी कोणाची? त्यांचे उत्तरदायित्व स्वीकारण्यासाठी कामगार व मालक असा विधीवत संबंध प्रस्थापित झालेला नाही. त्यामुळे हा प्रश्न आजही अनुत्तरीतच आहे. माथाडींसाठी स्वतंत्र अधिनियम असूनही त्यांना किमान वेतन अधिनियम लागू होत नाही.

माथाडींना नियमीत काम देण्याचे बंधन मंडळावर अथवा मालकावर नाही. माथाडींचे

मजुरीचे दर वाढलेले दिसतात परंतु त्यांच्या उत्पन्नात वाढ झालेली नाही. या कामगारांची मजुरी नगांवर ठरत असून महाराष्ट्रात विविध ठिकाणच्या बाजारपेठेत वेगवेगळे मजूरीचे दर पहावयास मिळतात. नोंदीत माथाडी कामगार कामांसाठी उपलब्ध असूनही त्यांना काम उपलब्ध करून देण्यामध्ये मालक असमर्थ ठरल्यास कामगारांना किमान वेतना इतपत मोबदला देण्याची तरतूद माथाडी अधिनियम कलम ३ (ज) मध्ये आहे. परंतू माथाडी किमान वेतन किती द्यावे हे अद्यापी निश्चित केलेले नाही व दिलेही जात नाही.

**माथाडी कामगारांची स्थिती :**

शहरी व ग्रामीण भागातील माथाडी कामगारांचे मजरी दर व त्यांना मिळणाऱ्या मजरीची स्थिती तक्ता क्र.१ प्रमाणे, या तक्त्यातील सातारा माथाडी मंडळाच्या मजरी दरामध्ये २५% लेव्ही मालकवर्गाने देय होती. नागपूर येथील मजूरीचे दर मुंबईच्या तुलनेत जास्त आहेत, तर सातारा जिल्हा माथाडी मंडळातील मजूरीचे दर मुंबईच्या तुलनेत खुपच कमी आहेत. मुंबईतील माथाडी कामगारांना नागपूर व साताराच्या तुलनेत जास्त काम उपलब्ध होते. लेव्हीच्या माध्यमातून मिळणारा लाभही सातारा माथाडी मंडळातील कामगारांना कमी मिळतो. तसेच येथील कामगारांना आरोग्यासंबंधी कोणत्याही सुविधाही मिळत नाहीत.

सातारा जिल्हा माथाडी मंडळाच्या कार्यक्षेत्रातील विविध माथाडी केंद्रावरील कामगारांचे सरासरी वार्षीक वेतनातील वाढ विचारात घेतल्यास असे लक्षात येते की सन

**तक्ता क्र. १**

**मुंबई, नागपूर व सातारा मंडळातील मजूरीची स्थिती (लोखंड बाजार सन २००९)**

| अ.क्र. | कामाचे स्वरूप | प्रतिमान | नागपूर | मुंबई | सातारा |
|---|---|---|---|---|---|
| १ | भराई - उतराई | प्रतिटन | १६७.३२ | १४०.६५ | ७२.८० |
| २ | वारफेर | प्रतिटन | १६७.३२ | १४०.६५ | ५६.५६ |
| ३ | वाराई | प्रतिटन | ५३.७५ | ४२.९६ | २६.९० |

Ref : *1) Nagpur & Wardha Dist.Mathadi & Unprotected Labour Board, Nagpur of material at Railway Yard.Revised rate statement.(2009)*

*2) Mumbai Iron and steel Labour Board, Mumbai Revised rate statement.(2009)*

*३) सातारा जिल्हा माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार मंडळ, सातारा लोखंड बाजार व बांधकाम साहित्य बाजारातीच दर पत्रक.*

### तक्ता क्र. २

### सातारा जिल्हा माथाडी मंडळाच्या कार्यक्षेत्रातील माथाडी केंद्रावरील प्रति कामगार सरासरी वार्षीक वेतन (सन १९९५ ते २००६)

| वर्ष | १९९५ | १९९६ | १९९९ | २००० | २००२ | २००३ | २००४ | २००५ | २००६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कामगार संख्या | ११४१ | १२१७ | १३७० | १३७४ | १४२९ | १३७२ | १४२७ | १४४५ | १४५५ |
| वेतन | ८०४० | १०८२२ | १५३१७ | १६७५८ | २००५२ | १८२५८ | २२२१३ | २२८८९ | २७५२९ |

*स्रोत : सातारा जिल्हा माथाडी कामगार मंडळ कार्यालयाकडील वेतन रजिस्टर नुसार (सन १९९१ ते २००६)*

१९९५ च्या तुलनेत २००० मधील सरासरी वेतनातील वाढ ही ५२% आहे. २००१ च्या तुलनेत २००५ मधील सरासरी वेतनातील ही वाढ २२.६०% आहे. १९९५ च्या अगोदर सातारा माथाडी मंडळाच्या सुरूवातीच्या काळात श्रमिकांचे मजूरीचे दर खुपच कमी होते. १९९५ - ९६ नंतर माथाडी मंडळाच्या कार्य विस्तारातून व श्रमिक संघटनांच्या वाढत्या सहभागातून मजुरीचे दर वाढलेले आहेत.

सातारा जिल्हा माथाडी मंडळातील कामगारांच्या सरासरी वार्षिक वेतनाचा विचार केल्यास प्रति कामगार प्रतिदिन वेतन १९९६ मध्ये रू. ३०/-, १९९८ मध्ये रू. ३९/-,१९९९ मध्ये रू. ४३/-,२००२ मध्ये रू. ५६/-, २००४ मध्ये रू. ६२/-, व २००६ मध्ये रू. ७६/- आहे, हे राष्ट्रीय स्तरावरील किमान वेतनापेक्षा कमी आहे. सातारा जिल्हा माथाडी मंडळातील कामगारांना सन २००६ मध्ये मिळणारे सरासरी मासिक वेतन रू.२२९४/- इतके आहे व पुणे येथील सर्वेक्षणानुसार माथाडी -हमाल कष्टकऱ्यांचे मासिक वेतन रु.३६६९/- आहे. मुंबई येथील मालवाहतूक कामगार मंडळ व कापड बाजार व दुकाने मंडळ येथे अनुक्रमे रू. ६५१६/- व रू. ३७७०/- असून पुणे येथील मजूरीच्या तुलनेत सातारा जिल्ह्यातील माथाडींची मजूरी ३७% ने कमी आहे व मुंबई येथील वेतनाच्या तुलनेत ३५% ने कमी आहे.

माथाडी कामगांराच्या कामाच्या स्वरूपाचा विचार करता कोणतेही काम करताना वापरली जाणारी किमान मनुष्य शक्ती सारखीच असते. असे असतानाही वेतना मध्ये मोठी तफावत असल्याचे दिसून येते. यामुळे कामगार व मालक वर्गामध्ये मजुरी दरांवरून वाद निर्माण होतात.

डॉ. बाबा आढाव, अध्यक्ष, 'अंगमेहनती कष्टकरी संघर्ष समिती' व डॉ. अभिजीत वैद्य, संस्थापक, राष्ट्रीय आरोग्य सेना प्रमुख यांच्या २००८ च्या 'महागाई आणि कष्टकऱ्यांचा आहार' हे सर्वेक्षण अध्ययन केले गेले. सर्वेक्षणातील ६ गटातील ३११ कष्टकऱ्यांपैकी ७४ कष्टकऱ्यांचा बीएमआय (बॉडी मास इंडेक्स) १८.५ पेक्षा कमी आढळला. याचाच अर्थ २४ % कष्टकरी हे कुपोषित अवस्थेत होते. सरासरी रक्त दाब १३१/

८६ मिमि एवढा भरला, तथापि रक्तदाब मोजलेल्या २९४ कष्टकऱ्यांपैकी ९८(३३ %) व्यक्तींना उच्च रक्तदाब सापडला. या कष्टकऱ्यांची, आर्थिक ताणाची जीवनशैली आणि निकृष्ट आहार हे उच्च रक्तदाबाचे घात घटक बनले असले पाहिजेत असा अंदाज व्यक्त केला गेला.

### तक्ता क्र. ३

### कामगारांची आर्थिक व शारीरिक स्थिती

| सर्वेक्षण ठिकाण | कामगार संख्या | कामगार वय | कामगार उंची | आदर्श वजन | प्रत्यक्ष वजन | कामगार मासिक उत्पन्न | कुटुंब मासिक उत्पन्न | कुटुंब माणसी मासिक उत्पन्न | कुटुंब अन्न खर्च | मिळणारे उष्मांक | दारीद्र्यरेषा तुलनात्मक उष्मांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मालधक्का | ४८ | ३७ | ४६७ | ६७ | ६२ | ५६११ | ६४३३ | ११०९ | ४११७ (६५%) | १५१२ | ४७% कमी |
| मार्केट यार्ड | ३९ | ४३ | १६६ | ६६ | ५९ | ४०६६ | ६४६६ | ११९७ | ३६११ (५७%) | १२७२ | ४७% कमी |
| लोखंड बाजार | ५२ | ३७ | १६५ | ६४ | ६४ | ६९३९ | ९८९५ | १७६७ | ४४४९(४५%) | १२४० | ४८.३%कमी |
| टींबर मार्केट | ५० | ३१ | १६६ | ६५ | ५२ | ३६६९ | ५५८६ | १४७० | ११२४(३४%) | १६१७ | ३०% कमी |

टीप : *१) उत्पन्न व खर्च रूपयांत मांडलेला आहे.*

*२) वय वर्षा मध्ये, उंची सेंटी मिटर मध्ये व वजन किलोग्रॅम मध्ये नोंदविले आहे.*

*(स्रोत: राष्ट्रीय आरोग्य सेना सर्वेक्षण अहवाल, २००८)*

वरील तक्त्यातील माहीतीनुसार कामगारांच्या एकूण उत्पन्नातील अन्नघटकांवर होणारा खर्च व त्यातून त्यांना मिळणारे उष्मांक विचारात घेतल्यास सर्व कामगार अर्धपोटीच जीवन जगत असल्याचे निदर्शनास येते. भारतीय संविधानात निर्वाह वेतनाबाबत व्यक्त केलेली अपेक्षित धारणा व किमान वेतन अधिनियमाच्या माध्यमातून किमान वेतनाच्या घालून निकषांबाबत कष्टकरी माथाडी-हमाल यांच्या बाबतीत कोठेही मेळ बसत नाही असे दिसते. वरील प्रमाणे श्रमजीवींची स्थिती असतानाही दारिद्र्य रेषेखालील जनतेला मिळणारे लाभही कायदेशीर तांत्रिक त्रुटीमुळे असंरक्षित श्रमिकांना मिळत नाही.

माथाडी कामगारांसाठी केलेल्या माथाडी अधिनियमाचा उद्देश उदात्त असलातरी अधिनियम अमंलबजावणीसाठी माथाडी मंडळ व नोंदीत कामगार याच्यांत मालक व कामगार असे नाते नसल्याचे आढळून आले आहे. मंडळे ही कंत्राटदार अथवा मालक नाहीत, असे न्यायालय निकालात आढळून आले आहे. काही मंडळांतील कामगारांच्या वेतनात बरीच तफावत आढळते. त्यामुळे ज्यांना कमी काम मिळते त्यांना कमी वेतन तर मिळतेच शिवाय कमी वेतनांमुळे इतर लाभ उदा. भविष्य निर्वाह निधी, उपदान, सानुग्रह अनुदान हे कमी मिळते. यामुळे असा कामगार

इतर कामगारांच्या तुलनेत जास्त शोषित होत चालला आहे. अशा परिस्थितीत कामगारांच्या वेतनात किमान वेतनाप्रमाणे समानता आणण्याची आवश्यकता आहे.

**निष्कर्ष :**

१) भारतात व महाराष्ट्रात आजही अधिनियमाच्या कक्षेबाहेर असलेल्या असंघटीत व असंरक्षित कामगारांची संख्या जास्त आहे. तसेच असंघटीत व असंरक्षित श्रमिकांची सौदाशक्ती कमी असल्याने त्यांच्या जीवन निर्वाहासाठी अथवा विशिष्ट जीवनमान जगण्याकरीता कामगाराला एकूण जो खर्च करावा लागतो. तेवढे किमान वेतन असंरक्षित श्रमिकांना मिळत नाही. यामुळे श्रमिक व त्यांच्या कुटुंबाचे कायदेशीर शोषण होते असे म्हणण्यास वाव निर्माण होतो.

२) संविधानातील कलम ४३ नुसार आजही असंरक्षित श्रमिकांना निर्वाह वेतन व समुचित जीवनमान आणि सामाजिक व आर्थिक संधीचा उपयोग करता येईल याची शाश्वती देणारी कामाची परिस्थिती उपलब्ध करून देण्यास शासन यत्रंणा अपयशी ठरलेली आहे. यामुळे संविधानातील समाजवादाचा उद्देश बाजूला पडत चाललेला आहे हे स्पष्ट होते.

३) संविधानाच्या आधाराने महाराष्ट्रात माथाडी कामगांरासाठी स्वंतत्र अधिनियम अस्तित्वात येऊनही लाखो श्रमिक यापासून वंचित आहेत. कारण माथाडी स्वरूपाच्या कामात आजही मालक व कामगार असा संबंध प्रस्थापित होण्यामध्ये तांत्रिक अडचण असल्याने किमान जीवन निर्वाह वेतन व इतर आनुषंगिक लाभ मिळवुन देण्याचे उत्तरदायित्व नेमके कोणाचे अशा अडचणीमुळे महाराष्ट्रातील असंरक्षित माथाडी कामगारांना किमान वेतन अधिनियमही लागू होत नाही.

४) माथाडी - हमाल या श्रमिकांबाबतीत भारतीय संविधानातील कलम ३९ (ड) चे उल्लंघन होऊन कामगारांच्या आरोग्य व ताकद याचा दुरूपयोग करून घेण्यात येतो आहे, श्रमिकांना आर्थिक गरजेपोटी त्यांचे वय किंवा ताकद यांना न पेलणाऱ्या व्यवसायात कमी मजुरीवर वय व ताकदीस न पेलणारे अंगमेहनतीचे काम करावे लागत आहे. यामुळे २५ टक्के कष्टकरी हे कुपोषित अवस्थेत असून सरासरी ३५ टक्के श्रमिकांना उच्च रक्तदाब सारख्या गंभीर आजारांना सामोरे जावे लागते. कष्टकऱ्यांच्या आहारातून मिळणाऱ्या उष्मांकाचा विचार केल्यास सर्वच कामगार अर्धपोटी काम करतात हे स्पष्ट होते.

५) पुणे येथील माथाडी कामगारांना मिळणारी प्रतिदिन मजुरी ही जेमतेम राष्ट्रीय किमान वेतन पातळी एवढी आहे व सातारा येथील माथाडी कामगारांना मिळणारी प्रतिदिन मजुरी ही राष्ट्रीय किमान वेतनाच्या पातळी पेक्षाही कमी आहे. तथापि महागाई निर्देशांकातील वाढीच्या वेगाचा विचार केल्यास माथाडी श्रमिकांना मिळणारे वेतन व रोजगार दिवसेंदिवस कमी मिळत असल्याचे निदर्शनास येते. माथाडी कामगारांच्या किमान निर्वाह वेतनाबाबत कसलेही निकष अस्तित्वात नाहीत.

६) वर्षानुवर्षे दारिद्र्यरेषा व किमान वेतनाचे निकष बदलले जात नाहीत यामुळे कामगारांचे शोषण होण्यास राजकीय धोरणात्मक दूरदृष्टीचा अभाव तसेच कामगार संघटना व कामगारांचे अज्ञान याच बाबी जबाबदार आहेत असे दिसते. शहरी आणि ग्रामीण भागातील महागाई निर्देशांकाच्या तुलनेत माथाडी कामगारांचे कामाचे स्वरूप सर्व ठिकाणी सारखेच असले तरी एकाच शहरात व ग्रामीण भागात मजुरी दरांमध्ये मोठी विषमता पहावयास मिळते.

७) जीवनमान सिध्दांतानुसार श्रमिकांना प्राप्त होणारी मजुरी ही त्यांच्या पारंपरीक जीवनस्तर किंवा जीवनमान टिकवून ठेवण्याकरीता पुरेशी असली पाहीजे. परंतु माथाडी कामगारांच्या जुजबी शिल्लक उत्पन्नातून कुटुंबाचा निवारा, वस्त्र, शिक्षण, आरोग्य इ. गरजा भागवाव्या लागत असल्याने स्वाभाविकपणे अन्नाप्रमाणेच या सर्व गरजांची पूर्तता अत्यंत निकृष्ट पातळीवर होणार हे स्पष्ट होते.

**शिफारसी :**

१) सुसंस्कृत, समाधानी, शांततापूर्ण, संघर्षरहित समाजनिर्मीतीसाठी तात्त्वीक पातळीवर स्वातंत्र्याचा हक्क, मतदानाचा हक्क, मालमत्तेचा हक्क जसे मुलभूत हक्क आहेत त्याच प्रमाणे रोजगाराचा हक्क देखील मुलभूत हक्क असणे आवश्यक आहे. यामुळे मुलभूत हक्काची पूर्तता करण्यात सरकार अयशस्वी ठरल्यास श्रमिक सरकार विरूध्द न्यायालयात दाद मागू शकतील.

२) भारतीय संविधानामध्ये कलम ३९ प्रमाणे 'जगण्यासाठी पुरेशी साधने' व कलम ४३ प्रमाणे 'समुचित जीवनमानासाठी निर्वाह वेतन' यांचा उल्लेख येतो. जीवनमान सिध्दांतानुसार श्रमिकांना प्राप्त होणारी मजुरी ही त्याच्या कुटुंबाचा कसा तरी निर्वाह चालविण्याकरीता पुरेशी असून भागत नाही, ही मजूरी त्यांचा पारंपरीक जीवनस्तर किंवा जीवनमान टिकवून ठेवण्याकरीता पुरेशी असली पाहीजे.

किमान वेतन दर तत्कालीन परिस्थितीत सुसंगत, सामाजिक दृष्टया स्वीकृत असलेच पाहिजे. शाश्वत विकासाबरोबर सन्मानित जीवनमानाची हमी देण्यासाठी विद्यमान कामगार अधिनियमांमध्ये सुधारणांसह असंरक्षित श्रमिकांचे जीवनमान उंचविणारी स्थिती निर्माण करून समाजवादी तत्वाची जोपासणा होणे अभिप्रेत आहे. यासाठी किमान वेतन निश्चित करताना पुढील प्रमुख दोन उद्देश असावेत अ) सामाजिक उद्देश - कामगारांना त्यांच्या जीवनमानाचा किमान दर्जा टिकवता यावा एवढी खरेदी शक्ती त्यांना पुरविली जाईल याची दक्षता घेतली जावी. ब) आर्थिक उद्देश - किमान वेतन अशा पातळीला निश्चित केले जावे की ज्यामुळे श्रमिकांना आर्थिक विकासाचा लाभ घेण्यासाठी उत्तेजन मिळेल आणि आर्थिक योगदानही देता येईल.

३)माथाडी असंरक्षित कामगारांच्या मजूरी दराबाबत असलेली विषमता नष्ट करणे आवश्यक आहे. असंरक्षित कामगारांना संरक्षण देण्याच्या

मुलभूत मुद्याशी अत्यंत निकट व महत्त्वपूर्ण असा हा मुद्दा असल्याने माथाडींच्या मजूरी दरांबाबत संपूर्ण महाराष्ट्रात किमान आधारभूत दर असणे आवश्यक आहे. त्याकरिता किमान वेतन अधिनियमाच्या धर्तीवर माथाडी अधिनियमातील अनुसूचीत उद्योगांमध्ये काम करणाऱ्या कामगारांचे किमान आधारभूत वेतन परिक्षेत्रनिहाय वर्गीकरण करून निश्चित करावे व त्यावर शासनाकडून राज्यस्तरावर परिक्षेत्रनिहाय वाढ निश्चित करावी. यामुळे अधिनियमाच्या उद्देशाशी सुसंगती येऊन मालक व कामगार यांच्यातील संबंध सुधारण्यास, मतभेद टाळण्यास तसेच कामगारांना किमान खात्रीशीर मजूरी अथवा उत्पन्न मिळणे सहज सुलभ होईल.

४)माथाडी अधिनियमात मालक व कामगार असे नाते प्रस्थापित होऊन माथाडी कामगारांना इतर संघटीत क्षेत्रातील कामगारांप्रमाणे योग्य ते लाभ देण्यासाठी योग्य त्या सुधारणा करून अधिनियमाचे लाभ विस्तारित क्षेत्रातील असंरक्षित श्रमिकांना मिळण्यासाठी अंमलबजावणी यंत्रणेत सुलभता व काटेकोरपणा आणणे आवश्यक आहे.

**संदर्भ :**


१) पन्नालाल खुराणा, *'लोकशाही समाजवादाचा आर्थिक कार्यक्रम' साधना,* वर्षारंभ विशेषांक (भाग १) १७/०८/२००२, पृ. १३,१४.

२) Manju Bhagat *'Povery & minimum Wages' 'The Indian Journal of Labour Economics'*, Vol. No. 4, 1997, Page No - 721 to 730.

३) संदर्भ: आर. एस. गडगे, *'प्रा. अमर्त्य सेन यांचे दुष्काळ, विषमता व दारिद्र विषयक विचार', योजना,* (जून, २००४), पृ. १७ ते १९.

४) महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियम व कल्याण) अधिनियम, १९६९., महाराष्ट्र सासन, विधी व न्याय विभाग, प्रकाशक: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, २००१

५) संदर्भ - श्री भालचंद्र केळकर, *'असंघटीत क्षेत्र कामगार कायदा होणार तरी कधी?'*, समाज प्रबोधन पत्रिका, (एप्रील, जून, २००८), पृ.१७९ ते १८२.

६) भारताचे संविधान, भारत सरकार, संचालक, मुद्रण व लेखन सामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रीत व प्रकात केले, २००६,

७) डॉ. प्रभाकर देशमुख, 'श्रमाचे अर्थशास्त्र', विद्या प्रकाशन, नागपूर, १९८७, पृ.१२८ ते १३५.

८) http://nceus.gov.in/Report_Bill_July_2007.htm

९) डॉ. अभिजित वैद्य, संस्थापक राष्ट्रीय प्रमुख - राष्ट्रीय आरोग्य सेना,*'अर्ध पोटी कष्टकऱ्यांचा आवाज'* आरोग्य सेनेचे सर्वेक्षण अध्ययन, प्रकाशक : श्री सत्यजित वैद्य, राष्ट्रीय आरोग्य सना.


- ※ -

# मराठवाड्यातील तेलबिया पिकांची संपादणुक

बी.के.शिंदे, एम.एस.साबळे, परभणी
अर्थशास्त्र विभाग, ज्ञानोपासक महाविद्यालय, जिंतूर

**प्रस्तावना :**

कोणत्याही देशाच्या आर्थिक विकास प्रक्रियेत शेतीला अनन्यसाधारण महत्त्व असते. शेती हा भारताच्या आर्थिक विकासाचा आधारस्तंभ आहे. सन १९५१ मध्ये देशातील शेती व आनुषंगिक उपक्रमात जवळपास ७० टक्के लोकांना रोजगार उपलब्ध झालेला होता, परंतु सन २००१ मध्ये शेतीचा एकूण रोजगारातील वाटा ५० टक्क्यापर्यंत खाली आला आहे. ह्यानंतरही हा वाटा घटत चालला आहे. असे असले तरी शेती हेच अजूनही बहुतांश लोकांना रोजगार प्राप्त करून देणारे एक महत्वाचे साधन आहे.

भारतीय लोकांच्या अन्नधान्याची वाढीव मागणी पूर्ण करण्याच्या दृष्टिकोनातून शेतीला महत्वाचे स्थान आहे. भारतासमोरील अन्नधान्याची समस्या सोडविण्यासाठी दर हेक्टरी उत्पादनात वाढ करणे आवश्यक आहे. लागवडीखालील क्षेत्रात वाढ करण्यास मर्यादा पडत असल्यामुळे शेतजमिनीच्या वापरासंबंधी योग्य नियोजन व लाभदायक पीक रचना निर्माण करण्याची गरज आहे.

परंपरागत पीक रचनेत शेतकरी उदरनिर्वाहासाठी शेती करीत असल्यामुळे त्याला आवश्यक असणाऱ्या सर्व वस्तूंचे तो उत्पादन करीत असे. परंतु अलिकडच्या काळात कृषि नियोजन व नवीन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शेतीमध्ये आमूलाग्र बदल घडून आला आहे. 'निर्वाह शेतीकडून' 'व्यापारीकृत शेती' असा प्रवास सुरू झाला आहे.

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत शेतमालाच्या निर्यातीला भरपूर वाव आहे. चहा, कॉफी, साखर, तेलबिया, तंबाखू, कापड, रबर, ताग, फळे, भाजीपाला इ. वस्तूंना निर्यातीच्या दृष्टिकोनातून महत्वाचे स्थान आहे. निर्यातीद्वारे प्राप्त होणारे परकीय चलन देशाच्या भांडवल निर्मितीसाठी वापरता येऊ शकते.

नवीन कृषि तंत्रज्ञानाच्या वापरामुळे पीक रचनेत बदल घडून येत आहेत. शेतकरी पारंपरिक पिकांऐवजी नगदी पिकांकडे वळत आहेत. मराठवाडा विभागातील तेलबिया पिकांच्या लागवडीखालील सरासरी क्षेत्र, उत्पादन व उत्पादकता यांच्या संपादणुकीचा (Performance) अभ्यास करणे हे या अभ्यासाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. ह्यासाठी मराठवाडा विभागाची निवड करण्यात आलेली आहे.

प्रस्तुत अभ्यासासाठी मराठवाडा विभागात घेतल्या जाणाऱ्या खरीप भुईमूग, उन्हाळी भुईमूग, एकूण भुईमूग, तीळ, करडई, सूर्यफूल, सोयाबीन व एकूण तेलबिया अशा एकूण आठ पिकांची निवड करण्यात आलेली आहे. अभ्यासासाठी सन १९६०-६१ ते २०००-०१ हा ४१ वर्षांचा कालखंड लक्षात घेतला असून पिकांची संपादणूक अभ्यासण्यासाठी या कालावधीची मांडणी I, II, III व IV या चार कालावधीत केलेली आहे. प्रथम कालावधी सन १९६०-६१ ते १९६६-६७ (हरितक्रांतिपूर्व कालावधी), द्वितीय कालावधी सन १९६७-६८ ते सन १९७९-८० (हरितक्रांतिचा कालावधी), तृतीय कालावधी सन १९८०-८१ ते सन २०००-०१ (हरितक्रांतिनंतरचा कालावधी) आणि चतुर्थ कालावधी सन १९६०-६१ ते सन २०००-०१ (अभ्यासाचा एकूण कालावधी) आहे. हा अभ्यास प्रामुख्याने द्वितीयक सामग्रीवर आधारलेला असून ती सामग्री महाराष्ट्र शासनाच्या सिझन अ‍ॅन्ड क्रॉप रिपोर्ट व महाराष्ट्राची कृषि सांख्यिकी विषयक माहिती भाग १ व भाग २ मधून प्राप्त केलेली आहे. विश्लेषणासाठी संयुक्त अभिवृध्दि दर (Compound Growth Rate) आणि सहसंबंध गुणक Co-rrelation Co-efficient) या सांख्यिकीय साधनांचा वापर करण्यात आलेला आहे. संयुक्त अभिवृध्दि दर अभ्यास कालावधीतील सरासरी वार्षिक शेकडा प्रमाण दर्शवितात. संयुक्त अभिवृध्दी दर सांख्यिकीच्या अर्थपूर्णता पातळीला (Level of significance) महत्वपूर्ण आहेत किंवा नाहीत ते तपासण्यासाठी सहसंबंध गुणक (r) मूल्यांची तक्त्यातील मूल्यांशी तुलना केलेली आहे.

## मराठवाड्यातील तेलबिया पिकांची संपादणूक :

तक्त्यात मराठवाडा विभागात घेतल्या जाणाऱ्या खरीप भुईमूग, उन्हाळी भुईमूग, एकूण भुईमूग, तीळ, करडई, सूर्यफूल, सोयाबीन व एकूण तेलबिया अशा एकूण आठ पिकांच्या लागवडीखालील क्षेत्र (Area), उत्पादन (Production), आणि उत्पादकतेची (Productivity) संपादणूक (Performance) दर्शविलेली आहे.

### १) खरीप भुईमूग :

हरितक्रांतिपूर्व कालावधीत (I) भुईमूग या पिकाच्या क्षेत्रात सरासरी वार्षिक -०.७० टक्के

या संयुक्त अभिवृध्दि दराने घट झालेली आहे. खरीप भुईमूगाच्या उत्पादनात व उत्पादकतेत सुध्दा घट झालेली आहे. ती अनुक्रमे सरासरी वार्षिक -११.४० टक्के व -११.२९ टक्के या दराने झालेली आहे. ही घट कमी पर्जन्यमान व पर्जन्यमानातील अनियमितता यामुळे झालेली आहे. उत्पादकतेतील घट ही सांख्यिकीच्या ५ टक्के या अर्थपूर्णता पातळीला महत्वपूर्ण आहे. हरितक्रांतिच्या कालावधीत (II) खरीप भुईमूग या पिकाच्या क्षेत्रात सरासरी वार्षिक -५.१८ टक्के, उत्पादनात सरासरी वार्षिक -५.६२ टक्के आणि उत्पादकतेत सरासरी वार्षिक -०.६० टक्के या संयुक्त अभिवृध्दि दराने घट झालेली आहे. यास पर्जन्यमानातील अनियमिततेमुळे शेतकऱ्यांचे पिकाकडे होणारे दुर्लक्ष हे कारण कारणीभूत आहे. हरितक्रांति नंतरच्या (III) कालावधीत खरीप भुईमूग या पिकाच्या क्षेत्रात सरासरी वार्षिक -३.३५ टक्के, उत्पादनात सरासरी वार्षिक -५.३६ टक्के आणि उत्पादकतेत सरासरी वार्षिक -२.६० टक्के या संयुक्त अभिवृध्दि दराने घट झालेली आहे. क्षेत्र व उत्पादनातील घट ही सांख्यिकीच्या १ टक्का या अर्थपूर्णता पातळीला महत्वपूर्ण आहे. या कालावधीत नवीन कृषि तंत्रज्ञानाचा फारसा प्रभाव पडलेला दिसून येत नाही. अभ्यासाच्या एकूण कालावधीत (IV) खरीप भुईमूग या पिकाच्या क्षेत्रात सरासरी वार्षिक -४.६६ टक्के, उत्पादनात सरासरी वार्षिक -४.७४ टक्के आणि उत्पादकतेत सरासरी वार्षिक ०.२५ टक्के या दराने वाढ झालेली आहे. या कालावधीत क्षेत्र व उत्पादनात आलेली घट ही सांख्यिकीच्या १ टक्का या अर्थपूर्णता पातळीला महत्वपूर्ण आहे.

वरील विश्लेषणावरून असे स्पष्ट होते की, चारही कालावधीत खरीप भुईमूगाच्या क्षेत्रात, उत्पादनात व उत्पादकतेत घट झालेली आहे. यास प्रामुख्याने पर्जन्यमानातील अनियमितता व उत्पादनातील मोठ्या प्रमाणावरील घट कारणीभूत आहे.

### २) उन्हाळी भुईमूग :

उन्हाळी भुईमूग या पिकाच्या बाबतीत पहिल्या दोन कालावधीतील चित्र निराशाजनक आहे. परंतु त्यानंतर म्हणजेच हरितक्रांति नंतरच्या (III) व अभ्यासाच्या एकूण कालावधीत (IV) या पिकाच्या लागवडीखालील क्षेत्र, उत्पादन व उत्पादकतेच्या वृध्दिदरात लक्षणीय बदल झालेला आहे. हरितक्रांति नंतरच्या कालावधीत (III) उन्हाळी भुईमूग या पिकाच्या क्षेत्रात सरासरी वार्षिक ४.३१ टक्के, उत्पादनात १५७.६९ टक्के आणि उत्पादकतेत १७८.०१ टक्के या संयुक्त अभिवृध्दी दराने वाढ झालेली आहे. उत्पादन व उत्पादकतेत झालेली वाढ ही सांख्यिकीच्या १ टक्का या अर्थपूर्णता पातळीला महत्वपूर्ण आहे. अभ्यासाच्या एकूण कालावधीत (IV) उन्हाळी भुईमूग या पिकाच्या क्षेत्रात सरासरी वार्षिक ६५.८४ टक्के, उत्पादनात सरासरी वार्षिक ६५.३५ टक्के आणि उत्पादकतेत सरासरी वार्षिक

७०.३० टक्के या संयुक्त अभिवृध्दि दराने वाढ झालेली आहे. उत्पादन व उत्पादकतेत झालेली वाढ ही सांख्यिकीच्या १ टक्का या अर्थपूर्णता पातळीला महत्वपूर्ण आहे. सिंचन सुविधा, अधिक उत्पादन देणाऱ्या जातींच्या बी-बियाणांची उपलब्धता, रासायनिक खते यांचा वापर यामुळे उन्हाळी भुईमूगाचे क्षेत्र, उत्पादन व उत्पादकतेत अनुकूल बदल घडून आलेले आहेत.

## ३) एकूण भुईमूग :

एकूण भुईमूगाच्या बाबतीत पहिल्या दोन कालावधीतील चित्र खरीप भुईमूगासारखेच दिसून येते. म्हणजेच या दोन्ही कालावधीत एकूण भुईमूगाचे क्षेत्र, उत्पादन व उत्पादकतेचे संयुक्त अभिवृध्दि दर ऋणात्मक आहेत. हरितक्रांतिपूर्व कालावधीत (I) भुईमूगाच्या लागवडीखालील क्षेत्रात सरासरी वार्षिक -०.७० टक्के, उत्पादनात -११.४० टक्के आणि उत्पादकतेत -११.२९ टक्के या संयुक्त अभिवृध्दि दराने घट झालेली आहे. उत्पादकतेत झालेली घट सांख्यिकीच्या ५ टक्के या अर्थपूर्णता पातळीला महत्वपूर्ण आहे. हरितक्रांतिच्या कालावधीत (II) एकूण भुईमूग या पिकाचे क्षेत्र सरासरी वार्षिक -५.६२ टक्के, उत्पादन सरासरी वार्षिक -१.२३ टक्के आणि उत्पादकता -१.८० टक्के या दराने घटलेली आहे. हरितक्रांति नंतरच्या (III) कालावधीत एकूण भुईमूगाच्या लागवडीखालील क्षेत्रात सरासरी वार्षिक -१.८० टक्के व उत्पादनात -१.२८ टक्के या संयुक्त अभिवृध्दि दराने घट झालेली आहे. तर उत्पादकतेत सरासरी वार्षिक ०.७४ टक्के या दराने वाढ झालेली आहे. अभ्यासाच्या एकूण कालावधीत (IV) एकूण भुईमूगाच्या क्षेत्रात सरासरी वार्षिक -३.१८ टक्के व उत्पादनात -२.२२ टक्के दराने घट झालेली आहे, तर उत्पादकतेत सरासरी वार्षिक १.२६ टक्के या दराने वाढ झालेली आहे. यास सिंचन सुविधेतील वाढ, नवीन प्रजातींची बी-बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशक ओषधींचा वापर कारणीभूत ठरला आहे. क्षेत्र, उत्पादन, उत्पादकतेतील वाढ सांख्यिकीच्या १ टक्का या अर्थपूर्णता पातळीला महत्वपूर्ण आहे.

## ४) तीळ :

हरितक्रांतिपूर्व कालावधीत (I) तीळ या पिकाच्या क्षेत्रात सरासरी वार्षिक २.५२ टक्के, उत्पादनात ३.४१ टक्के व उत्पादकतेत ०.५६ टक्के या संयुक्त अभिवृध्दि दराने वाढ झालेली आहे. कमी पर्जन्यमानात येणारे पीक असल्यामुळे ही वाढ घडून आलेली आहे. क्षेत्र व उत्पादनात झालेली वाढ ही सांख्यिकीच्या ५ टक्के या अर्थपूर्णता पातळीला महत्वपूर्ण आहे. हरितक्रांतिच्या कालावधीत (II) तीळाच्या क्षेत्रात सरासरी वार्षिक १.२३ टक्के, उत्पादनात ४.१६ टक्के आणि उत्पादकतेत २.६६ टक्के या दराने अनुकूल बदल घडून आलेला आहे. संशोधित बी-बियाणे, रासायनिक खतांचा वापर,

मशागतीच्या पध्दतीत बदल यामुळे तिळाच्या क्षेत्रातील वाढीचा दर अल्प राहून उत्पादकतेत वाढ झालेली आहे. हरितक्रांति नंतरच्या (III) कालावधीत मात्र तिळाच्या क्षेत्रात सरासरी वार्षिक -४७.७९ टक्के व उत्पादनात -४३.६२ टक्के या दराने प्रतिकुल बदल घडून आलेला असला तरी उत्पादकतेत मात्र ४७.०५ टक्के या दराने वाढ झालेली असून ती सांख्यिकीच्या १ टक्का या अर्थपूर्णता पातळीला महत्वपूर्ण आहे. वर उल्लेख केलेल्या तीन कारणांमुळे तिळाच्या उत्पादकतेत वाढ झालेली आहे. अभ्यासाच्या एकूण कालावधीत (IV) तिळाच्या क्षेत्रात सरासरी वार्षिक -१५.४७ टक्के, उत्पादनात -१३.२३ टक्के आणि उत्पादकतेत -१६.६२ टक्के या संयुक्त अभिवृध्दि दराने घट झालेली आहे. पर्जन्यमानाची अनिश्चितता, मनुष्यबळाची कमतरता, पर्यायी पिकांकडे शेतकऱ्यांचा कल यामुळे ही घट झालेली आहे.

### ५) करडई :

करडई हे रब्बी हंगामात घेतले जाणारे व दुर्लक्षित पीक असल्यामुळे हरितक्रांतिपूर्व कालावधीत (I) चित्र निराशाजनक आहे. हरितक्रांतिच्या काळात (II) मात्र करडईचे क्षेत्र, उत्पादन व उत्पादकता यात अनुक्रमे सरासरी वार्षिक २.५१ टक्के, १६२.२३ टक्के व १४७.४९ टक्के या संयुक्त अभिवृध्दि दराने वाढ झालेली असून ती समाधानकारक आहे. नवीन प्रजाती व नवीन कृषीतंत्रज्ञानाचा वापर याचा हा परिणाम आहे. या कालावधीत क्षेत्र, उत्पादन व उत्पादकता यात झालेली वाढ ही सांख्यिकीच्या ५ टक्के या अर्थपूर्णता पातळीला महत्वपूर्ण आहे. हरितक्रांतिनंतरच्या काळात (III) करडईचे क्षेत्र, उत्पादन व उत्पादकतेचे वृध्दि दर ऋण आहेत. अनियमित पर्जन्यमान, सिंचनासाठी पाण्याची कमतरता, मनुष्यबळाचा अभाव व पीक पध्दतीतील बदल यामुळे ही घट झालेली आहे. अभ्यासाच्या एकूण कालावधीत करडईचे क्षेत्र, उत्पादन व उत्पादकता यात धनात्मक वाढ झालेली असून ही वाढ सांख्यिकीच्या १ टक्का या अर्थपूर्णता पातळीला महत्वपूर्ण आहे. दरम्यानच्या काळात (II) सोयाबीन, सूर्यफूल, भुईमूग या तेलबिया पिकांचा अभाव असल्यामुळे शेतकऱ्यांनी तेलबिया म्हणून करडईवर अधिक लक्ष केंद्रित केल्याचे आढळून येते.

### ६) सूर्यफूल :

सूर्यफूल हे मराठवाड्याच्या पीक रचनेत नव्याने प्रविष्ट झालेले एक नगदी पीक आहे. हरितक्रांतिनंतरच्या (III) काळात या पिकाची लागवड मोठ्या प्रमाणावर सुरू झाली. त्यामुळे या कालावधीत या पिकाच्या क्षेत्रात सरासरी वार्षिक १०.७० टक्के तर उत्पादनात ३४.९६ टक्के या दराने वाढ झालेली आहे. ही वाढ सांख्यिकीच्या १ टक्का या अर्थपूर्णता पातळीला महत्वपूर्ण आहे. उत्पादकतेत सरासरी वार्षिक

२३.१२ टक्के या संयुक्त अभिवृध्दिदराने वाढ झालेली आहे. अभ्यासाच्या एकूण कालावधीतही (IV) या पिकाची संपादणूक समाधानकारक आहे. या कालावधीत या पिकाच्या क्षेत्रात सरासरी वार्षिक ८५.६६ टक्के, उत्पादनात ८१.९५ टक्के आणि उत्पादकतेत ७५.७७ टक्के या संयुक्त अभिवृध्दि दराने वाढ झालेली असून ही वाढ सांख्यिकीच्या १ टक्का या अर्थपूर्णता पातळीला महत्वपूर्ण आहे. समाधानकारक वृध्दिदरास नवीन कृषि तंत्रज्ञानाचा वापर कारणीभूत आहे.

### (७) सोयाबीन :

सोयाबीन हे सुध्दा पीकरचनेत नव्याने प्रविष्ट झालेले एक नगदी पीक आहे. मशागतीस सोपे व खात्रीशीर नगदी पीक यामुळे हरितक्रांति नंतरच्या कालावधीत (III) या पिकाची लागवड मोठ्या प्रमाणावर सुरू झाली. नवीन कृषि तंत्रज्ञानाचा वापर व आर्थिकदृष्ट्या किफायतशीर पीक यामुळे हरितक्रांति नंतरच्या कालावधीत (III) आणि अभ्यासाच्या एकूण कालावधीत (IV) या पिकाची संपादणूक समाधानकारक आहे. हरितक्रांति नंतरच्या कालावधीत (III) या पिकाच्या क्षेत्रात सरासरी वार्षिक ११८.२१ टक्के, उत्पादनात १७६.३५ टक्के आणि उत्पादकतेत १९५.३५ टक्के संयुक्त अभिवृध्दि दराने वाढ झालेली असून ही वाढ सांख्यिकीच्या १ टक्का या अर्थपूर्णता पातळीला महत्वपूर्ण आहे. अभ्यासाच्या एकूण कालावधीतील चित्रही असेच आहे.

### ८) एकूण तेलबिया :

हरितक्रांतिपूर्व कालावधीत (I) या पिकाच्या क्षेत्रात ०.११ दराने वाढ झालेली असली तरी उत्पादन व उत्पादकतेचे वृध्दिदर ऋणात्मक आहेत. हरितक्रांतिच्या काळात (II) या पिकाच्या क्षेत्रात ०.५६ टक्के, उत्पादनात सरासरी वार्षिक ०.४३ टक्के व उत्पादकतेत सरासरी वार्षिक ०.२३ टक्के या संयुक्त अभिवृध्दि दराने वाढ झालेली आहे. हरितक्रांति नंतरच्या (III) कालावधीत एकूण तेलबिया या पिकाच्या क्षेत्रात सरासरी वार्षिक १.०७ टक्के व उत्पादनात ०.०९ टक्के या दराने वाढ झालेली असली तरी उत्पादकतेत मात्र -१.०३ टक्के या दराने घट झालेली आहे. अभ्यासाच्या एकूण कालावधीत (IV) एकूण तेलबियाच्या क्षेत्रात सरासरी वार्षिक १.०२ टक्के, उत्पादनात २.४९ टक्के आणि उत्पादकतेत १.६५ टक्के संयुक्त अभिवृध्दि दराने वाढ झालेली असून ही वाढ सांख्यिकीच्या १ टक्का या अर्थपूर्णता पातळीला महत्वपूर्ण आहे.

### सारांश :

मराठवाड्यातील तेलबिया पिकांच्या संपादणुकीच्या अभ्यासावरून असे स्पष्ट होते की, अभ्यासाच्या चारही कालावधीत खरीप भुईमूग या पिकाच्या क्षेत्र, उत्पादन व उत्पादकतेचे वृध्दिदर ऋणात्मक असल्याचे आढळून आल्यामुळे या पिकांची संपादणूक समाधानकारक नाही. उन्हाळी

भुईमूग हे पीक प्रामुख्याने हरितक्रांतिनंतरच्या कालावधीत घेतले गेलेले पीक आहे. हरितक्रांतिनंतरच्या कालावधीत या पिकाचे क्षेत्र, उत्पादन व उत्पादकता यांचे संयुक्त अभिवृध्दि दर धनात्मक व सांख्यिकीयदृष्ट्या महत्वपूर्ण असल्याचे आढळून आल्यामुळे या पिकाची संपादणूक समाधानकारक आहे. एकूण भुईमूग या पिकाच्या क्षेत्र, उत्पादन व उत्पादकतेचे संयुक्त अभिवृध्दि दर सामान्यतः ऋणात्मक असल्याचे आढळून आल्यामुळे या पिकाची संपादणूक समाधानकारक झालेली नाही.

हरितक्रांतिपूर्व (I) आणि हरितक्रांतिच्या कालावधीत (II) तीळ या पिकाची संपादणूक आशादायक असली तरी नंतरच्या दोन्ही कालावधीत या पिकाची संपादणूक निराशाजनकच आहे. हरितक्रांतिच्या (II) व अभ्यासाच्या एकूण कालावधीत (IV) करडई या पिकाचे क्षेत्र, उत्पादन व उत्पादकता यांचे संयुक्त अभिवृध्दि दर धनात्मक आहेत. त्यामुळे या दोन कालावधीतील या पिकाची संपादणूक समाधानकारक आहे. परंतु उर्वरीत दोन्ही कालावधीत या पिकाची संपादणूक समाधानकारक नाही.

सूर्यफूल व सोयाबीन या पीकरचनेत नव्याने प्रविष्ट झालेल्या नगदी पिकांची संपादणूक समाधानकारक आहे. अभ्यासाच्या एकूण कालावधीत एकूण तेलबिया या पिकाची संपादणूक समाधानकारक असली तरी हरितक्रांतिपूर्व कालावधीचा अपवाद वगळता, उर्वरित कालावधीत वृध्दि दर जरी धनात्मक असले तरी संपादणूक तेवढी समाधानकारक नसल्याचे आढळून येते.

मराठवाडा विभागात सूर्यफूल, सोयाबीन व उन्हाळी भूईमूग या तेलबिया पिकांचे उत्पादन वाढविण्यास वाव आहे. यासाठी या पिकांचे उत्पादन व उत्पादकता वाढीस प्रोत्साहन देणाऱ्या घटकांवर लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे.

## मराठवाड्यातील तेलबिया पिकांच्या लागवडीखालील क्षेत्र, उत्पादन व उत्पादकतेची संपादणूक दर्शविणारा तक्ता

(वार्षिक संयुक्त अभिवृध्दि दर -C.G.R. )

| पीक | कालावधी - I | | | कालावधी - II | | | कालावधी - III | | | कालावधी - IV | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | A | P | Y | A | P | Y | A | P | Y | A | P | Y |
| खरीप भुईमूग | -०.७०<br>(-०.३४) | -११.४०<br>(-०.७५) | -११.२९*<br>(-०.७७) | -५.१८<br>(-०.९२) | -५.६२<br>(-०.४९) | -०.६०<br>(-०.०६) | -३.३५**<br>(-०.८७) | -५.३६**<br>(-०.७७) | -२.६०*<br>(-०.४६) | -४.६६**<br>(-०.९८) | -४.७४**<br>(-०.८७) | ०.२५<br>(०.०८) |
| उन्हाळी भुईमूग | -<br>(-) | -<br>(-) | -<br>(-) | ३७२.१२*<br>(०.८७) | -<br>(-) | -<br>(-) | ४.३१<br>(०.४१) | १५७.६९**<br>(०.७९) | १७८.०१**<br>(०.८१) | ६५.८४**<br>(०.८६) | ६५.३५**<br>(०.८१) | ७०.३०**<br>(०.८२) |
| एकूण भुईमूग | -०.७०<br>(-०.३४) | -११.४०<br>(-०.७५) | -११.२९*<br>(-०.७७) | -४.६८**<br>(-०.९१) | -५.६२<br>(-०.४९) | -१.२३<br>(-०.१२) | -१.८०*<br>(-०.४४) | -१.२८<br>(-०.११) | ०.७४<br>(०.२०) | -३.१८**<br>(-०.८१) | -२.२२**<br>(-०.५३) | १.२६**<br>(०.४२) |
| तीळ | २.४२*<br>(०.७९) | ३.४१*<br>(०.८१) | ०.५६<br>(०.३४) | १.२३<br>(०.३२) | ४.१६<br>(०.३२) | २.६६<br>(०.२८) | -४७.७९**<br>(-०.६५) | -४३.६२**<br>(-०.६३) | ४७.०५**<br>(-०.६७) | -१५.४७**<br>(-०.४४) | -१३.२३**<br>(-०.४२) | -१६.६२**<br>(-०.५०) |
| करडई | ०.७३<br>(०.२४) | -<br>(-) | -<br>(-) | २.५१*<br>(०.५७) | १६२.२३*<br>(०.६३) | १४७.४९*<br>(०.६३) | -१.४२<br>(-०.४१) | -२.७६<br>(-०.२९) | -२.२७<br>(-०.३३) | १.०६**<br>(०.५०) | ७१.१३**<br>(०.८५) | ७३.६६**<br>(०.८६) |
| सूर्यफूल | -<br>(-) | -<br>(-) | -<br>(-) | १३९.१८*<br>(०.६३) | -<br>(-) | -<br>(-) | १०.७०**<br>(०.७७) | ३४.९६**<br>(०.५२) | २३.१२<br>(०.३८) | ८५.६६**<br>(०.८१) | ८१.९५**<br>(०.८८) | ७५.७७**<br>(०.८७) |
| सोयाबीन | -<br>(-) | -<br>(-) | -<br>(-) | -<br>(-) | -<br>(-) | -<br>(-) | ११८.२१**<br>(०.७९) | १७६.३५**<br>(०.९०) | १९५.१८**<br>(०.८५) | ६२.१९**<br>(०.८५) | ५६.९८**<br>(०.८२) | ६५.३३**<br>(०.८१) |
| एकूण तेलबिया | ०.११<br>(०.१२) | -१०.०३<br>(-०.७४) | -११.०९*<br>(-०.७७) | ०.५६<br>(०.२७) | ०.४३<br>(०.०४) | ०.२३<br>(०.०२) | १.०७<br>(०.३०) | ०.०९<br>(०.०१) | -१.०३<br>(०.२०) | १.०२**<br>(०.६१) | २.४९**<br>(०.५०) | १.६५**<br>(०.४२) |

टीप : कंसातील आकडे सहसंबंध गुणक मूल्ये ('r' Values)(दर्शवितात). ** १ टक्का अर्थपूर्णता पातळी
* ५ टक्के अर्थपूर्णता पातळी

स्रोत : १. गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र : सिझन अँन्ड क्रॉप रिपोर्ट, महाराष्ट्र स्टेट, दि डायरेक्टर, गव्हर्नमेंट प्रिंटिंग, स्टेशनरी अँन्ड पब्लिकेशन, म.स्टेट, मुंबई.
२. कृषि आयुक्त : महाराष्ट्राची कृषि सांख्यिकीविषयक जिल्हावार माहिती, भाग १ व २, कृषि आयुक्तालय, म.राज्य, पुणे.

**संदर्भ :**

१. पाल, सुरेश ॲन्ड सिरोही, ए.एस.(१९८८) : *ॲनलिसिस ऑफ ग्रोथ ॲन्ड इन्स्टॅबिलिटि इन दि प्रॉडक्शन ऑफ कमर्शियल क्रॉप्स इन इंडिया*, इंडियन जर्नल ऑफ ॲग्रिकल्चरल इकॉनॉमिक्स, ४३ (३) : ४५६-४६३.

२. सिध्दू, जे.एस. ॲन्ड सिध्दू आर.एस. (१९८८) : *ग्रोथ ॲन्ड एरिया रिसपॉन्स ऑफ कमर्शियल क्रॉप्स इन पंजाब : सम पॉलिसी इश्यूज*, इंडियन जर्नल ऑफ ॲग्रिकल्चरल इकॉनॉमिक्स, ४३ (३) : ४७३-४८०.

३. अग्रवाल, एन.एल. (१९८८) : *कॉम्पोझिशन ऑफ कमर्शियल क्रॉप्स ॲन्ड ट्रेन्डस् इन ग्रोथ इन इरिया, प्रॉडक्शन ॲन्ड प्रॉडक्टिव्हिटि ऑफ ऑईल सीडस् इन राजस्थान*, इंडियन जर्नल ऑफ ॲग्रिकल्चरल इकॉनॉमिक्स, ४३ (३) : ५०४

४. शर्मा, एच. आर. (१९८८) *ट्रेन्डस् ॲन्ड व्हेरिॲबिलिटि इन एरिया, प्रॉडक्शन ॲन्ड यील्ड ऑफ कमर्शियल क्रॉप्स इन इंडियन ॲग्रिकल्चर*, इंडियन जर्नल ऑफ ॲग्रिकल्चरल इकॉनॉमिक्स,४३(३): ५०५-५०६

५. भोवमीक, बी. सी. ॲन्ड अहेमद, ए. यू. (१९९३) : *बिहेविअर ऑफ ट्रेन्ड ॲन्ड ग्रोथ ऑफ एरिया, प्रॉडक्शन, प्रोडक्टिव्हिटी ॲन्ड सप्लाय रिस्पॉन्स ऑफ मेजर ऑईलसीडस् इन आसाम*, ॲग्रिकल्चरल सिच्युएशन इन इंडिया, ४८ (१) : ३-७

६. वाघमारे, पी.आर. ॲन्ड काटेपल्लेवार बी. एम. (१९९३) : *डिस्ट्रिक्टवाईस् ट्रेन्डस् इन एरिया, प्रॉडक्शन, प्रोडक्टिव्हिटी ॲन्ड ऑईल सीडस् इन महाराष्ट्र स्टेट, १९८०-८१ टू १९८९-९०*, इंडियन जर्नल ऑफ ॲग्रिकल्चरल कॉनॉमिक्स,४८(३):४२५

७. पाटील, एच. एन. (१९९७) : *रीजनल डिस्पॅरीटिज इन ॲग्रिकल्चरल डॅव्हलपमेंट इन महाराष्ट्र स्टेट*, ॲग्रोस्को रिपोर्ट, १.

८. जोशी,एस.एन. (१९९८) : *लिबरलायझेशन पॉलिसी ॲन्ड क्रॉपिंग रिस्पॉन्सेस*, अन्वेषक, २८(२) : २५-३३.

९. भैरट, ए.बी. (२००८) : *ए स्टडि ऑफ कपिंग पॅटर्न इन महाराष्ट्र*, अनपब्लिशड पीएच.डी. थिसीस, स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड, ३०६-३४८.

- * -

# 'अर्थसंवाद' चे लेखक व्हा !

*सारं जगच पैशामागं धावतय्..... अर्थव्यवस्थेचं यश -अपयश पैशाच्या मोजपट्टीनं मोजलं जातय्... अर्थव्यवस्थेच्या विकासदराचा आकडा कसा आहे? सिंगल आहे की डबल? हे कायमच महत्त्वाचं असतं. राष्ट्रीय उत्पन्न अन् राष्ट्रीय कर्ज खूप काही सांगून जातं... तसे आर्थिक विषय बरेच आहेत, अनेक वेळा मनाच्या पातळीवर लिहिण्याचा विचार झालेला.... आर्थिक, सैध्दान्तिक, नवीन संकल्पना, नवं संशोधन.... असं काही ना काही अनेकांपर्यंत पोचावं असं वाटतं ना? तर मग उचला लेखणी अन् व्यक्त करा आपले विचार.... 'अर्थसंवाद' च्या माध्यमातून.... तुमच्या लेखनाचं इथं स्वागत आहे....*

**फक्त एवढंच् करा....**

- लेखकांनी आपला शोधनिबंध Shree-Dev7-2336 या फॉन्टमध्ये PageMaker 6.5 / 7 या सॉफ्टवेअरमध्ये टाईप करावा. फॉन्ट साईझ 14 असावी. कागदाचा आकार 7 X 9.5 इंच घेऊन टॉप लेफ्ट व राईट मार्जीन 0.8 व बॉटम मार्जीन 1.0 इंच याप्रमाणे सोडाव्यात. लेखातील टेबल्स सामान्यपणे अर्धा ते पाऊण कागद आकारापेक्षा मोठे नकोत.
- दोन हार्ड कॉपीज् व एक सॉफ्ट कॉपी (सीडी) प्रमुख संपादकाकडे त्वरीत पाठवावी.
- शोधनिबंध पूर्वमुद्रित नसावा. त्यामध्ये कॉपीराईटचा भंग न करता संदर्भाचा उल्लेख करावा. आजीव सदस्य क्रमांक, मोबाईल क्रमांक लिहावा.
- शोध निबंध खास अर्थसंवादसाठीच लिहिलेला असावा. माहिती व आकडेवारी अद्ययावत असावी. लेखांची गुणवत्ता पाहून प्रसिध्दीसाठी निवड केली जाईल.
- भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या अर्थशास्त्र परिभाषा कोश यातील परिभाषेचा शक्यतो उपयोग करावा.
- लेखनाची एक प्रत स्वत:जवळ अवश्य ठेवावी.

- अविनाश रामलाल निकम

प्रमुख संपादक, अर्थसंवाद.

# आठवडा बाजार - ग्रामीण व्यापाराचे केंद्र

सुनिता एस. राठोड, कोल्हापूर,
श्री शहाजी छ. महाविद्यालय.

भारतीय अर्थव्यवस्थेत आजही शेतीचे स्थान महत्त्वाचे आहे. कारण अन्नधान्याचा पुरवठा आणि उद्योगांना कच्च्या मालाचा पुरवठा शेती क्षेत्राकडूनच केला जातो. भारताची लोकसंख्याही सतत वाढत आहे. अशा वाढत्या लोकसंख्येला अन्नधान्याचा पुरवठा करण्यासाठी शेतीची उत्पादकता वाढणे गरजेचे आहे. यासाठी भारतीय शेतकऱ्यांनीही शेतीच्या उत्पादकतेच्या वाढीकडे विशेष लक्ष दिले पाहिजे, ही काळाची गरज आहे. यासाठी शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती विचारात घेणे महत्त्वाचे ठरते.

ग्रामीण भागातील लोक आपल्या गरजा भागविण्यासाठी आठवडा बाजारात खरेदी करतात. डोंगरी भागात बाजार गावापासून जवळच लहान-लहान वाड्या आहेत. त्या आठवडा बाजारातच आठवड्यासाठी लागणाऱ्या वस्तुंची खरेदी करतात. आठवडा बाजार खरेदीवर आणि विक्रेते यांना एकत्र आणणारे ठिकाणच आहे. लहान-लहान शेतकरी भाजीपाला पिके घेवून त्याची विक्री जवळच्या आठवडा बाजारात करतात. त्यामधून जो पैसा मिळतो त्यामधून आवश्यक वस्तुंची खरेदी करतात आणि शिल्लक राहणारे पैसे साठवून ठेवतात आणि त्याचा उपयोग मुलांचे शिक्षण, लग्न समारंभ यावर खर्च करतात. शेतीच्या मशागतीसाठी त्यामधूनच तरतूद केली जाते.

ग्रामीण भागांचा विकास व्हावयाचा असेल तर शेती उत्पादनाची विक्री झाली पाहिजे. त्यासाठी आठवडा बाजार हे मध्यवर्ती ठिकाण आहे. परंतु आठवडा बाजारात त्यांना काही समस्यांना तोंड द्यावे लागते. त्या समस्या अभ्यासून त्यांच्यावर योग्य अशी उपाययोजना सुचवून त्याचा जास्तीत जास्त फायदा विक्रेत्यांना आणि खरेदीदारांना कसा मिळेल याचा अभ्यास करून आठवडा बाजाराचे एक आदर्श मॉडेल कसे बनेल ते सुचविण्यासाठी हा विषय निवडला आहे.

### संशोधनाचे उद्देश:

१) कोल्हापूर जिल्ह्यातील आठवडा बाजारांची कार्यपद्धती अभ्यासणे.

२) नमुना निवड विक्रेत्यांच्या आर्थिक उलाढालीचा अभ्यास करणे.

३) आठवडा बाजारातील आर्थिक उलाढाल वाढण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

**संशोधनाची गृहितके**

संशोधनासाठी पुढील गृहितके निश्चित केलेली आहेत.

१) आठवडा बाजारांचा विकास करण्यासाठी ग्रामपंचायतीकडून प्रयत्न केले जात नाहीत.

२) मागासलेपणा आणि शेतीची कमी उत्पादकता यामुळे डोंगराळ भागातील लोक दैनंदिन गरजा भागविण्यासाठी आठवडा बाजारातच खरेदी करतात.

**संशोधन पद्धती:**

संशोधक पश्चिम महाराष्ट्र आणि कोल्हापूर जिल्ह्यातील रहिवाशी आहे. त्यामुळे कोल्हापूर जिल्हा संशोधनासाठी निवडण्यात आला आहे. जिल्ह्यात एकूण १२ तालुके आहेत. यामध्ये डोंगराळी भाग आणि पठारी भाग समाविष्ट आहे. चंदगड विभाग हा डोंगराळ तर करवीर भाग हा पठारी आहे. या प्रत्येक विभागातून चार याप्रमाणे आठ तालुक्यांची निवड केलेली आहे. त्या तालुक्यातील १८ आठवडा बाजारांची रॅण्डम पद्धतीने निवड करून बाजारादिवशी त्यांना भेटी दिल्या आणि ग्राहक, विक्रेते आणि ग्रामपंचायत यांच्याकडून प्रश्नावलीद्वारे माहिती मिळविण्यात आली. सदर अभ्यासासाठी सन २००८-०९ हा एक वर्षाचा कालावधी विचारात घेण्यात आलेला आहे.

डोंगराळ आणि पठारी भागात जमीन, पावसाचे प्रमाण, हवामान, पाणी पुरवठ्याची सोय यामध्ये निश्चितच वेगळेपणा आहे. त्यामुळे संशोधकाने आठवडा बाजारास प्रत्यक्ष भेटी देऊन वास्तव माहिती प्रश्नावलीद्वारे आणि निरीक्षणाद्वारे मिळविली आहे. त्यामुळे हा संशोधन प्रबंध निश्चितच मार्गदर्शक ठरेल.

संशोधकाने तालुकावार एकूण बाजार आणि निवड नमुना बाजार यांची माहिती देण्यासाठी त्यांचे वर्गीकरण पुढील तक्त्यात दाखविले आहे.

**निवड केलेले आठवडे बाजार (तक्ता क्र.१)**


| अ.नं. | तालुका | एकूण आठवडी बाजार | नमुना निवड बाजार |
|---|---|---|---|
| १) | करवीर | ४ | १ |
| २) | कागल | १० | ३ |
| ३) | हातकणंगले | १३ | ३ |
| ४) | शिरोळ | १० | ३ |
| ५) | आजरा | ३ | १ |
| ६) | भुदरगड | ३ | १ |
| ७) | गडहिंग्लज | ९ | ३ |
| ८) | चंदगड | ९ | ३ |
| एकूण | | ६१ | १८ |

संदर्भ: *प्रत्यक्ष पाहणीवरून*

तक्ता क्र.१ वरून असे दिसून येते की, निवडलेल्या ८ तालुक्यात एकूण ६१ आठवडा बाजार आहेत. त्यांची तालुका निहाय संख्या दाखविण्यात आली आहे. त्यामधून तालुकानिहाय नमुना निवड करून तीही तक्त्यात दाखविली आहे. ते एकूण १८ असून ते २५.५१ टक्के इतके आहेत.

पुढील तक्त्यातील माहिती तुलनात्मकदृष्ट्या खालील आलेखाद्वारे दाखविण्यात आलेली आहे.

**निवड केलेले आठवडे बाजार (आकृती क्र.१)**




**नमुना निवड बाजार**

संशोधनासाठी आवश्यक असणारी माहिती मिळविण्यासाठी एकूण ९० विक्रेते, ९० खरेदीदार आणि १८ ग्रामपंचायतीची निवड करून त्यांच्याकडून प्राथमिक स्वरूपाची माहिती मुलाखतीद्वारे मिळविली आहे. त्याचप्रमाणे प्रकाशित पुस्तके, ग्रामपंचायत कार्यालये, सरकारी कार्यालयांच्या दप्तरातील माहिती याद्वारे माहिती मिळवून तीचे संकलन केले आहे.

आठवडा बाजारातून, ग्रामपंचायतीकडून आणि संबंधित सरकारी कार्यालयाकडून जी माहिती आणि त्या संदर्भातील आकडेवारी मिळविली आणि तिचे वर्गीकरण करून पृथःकरणासाठी सरासरी, टक्केवारी आणि रेंज या सुत्रांचा वापर करण्यात आला आहे.

**संशोधनाच्या मर्यादा**

१) संशोधनासाठी फक्त ग्रामीण भागच विचारात घेतला आहे.

२) फक्त २५.५१ टक्के आठवडा बाजार नमुना निवड म्हणून विचारात घेतले आहेत.

३) संशोधनासाठी दुय्यम स्वरूपाची सामुग्री फारशी उपलब्ध नाही.

४) संशोधनासाठी फक्त किरकोळ विक्रेते आणि खरेदीदार विचारात घेतले आहेत.

**आठवडा बाजाराबाबतची कार्ये:**

बाजार दिवशी नमुना निवड केलेल्या प्रत्येक आठवडा बाजाराला भेटी दिल्या. तेथील स्थिती प्रत्यक्षात पाहिल्यानंतर असे निदर्शनास आले की, आठवडा बाजारासाठी आवश्यक असणाऱ्या सुविधा बऱ्याच ठिकाणी नव्हत्या. त्या मिळाव्यात म्हणून ग्रामपंचायतीने यामध्ये पुढाकार घेवून बाजारासाठी सर्वसाधारणपणे पुढील कार्ये केली पाहिजेत असे वाटते.

१) आठवडा बाजारात उत्तम दर्जाचा माल विकला जाईल, याकडे लक्ष देणे.

२) बाजार जागेची स्वच्छता ठेवणे.

३) पार्कींगची सोय करणे.

४) जिल्हापरिषदेला आठवडा बाजारासंबंधी आवश्यक माहिती पुरविणे.

५) बाजारादिवशी बंदोबस्तासाठी पोलीस बोलाविणे.

६) गटाराची स्वच्छता राखणे.

सर्वसाधारणपणे वरील प्रकाराची कार्ये केलीत तर तो आठवडा बाजार एक आदर्श आठवडा बाजाराचा नमुनाच ठरेल.

**आठवडा बाजाराची कार्यपद्धती:**

संशोधनासाठी नमुना निवड केलेल्या बाजार गावात कोणत्या दिवशी बाजार भरतो त्याची माहिती वजन-मापे तपासणी कार्यालय कोल्हापूर यांच्याकडून मिळविली. ती पुढील तक्त्यात नमूद केली आहे.

**तक्ता क्र. २**

**बाजाराचा वार आणि संख्या**

| अ.नं. | बाजाराचा दिवस | बाजार किती वेळा भरतो ? | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | सोमवार | ३ | १६.६७ |
| २) | मंगळवार | ३ | १६.६७ |
| ३) | बुधवार | ४ | २२.२२ |
| ४) | गुरुवार | ५ | २७.७८ |
| ५) | शुक्रवार | ० | ०.०० |
| ६) | शनिवार | १ | ५.५५ |
| ७) | रविवार | २ | ११.११ |
| एकूण | | १८ | १०० |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, गुरुवार या दिवशी जास्त बाजार भरत आहेत. त्यांची संख्या ५ इतकी आहे. तर शनिवार या दिवशी कमी बाजार भरतात. त्यांची संख्या १ इतकी आहे. तर शुक्रवारी एकही बाजार भरत

नसल्याचे आढळून आले आहे. बाजार दिवस निश्चित करत असताना ग्रामपंचायत जवळच्या बाजाराचा दिवस विचारात घेवूनच दुसऱ्या दिवशी बाजार भरवित असल्याचे आढळून आले.

**नमुना निवड बाजारांची आर्थिक उलाढाल**

संशोधकाने आठवडा बाजारादिवशी बाजार गावात भेटी दिल्या आणि ग्रामपंचायतीकडून बाजार दिवशीच्या आर्थिक उलाढाली बाबतची माहिती मिळविली. ती आठवडा बाजाराप्रमाणे, तालुक्याप्रमाणे आणि विभागाप्रमाणे वर्गीकरण करून पुढील तक्त्यात नमूद केली आहे.

या तक्त्यामध्ये संशोधकाने आठवडा

**बाजार गावं, तालुका, विभाग नुसार नमुना निवड बाजारांची आर्थिक उलाढाल**

| आठवडी बाजार | बाजार दिवसाची आर्थिक उलाढाल | टक्केवारी | तालुकावार आर्थिक उलाढाल | टक्केवारी | विभागवार आर्थिक उलाढाल | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १) हळदी | ७०,००० | ०.९३ | करवीर ७०,००० | ०.९३ | | |
| २) बाचणी | १,८०,००० | २.३९ | कागल | ४.१२ | | |
| ३) सुळकुड | ५०,००० | ०.६७ | ३१०००० | | | |
| ४) क. सांगाव | ८०,००० | १.०६ | | | | |
| ५) पट्टणकोडोली | १,५०,००० | १.९९ | हातकणंगले | ५.१८ | करवीर विभाग ११२०००० | १४.७५ |
| ६) कुंभोज | २,००,००० | २.६६ | ३९०००० | | | |
| ७) टोप | ४०,००० | ०.५३ | | | | |
| ८) अ. लाट | १,५०,००० | १.९९ | शिरोळ | ४.५२ | | |
| ९) नांदणी | १,१०,००० | १.४६ | ३,४०,००० | | | |
| १०) दानोळी | ८०,००० | १.०६ | | | | |
| ११) उत्तुर | ४,००,००० | ५.३२ | आजरा ४,००,००० | ५.३२ | | |
| १२) कूर | १,५०,००० | १.९९ | भुदरगड १५,००० | १.९९ | | |
| १३) नरेवाडी | १०,००० | ०.१३ | गडहिंग्लज | ३.५५ | | |
| १४) नेसरी | २,५०,००० | ३.३२ | २,६७,००० | | चंदगड विभाग ६४०७००० | ८५.२५ |
| १५) बटकणंगले | ७,००० | ०.०९ | | | | |
| १६) तुर्केवाडी | २,००,००० | २.६६ | चंदगड | ७४.३९ | | |
| १७) कोवाड | ४,००,००० | ५.३२ | ५,६०,०००० | | | |
| १८) चंदगड | ५०,००,००० | ६६.४३ | | | | |
| एकूण | ७५,२७,००० | १०० | ७५,२७,००० | १०० | ७५,२७,००० | १०० |

संदर्भ: प्रत्यक्ष पाहणीवरून

आकृती क्र.२




**बाजार गावं, तालुका, विभाग नुसार नमुना निवड बाजारांची आर्थिक उलाढाल**

| | आठवडे बाजार | तालुका | विभाग |
|---|---|---|---|
| कमीत कमी | बटकणंगले रु.७०००/- | करवीर रु.७००००/- | करवीर रु.१११००००/- |
| जास्तीत जास्त | चंदगड रु.५००००००/- | करवीर रु.५६०००००/- | करवीर रु.६४१७०००/- |

बाजारानुसार, तालुक्यानुसार, विभागानुसार एकूण आर्थिक उलाढालीचे वर्गीकरण करून त्यामधून कोणत्या आठवडा बाजाराची, तालुक्याची आणि विभागाची आर्थिक उलाढाल जास्त आणि कमी आहे ते दाखविले आहे. त्यानुसार बटकणंगले आठवडा बाजार, करवीर तालुका आणि करवीर विभाग यांची उलाढाल कमी तर चंदगड तालुका बाजार, चंदगड तालुका आणि चंदगड विभाग यांची आर्थिक उलाढाल जास्त असल्याचे दिसून येते. ते अधिक स्पष्टपणे कळण्यासाठी पायचार्ट द्वारे दाखविले आहे.

हे असे सुचित करते की, चंदगड विभाग हा पूर्णपणे डोंगराळ आहे. तेथील शेतीची उत्पादकता कमी आहे आणि तेथील लोक त्यांच्या दैनंदिन गरजा भागविण्यासाठी आठवडा बाजारावर अवलंबून आहे. त्यामुळे त्या विभागाची आर्थिक उलाढाल जास्त असल्याचे दिसून येते. याउलट बटकणंगले गाव लहान आहे. शेजारच्या तीन गावचे लोकच बाजारासाठी येतात. ते दूर डोंगरात आहे त्यामुळे व्यापारी सुद्धा येत नाहीत. म्हणून उलाढाल कमी होते. त्याचप्रमाणे करवीर तालुका आणि करवीर विभाग हा कोल्हापूर शहरास लागून आहे. त्यामुळे बरीच खरेदी कोल्हापूर येथूनच

बाजार केला जातो. म्हणून त्याची आर्थिक उलाढाल कमी असल्याचे दिसून येते.

**आठवडा बाजारापुढील समस्या:**

१८ आठवडा बाजारांना भेटी दिल्यानंतर आणि तेथील परिस्थितीचा आढावा घेतल्यानंतर असे दिसून आले की, कोणताही बाजार सर्व सोयीने परिपूर्ण नाही. आजही त्या आठवडा बाजारांना काही मूलभूत समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. त्या समस्या पुढीलप्रमाणे दिसून आल्या:

१) आठवडा बाजारांना वेगळी अशी जागा नाही.
२) अपुरा पाणी पुरवठा
३) बाजार कट्टा आणि शेड नाही.
४) कचरा कुंड्या नाहीत.
५) बाजाराभोवती संरक्षक भिंत नाही.
६) बाजार कर गोळा करताना बऱ्याचवेळा विक्रेते आणि कर्मचारी यांच्यामध्ये वाद होतो.
७) वजन-मापे व्यवस्थित नाहीत.
८) विक्रेते भेसळ करतात ते थांबविणे एक मोठी समस्याच आहे.
९) मालाची प्रतवारी केली जात नाही.

वरील समस्या सोडविणे गरजेचे आहे. कारण त्यामुळेच बाजारात चांगली उलाढाल होईल. त्यामुळे या समस्या सोडविण्यासाठी प्राथमिकता देणे गरजेचे आहे.

**निष्कर्ष:**

सर्व अभ्यासाअंती संशोधकाने काही निष्कर्ष काढले आहेत. ते पुढीलप्रमाणे आहेत.

१) बरेच विक्रेते काही ठराविक आठवडा बाजारात जातात.
२) काही विक्रेते स्वत:चे वाहन घेऊन बाजारात जातात.
३) सामान्य शेतकरी वर्गातील विक्रेते एस.टी., सायकल, मोटर सायकलद्वारे बाजारात येतात.
४) शेतकऱ्यांचा भाजीपाला नाशवंत असतो त्यामुळे ते संपूर्ण भाजीपाला विकण्याचा प्रयत्न करतात.
५) आठवडा बाजार ही नातेवाईकांना एकमेकांना भेटण्याचे महत्त्वाचे ठिकाण झाले आहे.
६) स्त्री विक्रेते हे पुरुष विक्रेत्यापेक्षा अधिक सफाईदारपणे विक्री करतात.
७) जागेची स्वच्छता ठेवली जात नाही.
८) बरेच बाजार हे रस्त्याच्या कडेला गावातील गल्लीत भरत होते.
९) बरेच विक्रेते भाजी वजनाऐवजी ढीग करून विकत होते.

**उपाययोजना:**

संशोधकाने जे निष्कर्ष काढले आहेत त्याच्या आधारे काही उपाय योजनाही सुचविल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे आहेत.

१) बाजार भरण्यापूर्वी ग्रामपंचायतीने त्या जागेवर पाणी फवारणे गरजेचे आहे. त्यामुळे धुळ उडणार नाही.

२) डासांमुळे अनेक आजार होतात. त्याच्यापासून लोकांचे संरक्षण झाले पाहिजे म्हणून किटक नाशकांची फवारणी केली पाहिजे. गटारव्यवस्थाही व्यवस्थित ठेवली पाहिजे.

३) खाद्य पदार्थांवर माशा बसतात. ते पदार्थ लोक खातात. खाद्य पदार्थ विक्रेत्याने ते झाकून ठेवावेत. त्यामुळे साथीचे रोग होणार नाहीत.

४) महत्त्वाच्या सूचना सूचना-फलकावर लावाव्यात.

५) लोकांना गाड्या लावण्यासाठी पार्किंगची व्यवस्था केली पाहिजे.

६) बाजारात कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी ग्रामपंचायतीने बाजारादिवशी पोलीस बोलाविले पाहिजेत.

जर वरील उपाय योजना चांगल्या प्रकारे स्वीकारल्या आणि कार्यवाही केली तर आठवडा बाजाराचे एक आदर्श मॉडेल तयार होईल. त्याचा स्वीकार अनेक बाजारांनी केला तर आर्थिक उलाढाल वाढेल. ग्रामीण विक्रेते आणि खरेदीदार यांना त्यांच्या हक्काची बाजारपेठही जवळच मिळेल.

**संदर्भ**


1) Basavraja B. *"Restructuring of Agriculture Marketing. System"* : A Policy Perspective, 2006.
2) Dr. Koli P.A., *"Marginal Farmers and the vegetables and fruits market"*. A case study at co-operative union, 2006.
3) Collected primary data from 25 sample rural weekly markets.
4) Habeebur - Rahaman K.S. - *"Rural marketing in India"*, Published House, Mumbai, 2003
5) Prasad C.S. (edt.) *"Sixty years of Indian Agriculture 1947 to 2007"*. Year wise review of Agricultural Development in India 1947 to 2006.
6) Tawade M.D., (1977) "Weekly Markets and Fairs in South Ratnagiri District". Published by Dr. (Smt.) Usha Ithape, Registrar Shivaji University, Kolhapur.
7) Gopal Rao H.S., Urs D. Sanjay Devaraj (2004) Fanners Market in Karanataka. Published by H.S. Gopal Rao, Mysore.
8) Gupta, B.N. - *"Business Statistics"*, Published. by National Publishing, Delhi - 1973.


- * -

मनुष्यणाम् वृत्तीरर्थ

National Research Journal

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

जाहिरातीचे दर

| | कृष्णधवल(B/W) | रंगीत |
|---|---|---|
| १) समोरचे आतील पृष्ठ | रु.४,०००/- | रु.११,०००/- |
| २) मागील(आतील) पृष्ठ | रु.४,०००/- | रु.११,०००/- |
| ३) मागील शेवटचे पृष्ठ | रु.५,०००/- | रु.१५,०००/- |

आपल्या जाहिरातीचा मजकूर-डिझाईन (1/5=150X210 mm) आणि सोबत वरील रकमेचा ड्राफ्ट खालील पत्त्यावर पाठवावा. ड्राफ्ट मराठी अर्थशास्त्र परिषद या नावानेच काढावा. जाहिरात प्रसिध्द होताच अर्थसंवादचा अंक आपणास मिळेल. आपल्या सहकार्याबद्दल धन्यवाद !

डॉ. अनिल सूर्यवंशी,
कार्यवाह खजिनदार
गोदाई,
शिवशक्ती मैदानाजवळ,
शिवाजीनगर, बार्शी-४१३ ४११,
जिल्हा-सोलापूर,
दूरध्वनी:(०२१८४) २२४२९४
मो.९०११३३१९०६

डॉ.अविनाश निकम
प्रमुख संपादक
मातृपितृ कृपा,प्लॉट नं.३०,
परिमल कॉलनी,
यशवंत क्लासेसच्या मागे,
शहादा-४२५४०९,
जिल्हा नंदुरबार,
मो.९८२२६६५१४१

# सुवर्णजयंती शहरी रोजगार योजनेचे आर्थिक व सामाजिक मूल्यमापन : खान्देश एक अभ्यास

जितेंद्र दगडू तलवारे, धुळे
एस.एस.व्ही.पी.एस. कला व वाणिज्य महाविद्यालय

नागरी भागामध्ये दारिद्रय रेषेखालील लोकांचे राहणीमान उंचावण्यासाठी त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने केंद्र पुरस्कृत सुवर्णजयंती शहरी रोजगार योजना डिसेंबर १९९७ मध्ये सुरु करण्यात आली. नेहरु रोजगार योजना, शहरी मुलभूत सेवा कार्यक्रम आणि एकात्मिक शहरी दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रम या तीन प्रमुख योजनांचे एकत्रीकरण करुन सुवर्णजयंती शहरी रोजगार योजना सुरु करण्यात आली.

योजनेचे उद्देश -

१) लघुउद्योग स्थापन करुन स्वयंरोजगारासाठी तरुणांना प्रेरित करणे.

२) बेरोजगार व अल्परोजगार तरुणांना वेतन रोजगार संधी उपलब्ध करुन देणे.

३) सुशिक्षित गरीब तरुणांना लाभदायक रोजगार उपलब्ध करुन देणे.

सुवर्णजयंती शहरी रोजगार योजनेअंतर्गत शहरी भागात दारिद्र्य रेषेखाली येणाऱ्या कुटुंबांची यादी तयार करण्यात येते. शहरातून शासकीय निकषाप्रमाणे दारिद्र्य रेषेखालील कुटुंबे यात येतात. या यादीत नाव असणाऱ्या एका वार्डामध्ये किंवा वस्तीमध्ये राहणाऱ्या दहा ते वीस दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील महिला घेऊन स्वयंसहाय्यता गट बनविण्यात येतो. स्वयंसहाय्यता गट स्थापन झाल्यानंतर सर्व महिला सदस्यांची दरमहा ठराविक रक्कम बचत रुपाने जमा केली जाते व राष्ट्रीयकृत बँकेत खाते उघडून ती रक्कम दरमहा जमा केली जाते. अशा प्रकारे साधारणत: एक वर्ष नियमित रक्कम जमा झाल्यानंतर सदर रक्कम गटातील गरज असलेल्या महिलेला महिना दोन टक्के व्याज दराने किंवा गट ठरवेल त्या दराने अंतर्गत कर्ज रुपाने दिली जाते.

स्वयंसहाय्यता बचत गटाने अंतर्गत बचत व कर्ज याचे व्यवहार व्यवस्थित केल्यास या गटाला व्यवसाय करण्यासाठी विशेष प्रोत्साहन म्हणून रुपये २,५०,०००/- पर्यंतचे कर्ज राष्ट्रीयीकृत बँकेकडून उपलब्ध होते. यातील रुपये १,२५,०००/- (५०%) सबसिडी या गटाला पालिकेकडून

मिळते. यामागे उद्देश एकच असतो की, या गटातील महिलांनी आता स्वावलंबी व्हावे व रोजगार मिळवून आपला व कुटुंबाचा चरितार्थ चालवावा.

भारतात स्वयंसहायता बचत गटांचा विकास जलदगतीने होतांना दिसून येतो. १९९९-२००० या काळात स्वयंसहायता बचत गटांची संख्या ११४७७५ इतकी होती. ती २००६ पर्यंत २२ लाखांपर्यंत जाऊन पोहचली आहे. महाराष्ट्रात स्वयंसहाय्यता बचत गटांची संख्या २००६ मध्ये ६१९१ इतकी होती. तर खान्देशातील धुळे, जळगाव, नंदुरबार या तीनही जिल्ह्यातील एकूण २१ नगरांमध्ये सुवर्णजयंती शहरी रोजगार योजनेअंतर्गत स्वयंसहाय्यता गटांची संख्या १९९८ ते २००८ या कालावधीत २०७६ एवढी होती. अशाप्रकारे स्वयंसहाय्यता बचत गटांचा विस्तार होतांना दिसून येतो.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

१) सुवर्णजयंती शहरी रोजगार योजनेअंतर्गत महिला सबलीकरण कितपत झाले आहे याचे मूल्यमापन करणे.

२) स्वंयसहाय्यता बचतगट खान्देशात किती आहे व त्यांचे कार्य कशा पध्दतीने चालू आहे याचे अध्ययन करणे.

३) योजनेच्या माध्यमातून लाभार्थींना जे स्वयंरोजगार प्रशिक्षण दिले जाते त्याचा लाभ भविष्यात लाभार्थ्यांना होतो काय याचे अध्ययन करणे.

४) योजनेचा लाभ घेऊन लाभार्थी दारिद्रयरेषेच्या वरती गेले आहे किंवा नाही तसेच रोजगार प्राप्ती झाली आहे काय याचा अभ्यास करणे.

५) योजनेच्या माध्यमातून दिल्या जाणाऱ्या कर्जाचे मूल्यमापन करणे. कर्ज देणाऱ्या बँकाचा थोडक्यात अभ्यास करणे.

**गृहितकृत्ये**

१) सुवर्णजयंती शहरी रोजगार योजनेमुळे महिलांचे सबलीकरण होण्यास मदत झाली आहे.

२) सुवर्णजयंती शहरी रोजगार योजनेमुळे महिलांमध्ये बचत गटाचे प्रमाण वाढले आहे.

३) नागरी रोजगार योजनांमुळे लाभार्थींच्या राहणीमानाचा दर्जा सुधारला आहे.

४) नागरी भागाच्या सर्वांगीण विकासासाठी श्रमिकांच्या रोजगार योजनांना अधिक वाव आहे.

**संशोधन कालखंड आणि विषयाची व्याप्ती**

प्रस्तुत विषयाचा अभ्यास करण्यासाठी १९९१ ते २००५ या पंधरा वर्षाच्या कालावधीची निवड करण्यात आली असून, अद्ययावत माहितीसाठी २००७-०८ पर्यंतच्या आकडेवारीचा आधार घेण्यात आला आहे.

संशोधित विषयाचा अभ्यास करण्यासाठी खान्देशातील नागरी भागाची निवड करुन खान्देशातील एकूण २१ नगरांपैकी जिल्ह्यानुसार २५%

नगरांची निवड करण्यात आली. सुवर्णजयंती शहरी रोजगार योजनेचा सूक्ष्म अभ्यास करण्यात आला असून योजनेतील लाभार्थी संख्या, लाभार्थ्यांना दिलेले कर्ज, अनुदान, उत्पन्नातील बदल, दारिद्र्य निर्मुलन, राहत्या घरांची स्थिती, स्वरोजगार निर्मिती, राहणीमान, फिरता निधी, कर्ज देणाऱ्या बँका इत्यादी बाबी अभ्यासण्यात आल्या आहेत.

**संशोधन पध्दती आणि माहिती संकलन:**

प्रस्तुत विषयाचा अभ्यास करण्यासाठी प्रामुख्याने वर्णनात्मक सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यात आला आहे. खान्देशातील सुवर्णजयंती रोजगार योजनेअंतर्गत स्वयंसहायता बचत गटांची माहिती नमुना पध्दतीच्या माध्यमाने मिळविण्यात आली असून त्या आधारे निष्कर्ष काढण्यासाठी समग्र पध्दतीचा वापर करण्यात आला आहे. प्रस्तुत संशोधन प्राथमिक आणि द्वितीयक अशा दोन्ही प्रकारच्या सांख्यिकीय तसेच लिखीत माहितीवर आधारलेले आहे.

**खान्देशातील नमुना निवड केलेले बचतगट, स्वरोजगार, नगरांची संख्या व कार्यक्षेत्राची ठिकाणे:**

प्रस्तुत विषयाचा चिकित्सक अभ्यास करण्यासाठी खान्देशातील एकूण २१ नगरांपैकी २५ टक्के म्हणजे एकूण ५ नगरांची निवड करण्यात आली त्यात जळगांव जिल्ह्यातील जळगांव, अमळनेर, पारोळा हे ३ नगरे धुळे व नंदुरबार अशी दोन नगरे नमुन्यासाठी निवडण्यात आले. संपूर्ण खान्देशातुन प्रातिनिधिक माहिती मिळविता यावी यासाठी नमुन्यात विविध भागांचे सारख्या प्रमाणात प्रतिनिधित्व घेण्यात आले. कोणत्याही एका जिल्ह्यातून किंवा नगरातून नमुना न निवडता प्रत्येक जिल्ह्यातील २५ टक्के नगरांमध्ये १० टक्के बचतगटातील लाभार्थी व ५ टक्के स्वरोजगारातील लाभार्थी निवडण्यात आले. नमुना निवड केलेले बचतगट, स्वरोजगार व नगराच्या कार्यक्षेत्राची ठिकाणे याची माहिती तक्ता क्र.१.१ मध्ये दिलेली आहे.

**तक्ता क्र.१**

**खान्देशातील नमुना निवड केलेले बचतगट, स्वरोजगार नगरांची संख्या व ठिकाणे**

| अ.क्र. | खान्देशातील नगरे | बचतगटांची संख्या २०००-०१ ते २००७-०८ | | स्वरोजगारांची संख्या १९९९-२००० ते २००७-०८ | |
|---|---|---|---|---|---|
| | | एकूण | नमुना (१० टक्के) | एकूण | नमूना (५ टक्के) |
| १ | जळगांव | ५४७ | ५५ | ९५८ | ५० |
| २ | धुळे | ४३४ | ४४ | १२२७ | ६१ |
| ३ | नंदुरबार | ४९ | ०५ | १४१ | ०७ |
| ४ | अमळनेर | ९६ | १० | ३६२ | १७ |
| ५ | पारोळा | ५५ | ०६ | ३०५ | १५ |
| | एकुण | ११८१ | १२० | २९९३ | १५० |

*संदर्भ : महानगरपालिका व नगरपालिकेतील वार्षिक अहवालच्या आधारे तयार केलेला तक्ता.*

खान्देशातील एकूण ५ नगरांचा नमुना निवडण्यात आला त्या पाचही नगरांमध्ये बचटगटांची एकूण संख्या ११८१ होती त्यात नमुन्यासाठी १० टक्के बचतगटात एकूण १२० बचतगट घेण्यात आले व या पाचही नगरांमध्ये एकूण स्वरोजगारांची संख्या २९९३ होती त्यात नमुन्यासाठी ५ टक्के स्वरोजगारीत एकुण १५० स्वरोजगार घेण्यात आले. उपरोक्त बचतगट व स्वरोजगारीच्या माध्यमातून संकलित केलेल्या माहितीच्या आधारे खान्देशातील सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेचा चिकित्सक अभ्यास करण्यात आला आहे. तसेच सुवर्णजयंती शहरी रोजगार योजनेतील प्रत्येक घटकाच्या कार्याचा आढावा घेण्यात आलेला आहे.

**स्वयंसहाय्यता बचत गट स्थापना व कार्यपध्दती:**

शहरी/नागरी भागात दारिद्र्य रेषेखालील येणाऱ्या कुटुंबाची यादी तयार करण्यात येते. शहरातुन शासकीय निकषाप्रमाणे दारिद्र्य रेषेखालील कुटुंबे यात येतात. या यादीत नाव असणाऱ्या एका वॉर्डामध्ये किंवा वस्तीमध्ये राहणाऱ्या १० ते २० दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील महिला घेऊन स्वयं सहाय्यता गट बनविण्यात येतो.

**गट स्थापन करणे:**

दारिद्र्यरेषेच्या यादीत असणाऱ्या महिलांनी एकत्र आल्यानंतर गट स्थापन केला जातो या गटात साधारणपणे अध्यक्ष, सचिव आणि खजिनदार अशी तीन पदे असतात. काही गटामध्ये उपाध्यक्ष असतात. महिला गट स्थापन झाल्यानंतर याबाबतची माहिती महानगरपालिका/नगरपालिका समूह संघटकांना द्यावी लागते. समूह संघटक महिला बचत गटाची बैठक घेतो या बैठकीत समूह संघटक बचतीचे महत्व विशद करतो सुरुवातीच्या २-४ बैठकीत ओळख व माहिती याबाबतचे मार्गदर्शन होते.

**बचत व काटकसर सुरु केली जाते:**

स्वयंसहाय्यता बचत गट स्थापन झाल्यानंतर सर्व महिला सदस्यांची दरमहा ठराविक रक्कम गटप्रमुखाकडे जमा केली जाते त्या गटप्रमुखाने अध्यक्ष व सचिवाच्या नावे राष्ट्रीयीकृत बँकेत खाते उघडुन ती रक्कम दरमहा जमा केली जाते. प्रतिमहिला महिना रु.३० कमीत कमी त्यापेक्षा जास्त रक्कम गटातील सर्व महिला सम्मत करतील ती रक्कम दरमहा जमा करावी लागते.

**बँकेत बचत जमा केली जाते:**

दरमहा सर्व सदस्यांनी जमा केलेली रक्कम बँकेत जमा केली जाते. सुरुवातीला समूह संघटकाने ही रक्कम नियमित जमा होते का हे पहावे लागते. या रकमेचा हिशोब व्यवस्थित ठेवून रजिस्टर मध्ये या रकमेची नोंद घ्यावी लागते बैठक वृत्तांतही लिहावे लागते. अशा प्रकारे साधारणतः एक वर्ष नियमित रक्कम जमा केल्यानंतर बचत गटाच्या सर्व सदस्य सदर रक्कम गटातील गरज असलेल्या महिलेला, महिना दोन टक्के दराने किंवा गट ठरवेल त्या दराने कर्ज रुपाने दिली जाते. अशा प्रकारे असलेल्या रकमेपैकी ठरावीक रक्कम गटातील महिलांनाच प्राप्त होते व त्या आपापल्या व्यवसाय करुन गटाची रक्कम व्याजासह परत करतात यामुळे आपआपसातच एक दुसऱ्याला सहाय्य यातून

होते. नमुना निवड केलेल्या १२० बचतगटातील १,३२५ सदस्यांची १९९८ ते २००८ या काळात बचत केलेली एकुण रक्कम ही १७,५०,३५० रुपये होती बचतीची रक्कम प्रत्येकी कमीतकमी ३० रु. व जास्तीत जास्त ५० रु.दिसुन आली. गटाच्या मासिक सभेमध्ये बचत जमा झाल्यानंतर ज्या सदस्यांची बचत आली नसेल त्या सदस्यास दंड आकारला जातो. बचत गटाचा कारभार हा लोकशाही पध्दतीने होतांना दिसून येतो. बचत गटातील व्यवहाराच्या नोंदी हिशोब ठेवणे पैसे हाताळणे ही कामे महिला स्वत: करतात.

**खान्देशातील स्वयंसहाय्यता बचत गटांची प्रगती:**

खान्देशातील धुळे जिल्ह्यात धुळे, शिरपूर, दोंडाईचा या तीन नगरात १९९८ ते २००८ पर्यंत एकूण स्वयंसहाय्यता बचत गटांची संख्या ५९८ होती. जळगांव जिल्ह्यात जळगाव, भुसावळ, अमळनेर, चाळीसगाव, चोपडा, पाचोरा, पारोळा, एरंडोल, धरणगाव, यावल, रावेर, सावदा, फैजपूर, जामनेर अशी एकुण १४ नगरे आहेत. त्या नगरांमध्ये सन २००८ पर्यंत स्थापन झालेल्या स्वयंसहाय्यता बचतगटांची संख्या १२७६ होती. नंदुरबार जिल्ह्यात नंदुरबार, शहादा, नवापुर, तळोदा अशा चार नगरात स्वयंसहाय्यता बचतगटांची संख्या सन २००८ पर्यंत २०२ होती. अशी खान्देशातील स्वयंसहाय्यता बचतगटांची एकूण संख्या २०७६ एवढी होती. खान्देशातील नमुना निवड केलेल्या पाच नगरातील स्वयंसहाय्यता बचतगटांची वर्षनिहाय संख्या तक्ता क्र.२ मध्ये दर्शविण्यात आलेली आहे.

**तक्ता क्र.२**

**सुवर्णजयंती शहरी रोजगार योजनेअंतर्गत २०००-०१ ते २००७-०८ या काळातील खान्देशातील स्वयंसहाय्यता बचतगटांचा प्रगतीदर्शक तक्ता**

| अ.क्र. | वर्ष | जळगाव | धुळे | नंदुरबार | अमळनेर | पारोळा | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २०००-०१ | ०४ | ०६ | -- | -- | ०२ | १२ |
| २ | २००१-०२ | २४ | २३ | -- | -- | ०१ | ४८ |
| ३ | २००२-०३ | ३५ | ४२ | ०२ | ०४ | ०२ | ८५ |
| ४ | २००३-०४ | ४७ | ३० | २२ | ०४ | ०५ | १०८ |
| ५ | २००४-०५ | ९० | ८२ | १६ | २२ | १० | २२० |
| ६ | २००५-०६ | १०५ | ८३ | ०१ | ०५ | ११ | २०५ |
| ७ | २००६-०७ | १५० | ६४ | ०४ | २० | १३ | २५१ |
| ८ | २००७-०८ | ९२ | १०४ | ०४ | ४१ | ११ | २५२ |
| | एकुण | ५४७ | ४३४ | ४९ | ९६ | ५५ | ११८१ |

*(संदर्भ: महानगरपालिका व नगरपालिकेतील वार्षिक अहवालांच्या आधारे तयार केलेला तक्ता )*

खान्देशातील नमुना निवड केलेल्या स्वयंसहाय्यता बचत गटांची संख्या २०००-०१ मध्ये एकुण पाचही नगरातील १२ होती त्यात उत्तरोत्तर वाढ होत गेल्याचे दिसते. २००७-०८मध्ये एकुण स्वयंसहाय्यता बचतगटांची संख्या २५२ होती. २०००-०१ ते २००७-०८ या कालावधीतील नमुना निवड केलेल्या नगरांमध्ये स्वयंसहाय्यता बचत गटांची संख्या एकूण ११८१ होती.

स्वयंसहाय्यता बचतगटांची संख्या नगरातील लोकसंख्या व दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाची संख्या यानुसार कमी जास्त होतांना दिसून येते शासनाने स्वयंसहाय्यता गटांचे महानगरपालिका व नगरपालिका यांना दिलेली उद्दिष्टे वेगवेगळे दिसुन येतात.

**स्वयंसहाय्यता बचतगटांना प्रतिसदस्य दिलेला फिरता निधी:**

ज्या महिला बचतगटांनी एक वर्षापर्यंत आपली नियमित रक्कम जमा केलेली आहे. गरजू महिला सदस्यांना त्यातून रक्कम प्रदान केलेली आहे व ती रक्कम वसूल केलेली आहे. ज्या महिला बचतगटाचे कामकाज व्यवस्थित चालू आहे अशा महिला बचत गटाला प्रति सदस्य रु.१०००/- पर्यंतचा निधी, योजनेच्या बचत व काटकसर (गट) या घटकातून बिनव्याजी वापरण्यासाठी देण्यात येतो. फिरते भाग भांडवल म्हणून सदर रक्कम प्रदान करण्यात येते. बचत गटांना प्रोत्साहित करणे व आर्थिक पाठबळ या स्वरुपामध्ये हा निधी दिला जातो. हा

**तक्ता क्र.३**

**सुवर्णजयंती शहरी रोजगार योजनेअंतर्गत बचतगटांना दिलेला फिरता निधी दर्शक तक्ता**

**(२०००-०१ ते २००७-०८)**

| अ.क्र. | व्यवसाय क्षेत्र | सर्वेक्षित बचतगटांची संख्या | सर्वेक्षित बचतगटांची सदस्य संख्या | दिलेला फिरता निधी |
|---|---|---|---|---|
| १ | किराणा व्यवसाय | ३३(२७.५) | ३५५(२६.७९) | ३,५५,००० |
| २ | रेडीमेड कपडे, साडी विक्री व्यवसाय | १७(१४.१६) | १८१(१३.६६) | १,८१,००० |
| ३ | कडधान्य विक्री | १०(८.३३) | १२१(९.१३) | १,२१,००० |
| ४ | पापड, वेफर्स, वडे उद्योग | १०(८.३३) | ११५(८.६८) | १,१५,००० |
| ५ | शेळीपालन व दुग्धव्यवसाय | ११(९.१७) | १२२(९.२१) | १,२२,००० |
| ६ | हॉटेल व्यवसाय | ०९(७.५) | १०२(७.७०) | १,०२,००० |
| ७ | भोजनठेका, शालेय पोषण आहार | ११(९.१७) | १२५(९.४३) | १,२५,००० |
| ८ | पावरलुम उद्योग | ०५(४.१७) | ५७(४.३०) | ५७,००० |
| ९ | इतर उद्योग | १४(११.६७) | १४७(११.०९) | १,४७,००० |
| | एकुण | १२०(१००.००) | १३२५(१००.००) | १३,२५,००० |

*(संदर्भः प्रश्नावलीच्या माध्यमाने संकलित केलेली माहिती)*

सामुहिक रुपात मिळत असल्यामुळे एखादी महिला सदस्य व्यवसाय करीत असल्यास त्यांच्या मालाची खरेदी व पणन व्यवस्था करण्यासाठी, गटाच्या इतर कार्याकरीता मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी वापरता येतो. बाल आरोग्य शिबीर, लसीकरण व तत्सम कामासाठी हा निधी वापरता येतो.

खान्देशातील नमुना निवड केलेल्या १२० बचतगटातील १३२५ (१००.००) सदस्यांना १३,२५,००० रुपये फिरता निधी प्रदान करण्यात आला. सर्वात जास्त फिरता निधीची रक्कम किराणा व्यवसाय करणाऱ्या ३३(२७.५), बचत गटातील ३५५(२६.७९) महिला सदस्यांना ३,५५,००० रुपये प्रत्येकी १००० रुपये असा प्रदान करण्यात आलेला आहे. हा फिरता निधी मालाची खरेदी व पणन व्यवस्था करण्यासाठी गटाच्या इतर कार्याकरिता वापरता येतो.

**महिला व बालके विकास गट आढावा:**

महिलांचा सामुहिक अर्थार्जनाचा अंतिम टप्पा म्हणून या घटकाकडे पाहता येते. दारिद्र्य रेषेखालील महिलांच्या स्वयंसहाय्यता गटाने केलेली सुरुवात ही बचत गटाचा अंतिम टप्पा यशस्वीरित्या पार करुन जेव्हा सामूहिक व्यवसाय करावयाचे निश्चित ठरते त्यावेळी या घटकांचा लाभ घेता येतो व्यवसाय करुन अर्थार्जनाच्या माध्यमातून गटातील सदस्यांचे दारिद्र्य निर्मुलन होईल अशी अपेक्षा असते.

स्वयंसहाय्यता महिला बचत गटाला व्यवसाय करण्यासाठी विशेष प्रोत्साहन म्हणून रुपये २,५०,०००/-पर्यंतचे कर्ज राष्ट्रीयकृत बँकेकडून उपलब्ध होते यातील रुपये १,२५,०००/- (५० टक्के) सबसिडी या गटाला तात्काळ पालिकेकडून मिळते यामागे उद्देश एकच असतो की, या गटातील महिला आता स्वावलंबी व्हावे व रोजगार मिळवून आपला व कुटुंबाचा चरितार्थ चालवावा.

स्वयंसहाय्यता बचत गटांना कर्ज पुरवठा करतांना नेहमी बचत गटाच्या नावे कर्ज मंजूर केले जाते. स्वयंसहाय्यता बचत गटांना बँका थेट कर्जपुरवठा करु शकतात. स्वयंसहाय्यता बचत गटांना होणारा थेट कर्जपुरवठा गटाने केलेल्या बचतीशी निगडीत असतो. साधारण बँक पुढील निकषाच्या आधारे बचत गटांना कर्ज देते.

१) बचतगट कमीतकमी सहा महिने सक्रिय अस्तित्वात असला पाहिजे.

२) गट लोकशाही पध्दतीने कार्यरत असला पाहिजे.

३) गटाने नियमित बचत आणि स्वतःच्या निधीतून अंतर्गत कर्ज व्यवहार केले असले पाहिजेत.

४) गटाची स्थापना करण्यामागे परस्परांना मदत करण्याची इच्छा आणि एकत्रित काम करण्याची गरज असल्याचे जाणवले पाहिजे.

५) गटातील सदस्यांमध्ये समान उद्दिष्ट आणि एकजिनसीपणा असला पाहिजे.

**तक्ता क्र.४**

**महिला व बालके विकास गट अंतर्गत बचतगटांचे व्यवसाय, सदस्य संख्या, कर्ज अनुदान दर्शक तक्ता (२०००-०१ ते २००७-०८)**

| अ.क्र. | व्यवसाय/क्षेत्र | सर्वेक्षित बचतगटांची संख्या | सर्वेक्षित बचतगटांची संख्या | बचत गटांना दिलेले कर्ज (रुपयात) | बचत गटांना मिळालेले अनुदान(५०%) (रुपयात) |
|---|---|---|---|---|---|
| १ | किराणा व्यवसाय | ३३(२७.५) | ३५५(२६.७९) | ४१,२५,००० | ४१,२५,००० |
| २ | रेडीमेड कपडे, साडी विक्री व्यवसाय | १७(१४.१६) | १८१(१३.६६) | २१,२५,००० | २१,२५,००० |
| ३ | कडधान्य विक्री | १०(८.३३) | १२१(९.१३) | १२,५०,००० | १२,५०,००० |
| ४ | पापड, वेफर्स, वडे उद्योग | १०(८.३३) | ११५(८.६८) | १२,५०,००० | १२,५०,००० |
| ५ | शेळीपालन व दुग्धव्यवसाय | ११(९.१७) | १२२(९.२१) | १३,७५,००० | १३,७५,००० |
| ६ | हॉटेल व्यवसाय | ०९(७.५) | १०२(७.७०) | ११,२५,००० | ११,२५,००० |
| ७ | भोजनठेका, शालेय पोषण आहार | ११(९.१७) | १२५(९.४३) | १३,७५,००० | १३,७५,००० |
| ८ | पावरलुम उद्योग | ०५(४.१७) | ५७(४.३०) | ६,२५,००० | ६,२५,००० |
| ९ | इतर उद्योग | १४(११.६७) | १४७(११.०९) | १७,५०,००० | १७,५०,००० |
| | एकुण | १२०(१००,००) | १३२५(१००.००) | १,५०,००००० | १,५०,००००० |

*संदर्भ: संशोधकाने प्रश्नावलीच्या माध्यमातून संकलित केलेल्या माहितीवरून*

*टीप: कंसातील आकडेवारी एकुणाशी टक्केवारी दर्शवितात.*

नमुना निवड केलेल्या स्वयंसहाय्यता बचत गटाचे किराणा, रेडिमेड कापड, साडी विक्री, कडधान्य विक्री, पापड, वेफर्स, वडे विक्री, शेळीपालन व दुग्ध व्यवसाय, हॉटेल, भोजन ठेका, शालेय पोषण आहार, पॉवरलूम, ढेप विक्री, कॉम्प्युटर, बांगडी असे व्यवसाय होते. सर्वेक्षित बचतगटात जास्तीत जास्त कर्जपुरवठा किराणा व्यवसाय करणाऱ्या ३३(२७.५) बचत गटांना केला गेला त्या बचतगटातील महिला सदस्य संख्या ३५५(२६.७९) होती त्या बचत गटांना एकूण ४१,२५,००० रुपये कर्ज व तेवढेच अनुदान दिले गेले नमुना निवड केलेल्या १२० बचतगटांमध्ये एकूण १३२५ महिला सदस्य होत्या या बचतगटांना एकूण १,५०,००००० रुपये कर्जपुरवठा व तेवढेच अनुदान प्राप्त झाले. धुळे येथील पावरलुम उद्योगात बचतगटातील महिला सदस्यांना रोजगार प्राप्त झालेला आहे परंतु महिलांनी या व्यवसायात पुरुषांनाही रोजगार उपलब्ध करुन दिलेला आहे. नंदुरबार येथील बचत गट हे जास्तीत जास्त भोजन ठेका, शालेय पोषण आहार पुरविण्याचे काम करतात. त्या महिला बचत गटांमध्ये शालेय पोषण आहाराचे व भोजन ठेक्याचे टेंडर घेतांना स्पर्धा होते.

स्वंयसहाय्यता महिला बचतगटांनी घेतलेल्या कर्जाची परतफेड ९०% होतांना दिसून येते. काही महिला बचतगट जास्त कर्ज मिळण्याची व व्याजदर कमी करण्याची अपेक्षा व्यक्त करतात.

**सुवर्णजयंती शहरी रोजगार योजनेतील त्रुटी / मर्यादाः**

सुवर्णजयंती शहरी रोजगार योजनेच्या अंमलबजावणीत व योजनेच्या लाभार्थ्यांमध्ये ज्या त्रुटी किंवा मर्यादा दिसून येतात त्या पुढीलप्रमाणे

**निरक्षरता आणि अल्प शिक्षणः**

स्वसहाय्यता बचत गटामध्ये निरक्षरतेचे प्रमाण दिसुन येते तसेच शिक्षणाचे प्रमाणही कमी आहे. २९% गटप्रमुखाचे शिक्षण प्राथमिक ५१% गटप्रमुख माध्यमिक व २०% गटप्रमुखांनी बारावी ते पदवीपर्यंत शिक्षण घेतलेले आहे. तसेच बचत गटातील १८% महिला ह्या निरक्षर आहेत.

गटाचा कारभार स्वच्छ व पारदर्शी ठेवणे, गटाची सर्व कागदपत्रे अद्ययावत ठेवणे, नोंदवहीत बँकेकडून मिळालेले कर्ज, व्याजदर, दंड, परतफेड, दिनांक, रक्कम इ.सर्व नोंदी करणे, सभासदांना गटाची सर्व कागदपत्रे पाहण्याचा व त्यावर आक्षेप घेण्याचा अधिकार देणे ही कामे गटप्रमुखाला करावे लागतात त्यामुळे गटप्रमुखाचे शिक्षण महत्वाचे असते.

**भांडवलाची कमतरताः**

सुवर्णजयंती शहरी रोजगार योजनेतील बचतगट व स्वरोजगारींना बँकेकडून जास्त कर्जाची अपेक्षा आहे. कर्जाची ही अल्प रक्कम किफायतशीर उद्योग व्यवसाय सुरु करण्यास कमी पडते असे बचतगटातील सदस्य व स्वरोजगारांचे मत आहे. तसेच कर्जावर आकाराला जाणारा व्याजदर हा ९ ते ११% आहे तो व्याजदर कमी करावा असे बचतगट सदस्यांचे म्हणणे आहे.

बँकेने जे कर्ज बचतगट व स्वरोजगारांना दिलेले असते त्याची परतफेड संपूर्णपणे होत नाही. बचतगटांची परतफेड बँक अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार ९०% आहे. परंतु स्वरोजगारांची परतफेडीचे प्रमाण फक्त ६० ते ७०% आहे त्यामुळे बँकाच्या बुडीत मालमत्तेत वाढ होते म्हणून बँका बचतगट व स्वरोजगारांना कर्ज देण्यास नाखुश असतात.

**मूलभूत सुविधांचा अभावः**

बचतगटांना आवश्यक असणाऱ्या सुविधा आणि सहाय्य उदा. कच्चा माल, विपणन आणि तांत्रिक प्रशिक्षण उपलब्ध करून देण्याची तरतूद सुवर्णजयंती शहरी रोजगार योजनेत आहे परंतु या सुविधा बचतगटांना पुरेशा प्रमाणात मिळत नाही तसेच मिळणाऱ्या सुविधांचा दर्जा चांगला नसतो. त्यामुळे बचतगटातील उद्योग-व्यवसाय अडचणीत येतात तसेच त्यांच्या उत्पादित वस्तु व सेवांची प्रत चांगली दिसून येत नाही.

**राजकीय हस्तक्षेपः**

सुवर्णजयंती शहरी रोजगार योजनेत राजकीय हस्तक्षेपामुळे कर्मचारी व अधिकाऱ्यांना नियमाप्रमाणे काम करता येत नाही. तसेच नगरसेवक किंवा विशिष्ट पक्षाचा कार्यकर्ता बचतगटातील सदस्यांचा आपल्या पक्षासाठी उपयोग करून घेण्याचा प्रयत्न करतात.

**विपणन कौशल्याचा अभाव:**

बचतगटाच्या सदस्याजवळ योग्य प्रकारचे विपणनाचे कौशल्य नसल्यामुळे ते त्यांच्या मालाची योग्य प्रकारे विक्री करू शकत नाही. तसेच मालाची योग्य प्रकारे बांधणी करता न येणे, चांगल्या प्रकारे जाहिरात व प्रसिध्दी न करणे या कारणामुळे गटाचे सदस्य त्यांच्या मालाची विक्री योग्य प्रकारे करू शकत नाही.

**बाजारपेठेचा अभाव:**

बाजारपेठ उपलब्धता हा महिला बचतगट चळवळीचा आत्मा असून गटांनी उत्पादित केलेल्या वस्तुंना बाजारपेठ उपलब्ध होत नाही त्यामुळे बचतगटांनी तयार केलेला माल तसाच पडून राहतो म्हणून बचतगटातील सदस्यांना उत्पादनाची प्रेरणा राहत नाही.

**रोजगार योजनेच्या त्रुटीवरील उपाय योजना/ शिफारशी:**

सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेची सध्याची कार्यपध्दती, समस्या व दोष लक्षात घेता या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पुढील उपाय योजना करता येतील.

**जनजागृती अभियान राबविले जावे:**

सुवर्णजयंती शहरी रोजगार योजना जास्तीत जास्त लोकाभिमुख बनविण्यासाठी जिल्हा नागरी विकास यंत्रणा, नगरपालिका व महानगरपालिकेने जनजागृतीचे प्रयत्न करावेत त्यासाठी शहरातील वेगवेगळ्या स्वयंसेवी संस्था, संघटनांची मदत घेऊन संपूर्ण नागरी भागात योजनेच्या कार्यक्रम व कार्यपध्दतीचा प्रचार करावा.

**योजनेची लक्ष्ये वास्तववादी असावी:**

या योजनेअंतर्गत निर्धारित करण्यात येणारी लक्ष्ये जास्त वास्तववादी असावीत. योजनेत वैयक्तिक स्वरोजगारी, स्वयं सहाय्यता गट, स्वयं सहाय्यता गटातील स्वरोजगारी, अनुदान व बँक कर्ज इ. बाबतची लक्ष्ये अति महत्वाकांक्षी न ठेवता ती आवाक्यातील असावीत जिल्ह्यातील उपलब्ध संसाधने आधारभूत संरचना आणि बँकाची क्षमता विचारात घेवुन वर्ष निहाय लक्ष्ये निर्धारित करण्यात येतील.

**योजनेची कार्यपध्दती व अंमलबजावणी सुटसुटीत करावी:**

सुवर्णजयंती शहरी रोजगार योजनेची कार्यपध्दती दारिद्र्य रेषेखालील महिलांना सहज समजेल अशी सोपी असावी. या महिलांचा वेळ आणि पैशाचा अपव्यय होणार नाही याकडे लक्ष देण्यात यावे. त्यासाठी अंमलबजावणी यंत्रणा जास्त कार्यक्षम बनवुन योजनेचे सहाय्य मिळवण्यासाठी आवश्यक असणाऱ्या बाबींची पूर्तता निर्धारित वेळेत पूर्ण करण्यात यावी.

**योजनेच्या संतुलीत विकासाकडे लक्ष द्यावे:**

या योजनेचे दारिद्र्य निर्मुलन व रोजगार निर्मितीचे उद्दिष्ट साध्य करावयाचे असेल तर तिच्या अंमलबजावणीतील असमतोल दूर झाला पाहिजे. खान्देशातील काही नागरी भागात योजनेची प्रगती समाधानकारक तर काही भागात ती असमाधानकारक आहे. तेव्हा अंमलबजावणी यंत्रणेने अंमलबजावणीचा हा असमतोल प्रभावी उपाययोजना करुन दूर करावा.

**अर्थसहाय्य व उत्पन्नाचा विनियोग योग्य पध्दतीने व्हावा:**

स्वरोजगारांनी योजनेअंतर्गत मिळणाऱ्या वित्त सहाय्याचा वापर अनुत्पादक कार्यासाठी व दैनंदिन गरजा भागविण्यासाठी करु नये तसेच स्वरोजगारी उद्योग - व्यवसायातून मिळणाऱ्या उत्पन्नाचा विनियोग त्यांनी गुंतवणुकीसाठी, पोषक आहार घेण्यासाठी, जीवनमान उंचावण्यासाठी आणि मुलांचे आरोग्य व शैक्षणिक विकासासाठी करावा.

**लाभार्थ्यांनी योजनेच्या माध्यमातून स्वावलंबी व्हावे:**

सुवर्णजयंती शहरी रोजगार योजनेचे लाभार्थी म्हणजे स्वरोजगारी वित्तसहाय्य मिळाल्यानंतर निर्धारित कालावधीत स्वावलंबी झाले पाहिजे त्यासाठी त्यांनी प्रामाणिक प्रयत्न करावे दारिद्र्यरेषेच्या वर येण्याला त्यांनी प्राधान्य द्यावे. योजनेचे वित्तसहाय्य हे दारिद्र्य निर्मुलन व रोजगार निर्मितीसाठीचे कायम स्वरूपी उत्तर नव्हे. त्यासाठी योजनेतून स्वावलंबन हेच जास्त महत्वाचे आहे.

**स्वयंसहाय्यता बचत गटाचा कारभार लोकशाही पध्दतीने व्हावा:**

योजनेअंतर्गत स्थापन करण्यात येणाऱ्या स्वयंसहाय्यता गटांचे व्यवहार लोकशाही पध्दतीने व्हावेत. गटातील पदाधिकाऱ्यांच्या कार्यपध्दतीत पारदर्शकता असावी. विशिष्ट कालावधीनंतर गटाचे पदाधिकारी बदलले जावेत गटांत कोणाचीही मक्तेदारी असू नये. सर्व सदस्यांमध्ये परस्पर विश्वास व सहकार्य असावे. तसेच गटांच्या सभा नियमितपणे ठरलेल्या वेळेत घेतल्या जाव्यात. गटात सामील होणाऱ्या महिला सभासदांचे एकमेकींशी मतभेद असतील तर गट स्थापनेपुर्वी ते दूर करावे. गटप्रमुखाला मोबदला किंवा मानधन मिळत नाही हे बँकेचे अधिकारी व समुह संघटक यांनी बचतगटातील इतर सदस्यांना समजावून सांगावे.

**गृहितकृत्याची पडताळणी**

**१.सुवर्णजयंती शहरी रोजगार योजनेमुळे महिलांचे सबलीकरण होण्यास मदत झाली आहे.**

हे गृहित सत्य असल्याचे दिसून आले. सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेतील ९० टक्के महिलांना घरातल्या महत्वाच्या निर्णयात सहभागी करून घेतले जाते. त्यांना समाजात सन्मानाने वागण्यास पूर्ण स्वातंत्र्य आहे. तसेच त्या आर्थिकदृष्ट्या सुरक्षित असून कौटुंबिक दडपणापासून मुक्त आहेत. त्यांना स्वसामर्थ्याची जाणीव झाली असून त्यांचे मनोधैर्य उंचावलेले आहे. ह्या महिलांना सामाजिक, राजकिय, धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांना आमंत्रित केले जाते. सामाजिक व राजकीय निर्णय घेतांना सहभागी करून घेतले जाते. समाजाला आरोग्य, भ्रष्टाचार निर्मूलन, कुटूंब नियोजन, शिक्षण रोजगाराच्या योजना या विषयी इतरांना माहिती देण्याचे सामाजिक कार्य करतांना बचतगटातील महिला दिसून आल्या.

**२.सुवर्णजयंती शहरी रोजगार योजनेमुळे महिलांमध्ये बचतगटाचे प्रमाण वाढले आहे.**

हे गृहितही सत्य असल्याचे दिसून आले.

भारतात स्वयंसहाय्यता बचतगटांचा विकास जलद गतीने होतांना दिसून येतो. १९९९-२००० या काळात स्वयंसहाय्यता बचतगटांची संख्या १,१४,७७५ इतकी होती त्यामध्ये १९९८-९९ च्या तुलनेत १४८ टक्के वाढ झाली तर बँक कर्ज १९३ कोटी रु. पर्यंत वाढले. ३१ मार्च २००६ पर्यंत स्वयंसहाय्यता बचतगटांची संख्या २२ लाखांवर पोहचली आहे. महाराष्ट्रात २००१-०२ मध्ये स्वयंसहाय्यता बचतगटांची संख्या २३५० होती. या प्रमाणात उत्तरोत्तर वाढ होत जाऊन २००५-०६ मध्ये स्वयंसहाय्यता बचतगटांची संख्या ६११९१ इतकी झाली. खान्देशात नमुना निवडलेल्या पाचही नगरांमध्ये बचतगटांची संख्या वाढतांना दिसून येते २००१-०१ मध्ये पाच नगरात १२० बचतगट होते त्यांची संख्या २००७-०८ मध्ये २९९३ पर्यंत वाढली. सुवर्णजयंती शहरी रोजगार योजनेतील बचतगटांची संख्या, भारत, महाराष्ट्र व खान्देशात वाढतांना दिसून येते.

**३. नागरी रोजगार योजनांमुळे लाभार्थींच्या राहणीमानाचा दर्जा सुधारला आहे**

हे गृहित असत्य असल्याचे दिसून आले. सुवर्णजयंती शहरी रोजगार योजनेतील लाभार्थ्यांच्या घरांची स्थिती फारशी समाधानकारक दिसून आली नाही. १३२५ लाभार्थ्यांपैकी ३५५ लाभार्थी (२६.७९) टक्के झोपडीत राहतात. ५०१ लाभार्थी (३७.८१) टक्के कच्च्या घरात, २६० लाभार्थी (१९.६२) टक्के अर्ध कच्च्या घरात, १७३ लाभार्थी (१३.६) टक्के पक्क्याघरात, ३६ लाभार्थी (२.७२) टक्के भाड्याने घेतलेल्या घरात राहतात. कच्च्या घरात व झोपडीत राहणाऱ्यांचे प्रमाण सगळ्यात जास्त आहे. साधारणपणे अशीच स्थिती वैयक्तिक स्वरोजगारींच्या राहत्या घरांची आहे. योजनेचे लाभार्थी दैनंदिन आहारात ज्वारी, बाजरी, गहू, तांदूळ, भाजीपाला, डाळी ह्या वस्तु वापरतात. तसेच लाभार्थ्यांना घरात घरगुती वापराच्या वस्तु फारस्या दिसून आल्या नाहीत उदा.पंखे, खुर्च्या, सायकल इ. योजनेचे सहाय्य मिळाल्यानंतर लाभार्थ्यांच्या राहणीमानाचा दर्जा थोड्याप्रमाणात सुधारलेला होता.

**४. नागरी भागाच्या सर्वांगीण विकासासाठी श्रमिकांच्या नागरी रोजगार योजनांना अधिक वाव आहे**

हे गृहीतही सत्य असल्याचे दिसून येते. नागरीभागात विविध कारणांमुळे बेरोजगारीचे प्रमाण वाढून दारिद्र्यरेषेखालील सदस्यांची संख्या वाढतांना दिसून येते. नागरी भागातील दारिद्र्य कमी करण्यासाठी रोजगार व स्वरोजगार योजनांना व्यापक स्वरुप देणे गरजेचे आहे. सुवर्णजयंती शहरी रोजगार योजनेतील त्रुटी दुर करुन संशोधकाने सुचवलेल्या उपाययोजना कार्यान्वीत केल्यास ही योजना अधिक चांगली होऊन रोजगार व स्वरोजगार वाढ होऊन महिला सबलीकरण होण्यास मदत होईल.

**संदर्भ सूची**

१. चव्हाण पोर्णिमा - वाळवा तालुक्यातील

दारिद्र्य रेषेखालील महिला स्वयंसहाय्यता बचत गटांची बलस्थाने व दुर्बलस्थाने "अर्थसंवाद एप्रील-जून २००९ "

२. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी - २००६, ०७ पृ.६२

३. मोरे जे. बी., महाजन बी. एल.- स्वयंसहाय्यता गट ग्रामीण विकास व दारिद्रय निर्मुलन मार्ग, योजना मे २००९ वर्ष ३६ अंक १० पृ.२६

४. ओमासे संजय - स्वयंसहाय्यता बचत गट एक अभ्यास योजना, ऑगस्ट २००८ वर्ष ३६ अंक-१ पृ.५२

५. भांडारकर पु.ल.- सामाजिक संशोधन पध्दती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, औरंगाबाद चौथी आवृत्ती १९९९, पृ.१२५

६. खुरूद भा. श. - स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेची प्रगती आणि प्रभाव, अर्थसंवाद, एप्रील-जून २००९ खंड ३३ अंक १ पृ.२८-२९

७. महाराष्ट्र शासन - जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन जळगाव, धुळे, नंदुरबार जिल्हा २००६-२००७ अर्थ व सांख्यिकी संचालनालय महाराष्ट्र शासन मुंबई पृ.९

- * -

# डॉ. सु. गो. भानुशाली: एक व्यासंगी अर्थतज्ज्ञ

**बी. आर्. जोशी, पुणे**
१०, पानमळा, शिवप्रसाद कॉलनी, राऊत बिल्डींग.

डॉ. सु. गो. भानुशाली आज आपल्यात नाहीत. एक व्यासंगी अर्थतज्ज्ञ पंचत्वात विलीन झाला. अर्थशास्त्राचे ज्येष्ठ प्राध्यापक, कोल्हापूर येथील कॉलेज ऑफ कॉमर्स या महाविद्यालयातील अर्थशास्त्राचे विभाग प्रमुख आणि एकेकाळी अर्थसंवाद या त्रैमासिकाचे सहाय्यक संपादक असलेल्या डॉ. भानुशालींचे २ मे २०११ रोजी वयाच्या ७९ व्या वर्षी दुःखद निधन झाले. वयानुसार त्यांना होणाऱ्या शारीरिक वेदनांचा त्यांच्या अभ्यासावर, चिंतनावर, लेखनावर व जिज्ञासूंना मार्गदर्शन करण्यावर कधीच परिणाम झाला नाही.

डॉ. भानुशालींचा जन्म ठाणे जिल्ह्यातला. प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण रायगड जिल्ह्यात झाल्यानंतर ते नोकरी निमित्त मुंबईला आले. चार वर्षे नोकरी केल्यानंतर कमवा आणि शिका या तत्त्वानुसार ते १९५७ मध्ये बी.ए. आणि १९६० मध्ये एम.ए. मुंबई विद्यापीठातून उत्तीर्ण झाले. १९६१ मध्ये टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस व नंतर कोल्हापूर कॉलेजला कॉलेज ऑफ कॉमर्समध्ये अर्थशास्त्राचे अध्यापनकार्य करू लागले. याचवेळी भारतीय इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेन्ट मधून पी.जी.डी.एम.एफ. (फॅकल्टी डेव्हलपमेन्ट) हा कार्यक्रम पूर्ण करून १९८५ मध्ये कोल्हापूरातील उद्योजकत्व या विषयावर त्यांनी पीएच्.डी. ही पदवी संपादन केली. कॉलेजच्या एनसीसी विभागातूनही मेजरचा हुद्दा प्राप्त झाल्यानंतर ते सेवानिवृत्त झाले. पन्नास वर्षापूर्वी मीही काही काळ कॉमर्स कॉलेजमध्येच तर्कशास्त्र विषय शिकवत होतो. त्यावेळी आमचा जो स्नेह दृढ झाला तो मी धुळ्याला आल्यानंतरही तसाच राहिला.

डॉ. भानुशालींचा पिंड शिक्षकाचा होता. आवड ज्ञानाची होती तर अभिवृत्ती नित्य अध्ययन-अध्यापन-लेखनाची होती. कॉमर्स कॉलेजमध्ये अर्थशास्त्राचे अध्यापन करीत असतानाच शिवाजी विद्यापीठात त्यांनी अभ्यागत प्राध्यापक या नात्याने पदव्युत्तर वर्गांमध्येही अध्यापन केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली तीन विद्यार्थ्यांनी

पीएच्.डी. पदवीही मिळवली. शिवाजी विद्यापीठात अभ्यास मंडळाचा सदस्य या नात्याने अनेक शैक्षणिक उपक्रमांना त्यांनी चालना दिली. अनेक चर्चासत्रांत भाग घेऊन त्यांनी शोधनिबंध सादर केले. सांगली व कोल्हापूर येथील आकाशवाणीवरही अभ्यासपूर्ण व्याख्याने दिली. दै.सकाळमध्ये दरवर्षी त्यांचे *वार्षिक अर्थसंकल्प* सादर होण्यापूर्वी तो कसा असेल यावरआणि सादर झाल्यानंतर त्याचे विश्लेषण असे दोन विस्तृत लेख प्रसिध्द होत असत.

मराठी अर्थशास्त्र परिषदेतर्फे प्रकाशित होणाऱ्या या *अर्थसंवाद* चे सहाय्यक संपादक म्हणून डॉ.भानुशालींनी नऊ वर्षे काम केले. या कालात त्यांनी वाचनीय आणि विद्यार्थी व प्राध्यापकांना उपयुक्त असे *आर्थिक वार्ता* हे सदर चालविले. या त्रैमासिकात अभ्यासपूर्ण असे अनेक लेखही लिहिले.

डॉ.भानुशालींची ग्रंथसंपदाही मोठी आहे. अर्थशास्त्राशी निगडित अशी ३१ पुस्तके त्यांनी सिध्द केलेली आहेत. त्यातील काही पुस्तके विविध विद्यापीठांमध्ये क्रमिक पुस्तके म्हणून मान्य झालेली आहेत. त्यांची *'Enterpreneurship Development'* आणि सेवानिवृत्तीनंतर लिहिलेले *'Management in the Twentieth Century'* आणि श्रीलंका, पाकिस्तान, बांग्लादेश व भारत या देशांमधील दारिद्र्य, त्याची परिगणना, उपाय आणि परिणाम यावर आधारित *'Poverty'* ही पुस्तके विशेष मान्यता पावली. मी सेवानिवृत्तीनंतर यूजीसीच्या प्राथमिक सहकार्याने हाती घेतलेल्या सामाजिक शास्त्रांमधील संज्ञा-सिध्दान्तांचा स्पष्टीकरणात्मक कोष या बृहत् प्रकल्पातील *अर्थशास्त्र* या खंडात निम्मेपेक्षा अधिक काम त्यांनी पूर्ण केले. उर्वरित काम डॉ.कुंदा दामले व प्रा. प्रकाश कुलकर्णी यांच्या सहाय्याने पूर्णत्वाच्या टप्प्यावर आलेले आहे. अन्य खंडांप्रमाणेच सुमारे १२०० पृष्ठांचा हा आठवा खंडही एखाद्या वर्षात प्रकाशित होईल. दु:ख होते ते याचे की डॉ. भानुशालींच्या हयातीत हा खंड प्रकाशित होऊ शकला नाही. पण *कालाय तस्मै नम:।* एका ज्ञानपिपासू, उत्साहमूर्ती आणि आनंदयात्रीच्या पवित्र स्मृतीस माझ्यातर्फे व अर्थसंवाद परिवारातर्फे अभिवादन !

- * -

# महाराष्ट्राच्या ग्रामीण विकासात ग्रामपंचायतींचे योगदान: पन्हाळा तालुक्याचा अभ्यास

**जे. एस. पाटील**, कराड.
प्राचार्य, शिक्षण महर्षी बापूजी साळुंखे महाविद्यालय.
अधिष्ठाता, सामाजिक शास्त्रे, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**बी. जे. कदम**, कापशी (वारणा)
अधिव्याख्याता, श्री संत गाडगेबाबा महाविद्यालय,
ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर.

**प्रस्तावना (Introduction)**

कोणत्याही देशामध्ये अगर अर्थव्यवस्थेमध्ये शासनाची महत्त्वाची भूमिका असते. पुनर्रचनेच्या काळातसुद्धा अर्थव्यवस्थेतील शासनाचे महत्त्व कमी झालेले नाही. याउलट समाजाच्या आर्थिक आणि सामाजिक प्रगतीच्यावेळी लोकांच्या शासनाकडून असलेल्या अपेक्षा सातत्याने वाढत आल्या आहेत. त्यामुळे आर्थिक प्रगतीमधील शासनाच्या भूमिकेचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

शासनाचे कार्य विविध स्तरावर चालते जसे की, राष्ट्रीय, राज्य, स्थानिक इत्यादी या प्रत्येक स्तरावर त्या त्या भागातील आर्थिक आणि सामाजिक प्रगतीसाठी शासनाचा प्रातिनिधीक स्वरूपातील सहभाग अत्यंत महत्त्वाचा असतो. ढोबळमानाने राष्ट्रीय स्तरावर शासन नेहमी अर्थव्यवस्थेतील सुधारणांना मूर्त स्वरूप देण्याचा प्रयत्न करते.

त्याचप्रमाणे स्थानिक प्रशासनांनी आपल्या भागातील प्रगतीच्या कार्याला गती देणे अपेक्षित असते. ग्रामीण भागातील प्रशासकीय संस्था त्यांच्या अधिपत्याखालील प्रभागाच्या प्रगतीला गती देण्यासाठी प्रयत्नशील असतात. यालाच ग्रामविकास किंवा ग्रामीण विकास (Rural Devlopment) असे संबोधले जाते. महात्मा गांधी हे आदर्श ग्रामीण अर्थव्यवस्थेचे पुरस्कर्ते होते. त्यामुळेच ग्रामीण विकासातील स्थानिक स्वराज्य संस्थाचे महत्त्व तपासणे गरजेचे आहे. या पार्श्वभूमीवरच महाराष्ट्र राज्यातील कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा तालुक्यातील ग्रामपंचायतींचा संदर्भ घेऊन सदरच्या लेखामध्ये 'ग्रामीण विकासामधील ग्रामपंचायतींचे महत्त्व' यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

**ग्रामीण विकासाची संकल्पना (Concept of Rural Development)**

आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये ग्रामीण विकासाचे विशेष महत्त्व आहे. कारण आजही ७२% लोकसंख्या ग्रामीण भागातच आहे. त्यामुळे ग्रामीण भागाच्या विकासाशिवाय देशाचा सर्वांगीण विकास शक्य नाही. भारतासारख्या विकसनशील राष्ट्राला विकसित अर्थव्यवस्थेमध्ये रुपांतर करण्यासाठी ग्रामीण भारताच्या सामाजिक आणि आर्थिक उन्नतीला मूर्त स्वरूप देणे गरजेचे आहे.

''ग्रामीण विकास म्हणजे गरीब, लहान व मध्यम शेतकरी कष्टकरी आणि मजूरांचा सामाजिक आणि आर्थिक स्तर सुधारणे होय.''

''ग्रामीण विकास म्हणजे ग्रामीण स्त्री-पुरूष व मुलांना त्यांच्या इच्छा आणि गरजांपेक्षा अधिक सुखसुविधा पुरवणे यामध्ये सर्वात गरीब जनतेला उदरनिर्वाहासाठी सर्वाधिक रोजगार संधी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत.''

माजी अर्थमंत्री सी. सुब्रमण्यम यांच्या मते, ''ग्रामीण विकास म्हणजे व्यक्तीला उत्पादक समाजोपयोगी व्यवसायात निर्वाह उत्पन्न मिळेल अशा पद्धतीने रोजगार देण्यासाठी उपलब्ध नैसर्गिक साधनसामग्रीचा रचनाबद्ध, शास्त्रीय व एकात्मिक पद्धतीने वापर करणे.''

''ग्रामविकास म्हणजे ग्रामीण भागातील नैसर्गिक व मानवी संसाधनसामग्रीचा शास्त्रीय एकात्मक दृष्टीने पर्याप्त वापर करून ग्रामीण भागातील गरीब जनतेचे जीवनमान उंचावणे व त्यांना स्वयंपूर्ण करणे होय.''

''ग्रामीण विकास म्हणजे खेड्यांची सर्वांगीण प्रगती घडवून आणण्यासाठी केलेले कार्य होय.'' ग्रामीण विकास या प्रक्रियेत ग्रामीण भागातील जनतेच्या आर्थिक व सामाजिक जीवनात सुधारणा घडवून आणली जाते.''

भारतीय नियोजन मंडळाच्या मते, ''ज्या प्रक्रियेमुळे ग्रामीण जनतेच्या आर्थिक व सामाजिक जीवनात सुधारणा घडवून आणली जाते ती प्रक्रिया म्हणजे ग्रामीण विकास होय.''

एस. के. डे. यांच्या मते, '' ग्रामीण विकास ही एक अशी प्रक्रिया आहे की, ज्यायोगे जनतेच्या आर्थिक आणि सामाजिक सुधारणा घडवून आणल्या जातात. शेती, पशुपालन, जलसिंचन, सार्वजनिक आरोग्य, शिक्षण, वाहतूक व दळणवळण, उद्योगधंदे यांच्या विकासाचा समावेश ग्रामीण विकासात होतो.''

**ग्रामपंचायत-स्थानिक स्वराज्य संस्थेतील महत्त्वाचा घटक(Village Panchayats as a contsitiuent of Rural Local Bodies):**

भारतामध्ये स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजे सर्वात खालच्या स्तरावरील शासन होय. त्यामध्ये ग्रामीण आणि शहरी असे दोन भाग असतात. महाराष्ट्राचे त्रिस्तरीय स्थानिक स्वराज्य व्यवस्था आहे. त्यामध्ये जिल्हापरिषद सर्वात वरच्या स्तरावर, पंचायत समिती मधल्या स्तरावर आणि

ग्रामपंचायत सर्वात खालच्या स्तरावर असते. इतर काही राज्यामध्ये त्रिस्तरीय व्यवस्था आहे.

भारतामध्ये आणि विशेष करून महाराष्ट्रामध्ये ग्रामपंचायत हा स्थानिक स्वराज्य संस्थामधील एक महत्त्वाचा आणि मुलभूत घटक मानला जातो. ग्रामीण भागातील जनतेचा ग्रामपंचायतीशी जवळचा संबंध येतो. २००८-०९ मध्ये महाराष्ट्रातील ग्रामपंचायतीची संख्या २७९२० इतकी होती. देशाच्या आर्थिक सामाजिक प्रगतीमध्ये आणि खास करून ग्रामीण विकासामध्ये ग्रामपंचायती महत्त्वाची भूमिका पार पाडतात.

महात्मा गांधीजींनी नेहमी ग्रामीण अर्थव्यवस्थेला अधिक महत्त्व दिले. सरकारने १९९२-९३ मध्ये ७३ वी व ७४ वी घटना दुरूस्ती केली. ७३ व्या घटना दुरूस्तीमध्ये भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थांची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या यामध्ये वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे ग्रामपंचायतीच्या अभ्यासाची व्याप्ती आणि महत्त्व अधोरेखित होते. शहरी आणि ग्रामीण भागातील विकेंद्रीत आणि लोकशाही तत्त्वावर आधारीत शासनव्यवस्थेची पायाभूत रचना निर्माण करण्यासाठी संसदेचा हा निर्णय महत्वाचा आहे.

**अभ्यासाचे महत्त्व (Significance of the Research study):**

ग्रामीण विकासामध्ये ग्रामपंचायतीची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे. कारण ग्रामपंचायतीचा अगदी जवळचा संबंध ग्रामीण विकासाशी आहे. जोपर्यंत ग्रामीण भागाचा विकास होत नाही तोपर्यंत सर्वांगीण विकास शक्य नाही. त्याच बरोबर ग्रामीण भागामध्ये निर्माण होणाऱ्या समस्येवर मात ग्रामपंचायत करू शकते. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्ह्यातील ग्रामपंचायतीची ग्रामीण विकासामधील भूमिका स्पष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**अभ्यासाची उद्दिष्टे (Objectives of the Research study):**

१)ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था विशेषकरून ग्रामपंचायतीच्या आर्थिक बाबी अभ्यासणे.

२)ग्रामीण विकासाच्या संकल्पनेचा अभ्यास करणे.

३)महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्ह्याचा संदर्भ घेऊन ग्रामपंचायतीची ग्रामीण विकासातील भूमिका तपासणे.

४)ग्रामीण विकासाला मूर्त स्वरूप देण्यामध्ये ग्रामपंचायतींना येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करणे.

५)निर्माण होणाऱ्या समस्येवर उपाय सुचविणे.

**गृहितक (Hypothesis of Research study):**

सदरच्या अभ्यासासाठी पुढीलप्रमाणे गृहितक मांडण्यात आले आहे.

"स्थानिक ग्रामीण संस्था विशेषकरून ग्रामपंचायती सातत्यपूर्ण (चिरकालीन) ग्रामीण विकासाला चालना देवू शकतात. परंतु अपुरी साधने हा एक मोठा अडसर आहे".

**तथ्य संकलन आणि संशोधन पद्धती:**

**(Data base and Researeh Methodology)**

सदरच्या अभ्यासासाठी दुय्यम सामग्रीचा वापर माहिती संकलनप्रसाठी करण्यात आले आहे. विशेषता ग्रामपंचायतीच्या अंदाजपत्रकाचा वापर करण्यात आला. शिवाय महाराष्ट्र आर्थिक पाहणी अहवाल, कोल्हापूर जिल्ह्याचे आर्थिक सर्वेक्षण इत्यादीमधून शासकीय प्रशासनामधुनही माहिती गोळा करण्यात आली आहे. सदर संशोधनामध्ये २००९-१० या आर्थिक वर्षाचा विचार करण्यात आला आहे. आणि त्याद्वारे अभ्यासविषयाचे प्रतिनिधिक पृथ्यकरण करण्याचा प्रयत्न केला आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा तालुक्यात एकुण १११ ग्रामपंचायती असून त्यापैकी ६% म्हणजेच ६ ग्रामपंचायती निवडण्यात आल्या आहेत. १)कोडोली २) वाडी रत्नागिरी ३) पनोरे ४) कोलिक ५) पिसात्री ६)साळवाडी सदरच्या ग्रामपंचायतीची मिळवलेली माहितीचे गृहितके आणि उद्दिष्टावर आधारित वर्गीकरण करून सारणीच्या स्वरुपात मांडली आहे. गुणोत्तर पद्धती, सरासरी पद्धती इत्यादी गणिती पद्धतीचा अवलंब केला आहे.

**तक्ता क्र. १**

**ग्रामपंचायतीचे अंदाजपत्रकाचे सर्वसाधारण स्थिती**

**Overall Budgetary situation of village panchayats ( In Rs):**

| ग्रामपंचायत | उत्पन्न | खर्च | शिल्लक /तुट |
|---|---|---|---|
| कोडोली | ५१४५५७२(४१.१४%) | ६०७७३५६(४७.००%) | -१३१७८४(१२.८५%) |
| वाडीरत्नागिरी | ४९५८८००(४१.६५%) | ५७७३७२३ (४४.६५%) | -८१४९२३ (७९.४४%) |
| पन्नोरे | ४९६६५१(४.१७%) | ५१५५१५(३.९८%) | -१८९४४(१.८५%) |
| कोलिक | १२३६४०(१.०४%) | २१७०३०(१.६८%) | -९३४९० (९.१०%) |
| पिसात्री | २४०४००(२.०२%) | २००४००(१.५५%) | +४०००० (-३.९०%) |
| साळवाडी | १४०९७७ (१.१८%) | १४७७१२ (१.१४%) | -६७२५(०.६६%) |
| एकुण | ११९०६०४० (१००%) | १२९३१८९६ (१००%) | -१०२५८५६(१००%) |

*स्त्रोत : ग्रामपंचायतीचे अंदाजपत्रक २००९-१०*

*टीप : ( ) अशा कंसातील आकडे (उत्पन्न, खर्च, तुट) यांच्या बेरजेशी टक्केवारी दर्शवितात.*

## तक्ता क्र. २

## ग्रामपंचायतीच्या खर्चाचा आकृतीबंध

## (Size and Expenditure Pattern of Village Panchayats)

| खर्चाचा तपशील | कोडोली | वाडीरत्नागिरी | पन्नोरे | कोलिक | पिसात्री | साळवाडी |
|---|---|---|---|---|---|---|
| प्रशासन | १०८१११५ | ४४०००० | ८२७०७ | २५६०० | १०८०० | २१७२० |
| | (१७.७८%) | (७.६२%) | (१६.०४%) | (११.८०%) | (५.३९%) | (२०.१२%) |
| मूलभूत | २०४६४४५ | ८००००० | २४३४४६ | ३५० | ५५०० | २७१६० |
| | (३३.६७%) | (१३.८६%) | (४७.२१%) | (०.१६%) | (२.७५%) | (१८.३८%) |
| आरोग्य | ११९४१५७ | २००००० | १४२३५५ | ७००० | ९००० | ५११६५ |
| | (१९.६६%) | (३.४६%) | (२७.६०%) | (३.२३%) | (४.४९%) | (५.१७%) |
| दिवाबत्ती | १७७१०७ | २११००० | २२५३१ | ३५०० | ११००० | ७६४६ |
| (२.९१%) | (३.७९%) | (४.३६%) | (१.६१%) | (५.४९%) | (५.१७%) | |
| शिक्षण | १३१७३७ | १००० | १३१५ | ४५०० | ३००० | २२८५२ |
| | (२.१६%) | (०.०२%) | (०.२५%) | (२.०७%) | (१.५०%) | (१५.४७%) |
| कर्ज व उचल | १४४५९५५ | ४११३७२३ | २३२४१ | १७६०८० | १६११०० | ११५९ |
| | (२३.८२%) | (७१.२५%) | (४.५४%) | (८१.१३%) | (८०.३९%) | (०.८१%) |
| एकूण | ६०७७३५६ | ५७७३७२३ | ५१५५१५ | २१७०३० | २००४०० | १५७७०२ |

*स्त्रोत : तक्ता क्र. २ प्रमाणे.*

टीप : १) ( ) अशा कंसातील आकडे एकूण खर्चाशी टक्केवारी दर्शवितात.

स्थानिक स्वराज्य संस्थेतील महत्त्वाचा घटक असल्याने जनतेच्या ग्रामपंचायतीकडून अधिक अपेक्षा असतात. कोल्हापूर हा महाराष्ट्रातील एक प्रगत जिल्हा असल्याने ग्रामपंचायतीचे कार्य समजण्यासाठी कोल्हापूर जिल्ह्याला विशेष महत्त्व आहे. सुलभता आणि परिणामकारकता यावी म्हणून केंद्र आणि राज्य शासन आपल्या कार्याचे विकेंद्रीकरण करतात.

पायाभूत आर्थिक स्त्रोत आणि एकूणच अंदाजपत्रकाची स्थिती यावर ग्रामपंचायतीची ग्रामीण विकासातील भूमिका अवलंबून असते. (टेबल नं. १) ७३ व्या घटना दुरूस्तीमध्ये एकूण विषय राज्य शासनाकडून स्थानिक स्वराज्य संस्थाकडे हस्तांतरीत करण्यात आले असून त्याची यादी ११ व्या परिशिष्टामध्ये दिली आहे.

## तक्ता क्र. ३
## ग्रामपंचायतीच्या उत्पन्नाचे मार्ग
## (Size and Rerenue Sources of village Panchayats)

| उत्पन्नाचे स्त्रोत | कोडोली | पन्हाळे | वाडीरत्नागिरी | कोलिक | पिसात्री | साळवाडी |
|---|---|---|---|---|---|---|
| अ) करापासून मिळणारे उत्पन्न | ३०५३१९४[५१.३५%] | २१६४७०[४३.५८%] | ३५१७०००[७०.९२%] | ५६७०० [४५.८६%] | ३६३०० [१५.१०%] | ५४८५२[३८.९०%] |
| १) घरफाळा | १६५८६००(५४.३२%) | ८४७४९(३९.१५%) | १५०००००(४२.६%) | ४०००० (७०.५५%) | २५००० (६८.८७%) | ४४०४६(८०.२९%) |
| २) व्यवसाय कर | ३७४८३(१.२३%) | ११६(०.०७%) | १७००००(०.४८%) | १७०० (३.००%) | १० (०.२५%) | - |
| ३) आरोग्य सेवेवरील कर | ९९८४९(३.२७%) | १२२६०(५.६६%) | ९२३५०० (२६.२६%) | ८००० (१४.११%) | ६२१० (१७.११%) | ४४३०(८.०८%) |
| ४) पाणीपट्टी | १०९१४०१(३५.७५%) | १.०७०८५(४९.४६%) | १५३००० (४.३५%) | ७००० (१२.३४%) | - | - |
| ५) वीज कर | ९९८४९ (३.२७%) | १२७६०(५.६६%) | ९२३५०० (२६.२६%) | - | - | ४४३०(८.०८%) |
| ६) इतर | ६६०१२(२.१६%) | - | - | - | ५००० (१३.७७%) | १९४६(३.५५%) |
| ब) करेत्तर उत्पन्न | २८४०६०[४.७७%] | ५८००[१.१६%] | १२५००० [२.५२%] | ५२०००[४२.०६%] | ४५००० [१८.९३%] | - |
| १) जोडणी आकार | ५३५० (१.८८%) | - | ३०००० (२४.००%) | ५००० (९.६२%) | - | - |
| २) घरभाडे | ५६७५० (१९.९८%) | - | - | - | - | - |
| ३) रिकाम्या जागेवरील आकार व इतर | २२१९६०(७८.१४%) | ५८००(१००%) | ९५००० (७६.००%) | ४७००० (९०.३८%) | ४५००(१००%) | - |
| क) अनुदान व देणग्या | १७३०१०३[२९.१३%] | २७४३८१[५५.२५%] | ३११३००[६.२७%] | १४४४० [११.६८%] | १५८१०० [६५.७७%] | ८६१२५[६१.०९%] |
| ड) कर्ज व उचल इत्यादी | ८२३२१५[१२.१२%] | - | १००५५००[२०.२८%] | ५०० [०.४%] | ५०० [२०.२१%] | - |
| एकूण उत्पन्न (अ+ब+क+ड) | ५९४५५७२ | ४९६६५१ | ४९५८८०० | १२३६४० | २४०४०० | १४०९७७ |

*स्त्रोत : ग्रामपंचायतीचे अंदाजपत्रक २००९-१०*

*टीप : १) ( ) अशा कंसातील आकडे एकूण उत्पन्नाशी टक्केवारी दर्शवितात.*

*२ [ ] अशा कंसातील आकडे कर उत्पन्नाशी टक्केवारी दर्शवितात.*

या संशोधनासाठी निवडण्यात आलेल्या ग्रामपंचायतीच्या उत्पन्नाचे स्त्रोत आणि खर्च यामध्ये मोठ्या प्रमाणात तफावत असल्याचे दिसून येते. (टेबल नं. १) कोडोली ही सर्वाधिक ताळेबंद (उत्पन्न खर्च) असलेली ग्रामपंचायत आहे.

परंतु सर्व ग्रामपंचायती ग्रामीण विकासाकरिता आपल्या उत्पन्नाचे एकत्रीकरण करून त्याचे यथोचित नियोजन करण्यात अयशस्वी ठरल्या आहेत हेही तितकेच सत्य आहे. आर्थिक-सामाजिक प्रगतीकरिता ग्रामपंचायतीचे उत्पन्नाचे स्त्रोतच सर्वाधिक महत्त्वाचे ठरतात. म्हणून उत्पन्नाची साधने व व्याप्ती याची चाचपणी करणे गरजेचे आहे. (तक्ता क्र. ३)

तक्ता क्र. ३ मधील आकडे दर्शवितात की, ग्रामपंचायतीचा सर्वात मोठा उत्पन्न स्त्रोत म्हणजे कर उत्पन्न हा आहे. परंतु विविध ग्रामपंचायतीच्या कर उत्पन्नामध्ये बऱ्याच अंशी तफावत आढळून येते. घरफाळा आणि पाणीपट्टी (पिण्याच्या पाणी पुरवठ्याची योजना असलेल्या ग्रामपंचायतीमध्ये) हे कर उत्पन्नामध्ये सर्वाधिक भर टाकतात. याशिवाय जिल्हा परिषद आणि राज्य शासनाकडून मिळणारे अनुदान हे ग्रामपंचायतींचा महत्त्वाचा उत्पन्न स्त्रोत आहे.

ग्रामपंचायती उत्पन्नाकरीता कर्जावर अधिक अवलंबून असत नाही. कोडोली ग्रामपंचायत व्यतिरिक्त इतर ग्रामपंचायतीमध्ये कराव्यतिरिक्त उत्पन्नाचा उपयोग फारच कमी प्रमाणात केल्याचे दिसून आले.

ग्रामीण विकास (विशेष करून आर्थिक सामाजिक विकास) साधण्याकरिता करण्यात येणारे प्रयत्न मुख्यत्वेकरून ग्रामपंचायतीची व्याप्ती आणि खर्चाचा आराखडा यावर अवलंबून असतात.

तक्ता क्र. ३ वरून लक्षात येते की, रस्ते, पाणी इत्यादी सोयी सुविधा पुरवण्यासाठी ग्रामपंचायतींची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. अशा पद्धतीच्या सुविधा या आर्थिक विकास गतिमान करण्यासाठी गरजेच्या आहेत. त्यापाठोपाठ आरोग्य सुविधा आणि समाजसुधारणेच्या सुविधा (की ज्या ग्रामीण विकासाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी गरजेच्या आहेत) पुरवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

आर्थिक टंचाईमूळे ग्रामपंचायती शेती, लघु उद्योग, पशुपालन, आणि सुरक्षा यासारख्या कार्याकडे अधिक लक्ष देऊ शकल्या नाहीत. याचबरोबर शिक्षणासाठीही खर्चाची तरतूद काही प्रमाणात करण्यात आली आहे. शैक्षणिक सुविधा आणि दिवाबत्ती इत्यादीपेक्षा ग्रामपंचायतीचा प्रशासकीय खर्च अधिक आहे. उच्च आणि सातत्यपूर्ण विकासाकरिता गरजेचे असलेल्या गुंतवणूक या गोष्टीकरिता ग्रामपंचायतीकडे पुरेसा स्त्रोत नसल्याचे दिसून येते.

**निष्कर्ष (Conclusions):**

कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा तालुक्यातील ग्रामपंचायतीचा अभ्यास करताना खालीलप्रमाणे निष्कर्ष निघाले.

१) आर्थिक तूट हे दर्शविते की, स्थानिक स्वराज्य संस्थांमधील एक महत्त्वाचा घटक असलेल्या ग्रामपंचायतींचे उत्पन्नाचे स्त्रोत अपुरे आहेत हाच ग्रामीण विकासातील एक मोठा अडथळा बनला आहे.

२) ग्रामपंचायतींचे उत्पन्न करांवर अधिक अवलंबून आहे. कर हा एकूण उत्पन्नामध्ये ४५% इतका हिस्सा आहे. निश्चित उत्पन्न स्त्रोत ही याची जमेची बाजू आहे.

३) ग्रामपंचायती कर उत्पन्नावर अधिक निर्भर राहिल्याने जनतेवर त्याचा भार पडतो त्यामुळे कराव्यतिरिक्त उत्पन्नाचा एकूण उत्पन्नातील वाटा वाढणे गरजेचे आहे. परंतु कोडोली व्यतिरिक्त इतर ग्रामपंचायतींनी शासनाच्या आर्थिक स्थितीवर आणि विकास कार्यावर दूरगामी परिणाम करणाऱ्या या महत्त्वाच्या कराव्यतिरिक्त उत्पन्न स्त्रोताकडे दुर्लक्ष केल्याचे दिसते.

४) आर्थिक स्वयंपूर्णतेचा अभाव हा ग्रामपंचायती समोरचा महत्त्वाचा अडथळा आहे. कोडोली ग्रामपंचायत व्यतिरिक्त अन्य ग्रामपंचायती या अनिश्चित अशा अनुदानावर (जवळपास ६०%) अवलंबून आहेत.

५) आपल्या कार्यक्षेत्राच्या विकासाकरीता एक महत्त्वाचा स्त्रोत म्हणून कर्ज या पर्यायाचा विचार ग्रामपंचायती करताना दिसत नाहीत.

६) प्रशासकीय खर्च तुलनेने अधिक (१५% ते २०%) असल्याने त्याचा परिणाम अप्रत्यक्षरित्या इतर विकासावर होतो.

७) नागरी सुविधांचा राष्ट्राच्या आर्थिक विकासावर विशेष परिणाम होतो. याबाबतीत ग्रामपंचायतीचे कार्य चांगले आहे. जवळपास ३३% खर्च नागरी सुविधांवर होताना दिसतो. जे ग्रामीण विकासाला उपकारक ठरते.

८) सामाजिक कार्यावर ३०% खर्च करण्यात आला आहे. जरी हा खर्च अपुरा असला तरी ग्रामीण विकासाला मूर्त स्वरूप देण्यामध्ये त्याचा चांगला उपयोग होतो.

९) दिवाबत्तीवर खूप कमी (४%) खर्च करण्यात आला. ग्रामीण विकास खऱ्या अर्थाने साह्य करण्यासाठी ही सुविधा समाजातील गरीबातील गरीब लोकापर्यंत पोहोचणे गरजेचे आहे.

१०) नागरिकांची एकूण कार्यक्षमता सुधारण्याकरीता शिक्षण महत्त्वाचे आहे. पण याकडे तुलनेने कमी लक्ष देण्यात आले आहे (५%)

११) आपल्या कार्यक्षेत्राचा विकास करण्याचा प्रयत्न ग्रामपंचायती करत आहेत. पण अपुरे उत्पन्न हा त्यातील एक मोठा अडथळा आहे.

१२) सातत्यपूर्ण विकासासाठी वनीकरण करणे, संडास, मुताऱ्या बांधणे यासारखे पर्यावरण संतुलन ठेवणारे उपक्रम राबवणे गरजेचे

आहे. पण दुर्दैवाने, अपेक्षित प्रमाणात ग्रामपंचायती पर्यावरण रक्षणाकडे दुर्लक्ष केल्याचे जाणवते.

**उपाययोजना (Suggestions):**

ग्रामीण विकास मुख्यत्वेकरून आर्थिक, सामाजिक विकास साधण्याकरिता खालील उपाययोजना परिणामकारक ठरतील.

१) राज्याच्या वित्तआयोगाने ग्रामपंचायती आर्थिक त्रुटीकडे लक्ष देऊन सदरची तूट भरून काढण्यासाठी योग्य त्या उपाययोजना करणे गरजेचे आहे.

२) ग्रामीण विकासाकरिता उत्पन्नाचा हमखास स्त्रोत असलेल्या कर उत्पादनामध्ये वाढ करण्यासाठी राज्यशासनाने ग्रामपंचायतीना अधिक अधिकार दिले पाहिजेत.

३) कराव्यतिरिक्त उत्पन्नाचा विचार न करणे आणि विनियोग न करणे हा अडथळा दूर करण्यासाठी कराव्यतिरिक्त उत्पन्न स्त्रोतांचा शोध घेणे गरजेचे आहे. त्यामुळे ग्रामपंचायतीचा आर्थिक स्तर सुधारायला मदत होईल.

४) राज्य शासनाकडून व जिल्हा परिषदेकडून मिळणारे अनुदान हे अनिश्चित स्वरूपाचे असल्याने त्याचा ग्रामपंचायतीच्या विकासावर परिणाम होताना दिसून येतो. शासकीय अनुदान हे अनिश्चित स्वरूपाचे व एकूण खर्चाच्या प्रमाणावर आधारीत आहे.

५) कर्जाद्वारे भांडवल उभा करणे हा ग्रामीण विकासासाठी महत्त्वाचा मार्ग आहे. अर्थात त्याकरिता त्याची उपयोगिता वाढवणे व कर्जाची परतफेड करण्याची तरतूद करणे या गोष्टीकडे लक्ष दिले गेले पाहिजे.

६) ग्रामीण विकासामध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडणाऱ्या आरोग्य सुविधा व समाज कल्याणकारी योजनांसाठी विशेष तरतूद करणे गरजेचे आहे.

७) ७३ व्या घटना दुरूस्तीनुसार ग्रामीण विकासाबरोबर पर्यावरणीय संतुलनावर अधिक भर देणे गरजेचे आहे. त्यासाठी वेगळी तरतूद असावी.

८) समाजातील श्रीमंत वर्गाकडून देणगीदार, प्रायोजक, पुरस्कर्ते आदींचा शोध घेवून त्यांना प्रोत्साहित करणे उद्युक्त करणे गरजेचे आहे.

९) ग्रामीण विकासाकरिता ग्रामपंचायतीच्या कामामध्ये सहभाग वाढवणे अत्यंत गरजेचे आहे.

१०) ग्रामीण विकासामधील अन्य घटकाचा विकास करणे गरजेचे आहे. उदा. पाणीपुरवठा, पर्यावरण संवर्धन, वाहतूक दळणवळण, नविन उद्योगाची स्थापना इत्यादी.

**समारोप (Concluding Remarks):**

भारतीय समाजरचनेचा विचार करता ग्रामीण विकासाला अत्यंत महत्त्व आहे. तसेच

ग्रामीण विकासच केवळ भारतीय अर्थव्यवस्था मजबूत करू शकतो. पण ग्रामीण विकासामध्ये प्रत्यक्ष लाभार्थी (ज्यांना योजनेतील सुविधाचे वाटप होते) याचा काळजीपूर्वक अभ्यास करणे गरजेचे आहे. पुरेशा माहितीचा अभाव हा यामधील एक मोठा अडथळा असून प्राथमिक माहिती बरोबर सूक्ष्म पातळीवर जाऊन अध्ययन केले पाहिजे. भारतासारख्या देशामध्ये ग्रामीण विकासासारख्या विषयावर अभ्यास करण्याला अधिक वाव आहे. आणि हे संशोधन उपक्रम एम.फिल, शोध प्रबंध, पी.एच.डी. प्रबंध इत्यादीद्वारे शक्य आहे.

**संदर्भ : References**


1. Mathur B.L. (2000) *Rural Development and Cooperation RBSA* Publishers Jaipur. P.4
2. Ibid- P.S
3. Sukthankar. D.M. *Urban India* P.13
4. Mohanty P.V. *Urban India*. P.57
5. Vibhute Bhalba (1996) *Working of Village panchayats* (Marathi) Manovikas Prakashan Mumbai- P. 118
6. Dr. P. S. Kamble (2008) *Village panchayats and Rural Development. Research Paper*, Southern Economist.
7. Verma S.B., Singh V. P, *Jikoka S.K. Rural Development Reforms*
8. Suresh K. Sharma, *Rural Development in India.*
9. आर्थिक पाहणी अहवाल, २००९-१०.


- * -

# आर्थिक सुधारणा आणि महाराष्ट्राच्या औद्योगिक संरचनेतील संक्रमण

डी.सी.तळुले, एम.एच.शिंदे, अहमदनगर,
पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग, अहमदनगर कॉलेज.

## प्रस्तावना:

देशाचा आर्थिक विकास अर्थव्यवस्थेतील कृषी, औद्योगिक व सेवा क्षेत्रांची कामगिरी व उत्पादनक्षमतेतील बदलावर अवलंबून असतो. भारतीय अर्थव्यवस्था कृषीप्रधान मानली जात असली तरी १९७०-७१ नंतर कृषी क्षेत्राचा अंतर्गत उत्पादनातील हिस्सा कमी होताना तर सेवाक्षेत्राचा आणि उद्योगक्षेत्राचा हिस्सा वाढत असल्याचे दिसून येते (Sawade,१९८५)[१]. १९८० च्या दशकात स्विकारण्यात आलेले समग्रलक्षी आर्थिक उदारीकरणाचे धोरण व त्याद्वारे औद्योगिक क्षेत्रातील सार्वजनिक क्षेत्राची मक्तेदारी कमी करून खाजगीकरणाच्या प्रक्रियेस दिलेले प्रोत्साहन, औद्योगिकरणाच्या प्रक्रियेस गती देणारे ठरले. एकंदरीतच याचा औद्योगिक क्षेत्रावर सकारात्मक परिणाम झाल्याचे दिसून येते. तसेच औद्योगिक आणि कृषी क्षेत्रात झालेल्या विकासोन्मुख बदलांमुळे सेवा क्षेत्राचा देखील मोठ्या प्रमाणावर विस्तार होण्यास मदत झाली. भारतीय अर्थव्यवस्था कृषीप्रधान मानली जात असली तरी राष्ट्रीय उत्पन्नात संरचनात्मक बदल होवून कृषीचा क्रमांक सर्वात शेवटी तर तिसऱ्या स्थानातील सेवा क्षेत्र (६२%) सर्वप्रथम असल्याचे दिसून येते. अर्थव्यवस्थेचे एकंदरीतच प्राथमिक क्षेत्रावरील अवलंबित्व कमी-कमी होवून सेवा व उद्योग क्षेत्राच्या माध्यमातून अर्थव्यवस्थेत रोजगार निर्मिती व गुंतवणूकीत वाढ घडवून आणून निर्यातीत वाढ करून व्यवहारतोल असमतोल कमी करणे याकडे अधिकतम लक्ष देणाऱ्या उद्दिष्टांना प्राधान्य देण्याच्या दृष्टीने नियोजनाचे प्रयत्न असल्याचे दिसून येतात (Gondawale, २००५)[२].

जगात सर्वप्रथम १८ व्या शतकात इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती झाली. त्यापाठोपाठ अमेरिका, जर्मनी, जपान इ.देशांमध्ये औद्योगिक क्रांती होवून अर्थव्यवस्थांचे संक्रमण झाले. त्यामुळे जगात औद्योगिकीकरणाचे महत्त्व वाढू लागले. भारतातही औद्योगिकीकरणाची प्रक्रिया स्वातंत्र्यपूर्व काळातच सुरू झाली असली तरी तिला योग्य ती गती मिळू शकली नाही. स्वातंत्र्यपूर्व काळात किर्लोस्कर, टाटा इ. उद्योजकांनी उद्योगांची स्थापना करून तसेच मुंबईतील कापड गिरण्यांच्या स्थापनेमुळे ब्रिटिशकालीन औद्योगिकरणाची प्रक्रिया सुरू झाली (Burange,२००३)[३]. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पहिल्याच पंचवार्षिक योजनेत कृषी क्षेत्राला विकास प्रक्रियेत प्राधान्य देण्याचे ठरविण्यात आले. कारण दुसरे जागतिक महायुध्द आणि देशाची फाळणी यामुळे अन्नधान्याची कमतरता आणि जीवनावश्यक वस्तूंची प्रचंड भाववाढ झाली होती. या समस्येवर भारताने यशस्वीरित्या मात केली. त्यानंतर दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत महालनोबीस यांच्या प्रतिमानाच्या स्वरूपात औद्योगिकीकरणाच्या दृष्टीने प्रयत्न सुरू करण्यात आले. त्या दृष्टीने १९५६ मध्ये दुसरे औद्योगिक धोरण जाहीर करण्यात आले. यानंतर विविध पंचवार्षिक योजना आणि निरनिराळया औद्योगिक धोरणांच्या माध्यमातून भारताने अपेक्षित असा औद्योगिक विकास साधला असल्याचे दिसून येते (Baratwal,१९९४)[४].

## औद्योगिक पार्श्वभूमी:

देशात औद्योगिक दृष्ट्या आघाडीवर असणारे राज्य म्हणून महाराष्ट्राचा क्रमांक नेहमी पहिल्या पाच राज्यांच्या यादीत येतो. महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर राज्यातील औद्योगिकरणाला खरी गती मिळाली असली तरी स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच मुंबईत वस्त्रोद्योगांच्या माध्यमातून राज्याला औद्योगिकीकरणाचा वारसा लाभला आहे. आजतागायत राज्याचा औद्योगिक विकास मोठ्या प्रमाणात होण्यासाठी राज्यातील कृषी आणि सेवा क्षेत्रांनी साध्य केलेली प्रगती कारणीभूत असल्याचे मान्य करावे लागेल. तसेच राज्यात पायाभुत सुविधांचा विकास आणि उपलब्ध कच्च्या मालामुळे कापड आणि साखर उद्योगांचा विकास झाला. परकीय प्रत्यक्ष गुंतवणूक (FDI) राज्याच्या औद्योगिक विकासाची जमेची बाजू आहे. १९९१ ते २००९ या कालखंडात राज्यात जवळपास ७०८५६ कोटी रुपयांची गुंतवणूक झाली असून परकीय प्रत्यक्ष गुंतवणूकीमध्ये (तक्ता क्र.१) राज्याचे स्थान प्रथम क्रमांकाचे असल्याचे दिसून येते. राज्य सरकारचे धोरण, पायाभूत सुविधांची उपलब्धता आणि बाजारपेठेच्या उपलब्धतेमुळे राज्यात परकीय प्रत्यक्ष गुंतवणूक सुरूवातीच्या काळात मोठया प्रमाणात आकर्षित झाली. महाराष्ट्राच्या वस्तूनिर्माण क्षेत्राचा भारतीय वस्तूनिर्माण क्षेत्रात महत्त्वपूर्ण वाटा आहे. मूल्यवृध्दीचा वाटा जवळपास २३ टक्के असून इतर राज्यांच्या तुलनेत निश्चितच जास्त असल्याचे दिसून येते.

**तक्ता क्र.१: प्रमुख राज्यांमधील परकीय गुंतवणूक (१९९१-२००९)**

| अ.क्र | राज्य | मान्य परकीय प्रत्यक्ष गुंतवणूक (कोटो रू.) |
|---|---|---|
| १ | आंध्रप्रदेश | १८३६१ |
| २ | गुजरात | २०७५९ |
| ३ | उत्तरप्रदेश | ५०२५ |
| ४ | महाराष्ट्र | ७०८५६ |
| ५ | तामिळनाडू | २७५६३ |

*स्त्रोत-महाराष्ट्र आर्थिक पाहणी अहवाल, २००९-१०*

भारतीय वस्तुनिर्माण क्षेत्रात महाराष्ट्राचा वाटा नेहमीच सर्वाधिक राहिलेला आहे. हे तक्ता क्र.२ वरून दिसून येते. भारतीय वस्तुनिर्माण क्षेत्रात राज्यातील वस्तूनिर्माण क्षेत्रातील निव्वळ मूल्यवृध्दीचा वाटा इतर राज्यांपेक्षा जास्त आहे. असे असले तरी, तो १९८०-८१ ते १९९९-२००० या कालखंडात सातत्याने घटत असल्याचे दिसून येते. १९८०-८१ मध्ये २४.८७ वरून २०००-२००१ साली २०.४० टक्के इतका कमी झाला तसेच राज्य वस्तूनिर्माण क्षेत्रातील उत्पादन, भांडवल, रोजगार यांचा वाटा देखील इतर राज्यांच्या तुलनेत अधिक असला तरी त्यात सातत्याने घट झाल्याचे दिसते. थोडक्यात, राज्य शासनाने विविध धोरणांच्या माध्यमातून राज्याच्या घटकांचा वाटा वाढविण्याचा प्रयत्न केला असला तरी त्यास अपेक्षित यश आलेले नाही किंवा नंतरच्या काळात इतर राज्यांचे प्रयत्न महाराष्ट्रापेक्षा यशस्वी झाले असे म्हणता येईल.

**तक्ता क्र.२: भारतीय वस्तूनिर्माण क्षेत्रात महाराष्ट्राचा वाटा (%)**

| अ.क्र | घटक | १९८० | १९८५ | १९९१ | १९९५ | २००१ | २००८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | नोंदणीकृत कारखाने | १५.५७ | १४.८२ | १४.१५ | १४.१४ | ११.९० | १२.५ |
| २ | उत्पादक भांडवल | १६.४८ | १९.०६ | १७.१३ | १६.६२ | १६.०० | १५.४८ |
| ३ | रोजगार | १४.४५ | १७.४५ | ४५.१८ | १४.४९ | ११.५० | छ.अ. |
| ४ | उत्पादन | २३.७० | २२.५४ | २०.७० | २१.१३ | १८.८० | १८.७५ |
| ५ | मूल्यवृध्दी | २४.८७ | २५.८८ | २३.३० | २२.०१ | २०.४० | २३.२६ |

देशाच्या औद्योगिक विकासात राज्यातील वस्तूनिर्माण क्षेत्राचा महत्वपूर्ण हिस्सा आहे. वस्तूनिर्माण क्षेत्रातील एकूण उद्योग गटापैकी १२ उद्योग गटांचा भारतीय वस्तूनिर्माण क्षेत्रातील राज्याचा हिस्सा सर्वाधिक आहे. देशातील एकूण उत्पादित मूल्यात पुढील उद्योग गटांचा हिस्सा एक चतुर्थांशापेक्षा जास्त असल्याचे दिसून येते.

**तक्ता क्र.३ : प्रमुख उद्योगांचा हिस्सा**

| अ.क्र. | उद्योग गट | हिस्सा (%) |
|---|---|---|
| १ | रसायने व रासायनिक पदार्थ | ३२ |
| २ | रबर, पेट्रोलियम, कोळसा व त्याचे पदार्थ | ३४ |
| ३ | धातूच्या वस्तू | ३१ |
| ४ | यंत्र सामुग्री (परिवहन सामुग्री वगळून) | १६ |
| ५ | परिवहन सामुग्री व सुटे भाग | २९ |
| ६ | भांडवली सामुग्रीची दुरूस्ती | ३३ |

*(स्त्रोत-महाराष्ट्र आर्थिक पाहणी अहवाल, २००९-१०)*

यावरून राज्याची औद्योगिक विकासाची स्थिती लक्षात येते. त्यात सातत्याने बदल होताना दिसून येतात. प्रामुख्याने समग्रलक्षी आर्थिक सुधारणोत्तर कालखंडात राज्यातील औद्योगिक संरचनेत ठळक संक्रमण झाल्याचे दिसून येते.

## संशोधन पध्दती:

नविन आर्थिक सुधारणांच्या कालखंडात महाराष्ट्राच्या औद्योगिक क्षेत्रात झालेले बदल उल्लेखनीय स्वरूपाचे आहेत. केंद्राच्या धर्तीवर आखण्यात आलेले नवीन औद्योगिक धोरण आणि त्या माध्यमातून उद्योगासोबतच परकीय गुंतवणूकीला राज्यात आकर्षित करण्याचे सरकारचे प्रयत्न सुरूवातीच्या काळात यशस्वी झाल्याचे दिसते. परिणामी इतर राज्यांच्या तुलनेत परकीय गुंतवणूकदारांनी राज्याला दिलेले प्राधान्याचे स्थान महत्वाचे आहे (Mungekar, २००३)[५]. तर विविध धोरणांच्या माध्यमातून दिल्या गेलेल्या सवलती आणि राज्याच्या राजधानीचे देशाच्या अर्थव्यवस्थेतील असलेले महत्वपूर्ण स्थान यासारख्या बाबी औद्योगिक विकासास सहाय्यभूत ठरल्या. एकंदरीतच या सर्व बाबींमुळे राज्याच्या औद्योगिक संरचनेत झालेला बदल अभ्यासणे महत्वाचे आहे.

त्या अनुषंगाने महाराष्ट्राच्या वस्तूनिर्माण क्षेत्रातील संरचनात्मक बदल तपासून पाहण्यासाठी कॉब-डग्लस उत्पादन फलाचा आधार घेण्यात आला.

$$Y=AL^{\alpha}K^{\beta} \quad \ldots\ldots\ldots\ldots\ldots\ldots (1)$$

या प्रतिमानाच्या सहाय्याने सहा समीकरणे तयार करण्यात आले असून त्यापैकी एका समीकरणाच्या आधारे संरचनात्मक बदलांची चाचणी घेण्यात आली (Kumar, २००४)[६]. राज्याच्या वस्तूनिर्माण क्षेत्रातील निव्वळ मूल्यवृध्दी (T) हे परतंत्र चल तर रोजगार (L) आणि स्थिर भांडवल (K) ही स्वतंत्र चले घेण्यात आली. या संबंधीची आकडेवारी या महाराष्ट्र आर्थिक पाहणी अहवाला मधून घेण्यात आली असून निव्वळ मूल्यवृध्दी (परिशिष्ट-I) आणि स्थिर भांडवलाची (परिशिष्ट-II) मूल्ये

जेथे;

$Y$ = निव्वळ मूल्यवृध्दी (स्थिर किंमतीस)
$L$ = कामगारांची संख्या
$K$ = स्थिर भांडवल (स्थिर किंमत)
$A$ = कार्यक्षमता प्राचल
$T$ = काळ चल

अनुक्रमे वस्तूनिर्माण उत्पादने आणि भांडवली वस्तूंच्या घाऊक किंमत निर्देशांकाने (परिशिष्ट-III) संकोच (Deflate) करण्यात आली आहेत. प्राक्कलनासाठी घेण्यात आलेली सहा समीकरणे पुढीलप्रमाणे आहेत;

$$\ln Y = a + \alpha \ln L + \beta \ln K + ui \quad \text{..........(1)}$$

$$\ln Y = a + \alpha \ln L + \beta \ln K + t + ui \quad \text{..........(2)}$$

$$\ln (Y/L) = a + \beta \ln (K/L) + ui \quad \text{..........(3)}$$

$$\ln (Y/L) = a + \beta \ln (K/L) + t + ui \quad \text{..........(4)}$$

$$\ln (Y/L) = a + \beta \ln (K/L) + (\alpha + \beta - 1) \ln L + ui \quad \text{..........(5)}$$

$$\ln (Y/L) = a + \beta \ln (K/L) + (\alpha + \beta - 1) \ln L + t + ui \quad \text{..........(6)}$$

$\alpha$ = उत्पादनाची श्रम लवचिकता
$\beta$ = उत्पादनाची भांडवल लवचिकता
$\lambda$ = तांत्रिक प्रगतीचा घातांक दर दर्शविणारे चल

उत्पादन फलाचा अभ्यास करण्यासाठी कॉब-डग्लस उत्पादन फला व्यतिरिक्त स्थिर पर्यायन लवचिकता (CES) उत्पादन फल, बदलती पर्यायन लवचिकता (VES) उत्पादन फल व Transcendental Logarithmic उत्पादन फलांचा उपयोग केला जातो. यापैकी कॉब डग्लस उत्पादन फलाचा सर्वाधिक उपयोग केला जातो. कारण या उत्पादन फलाची पर्यायन लवचिकता एकक असते असे गृहित धरण्यात आले. तसेच या उत्पादन फलाच्या आधारे मिळणारे निष्कर्ष इतर उत्पादन फलापासून मिळणा-या निष्कर्षापासून सुधारित स्वरूपाचे असतात (Kumar,२००४)[७]. भारतीय उद्योगांसंदर्भात गोल्डार (१९८६), अहलुवालिया (१९९१), विश्वनाथ कुमार (२००४) इ.अभ्यासकांनी केलेल्या अभ्यासात या उत्पादन फलाचा आधार घेतल्याचे दिसून येते.

**महाराष्ट्राच्या औद्योगिक संरचनेतील बदलांची चाचणी:**

महाराष्ट्राच्या वस्तुनिर्माण क्षेत्रात सुधारणापूर्व (१९८०-८१ ते१९९०-९१) आणि सुधारणोत्तर (१९९१-९२ते १९९९-२०००) काळात झालेला संरचनात्मक बदल अभ्यासण्यासाठी घेण्यात आलेल्या कॉब डग्लस समीकरण स्वरूपातील सहा समीकरणांचे प्राक्कलन करण्यात आले असून त्यापैकी एका समीकरणाच्या सहाय्याने संरचनात्मक बदलांच्या चाचणीसाठी निवडलेले समीकरण उत्तमरीत्या अन्वायोजित झाले आहे किंवा नाही हे तीन निकषांच्या आधारे ठरविण्यात आले. सैध्दांतिक निकष, निर्धारण गुणांक व समयोजित निर्धारण गुणांक आणि गुणांक व समयोजित निर्धारण गुणांक आणि प्रमापचूक निष्कर्ष यावरुन $A$, $a$ आणि (हे धनात्मक तसेच $0 < \alpha, \beta < 1$ असावेत).

वरील प्रतिमानांमध्ये $Y$, $L$, $K$, $T$ ही चले तर $\alpha$, $\beta$, $(\alpha + \beta - 1)$, $\lambda$ ही सहगुणक घेण्यात

आली आहेत. तसेच प्रसंभाव्य प्रमादपद $U \sim N (0, \sigma^2 u)$ गृहीत घेण्यात आले आहे. प्रतिमानात Y हे परतंत्र चल असून L आणि K ही स्वतंत्र चले आहेत. वरील प्रतिमानांच्या प्राक्कलनांसाठी वर्गीकृत सामान्य न्यूतनम वर्ग पध्दती उपयोगात आणली आहे. खालील तक्त्यांमध्ये प्राक्कलकांची मूल्ये दर्शविली आहेत

**तक्ता क्र. ४: OLS प्राक्कलनांची मूल्ये**

| समी.क्र. | A | α | β | (α + β - 1) | λ |
|---|---|---|---|---|---|
| १ | -५.९५६१ | ०.७४७ | ०.८१३ | | |
| २ | -५.४०४ | १.१५०४ | ०.३०९६ | | ०.०३९८ |
| ३ | -०.७०३४ | | ०.८७३६ | | |
| ४ | -१.०९५६ | | ०.३५१ | | ०.०४०४ |
| ५ | -५.९५६१ | | ०.८१३ | ०.५६ | |
| ६ | -५.४०४ | | ०.३०९६ | ०.४६ | ०.०३९८ |

$A = \log_e$

**तक्ता क्र.५ : सैध्दांतिक निकषानुसार तक्ताधारीत विश्लेषण**

| समी. क्र. | महत्वाधारीत निकष | | | | | चिन्ह निकष | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | A | α | B | (α + β - 1) | λ | A | α | B | (α + β - 1) | λ |
| 1 | " | " | " | — | — | " | " | " | — | — |
| 2 | " | " | " | — | " | " | " | " | — | " |
| 3 | " | - | " | - | - | " | — | " | — | — |
| 4 | " | - | " | - | " | " | - | " | - | " |
| 5 | " | - | " | " | - | " | - | " | " | — |
| 6 | " | — | " | " | " | " | — | " | " | " |

**तक्ता क्र.६ : प्राक्कलकांची मूल्य आणि महत्वपातळी**

| समी. क्र. | $R^2$ | A | α | B | (α + β - 1) | λ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ०.९६ | + | + | * | - | - |
| २ | ०.९७ | + | + | + | - | *** |
| ३ | ०.९५ | * | - | * | - | - |
| ४ | ०.९६ | * | - | + | - | ** |
| ५ | ०.९५ | + | - | * | + | - |
| ६ | ०.९६ | + | - | + | + | ** |

*=१ टक्का महत्वपातळीला महत्वपूर्ण, ** = ५ टक्के महत्वपातळीला महत्वपूर्ण, *** = १० टक्के महत्वपातळीला महत्वपूर्ण + सांख्यिकीदृष्ट्या महत्वपूर्ण नाही.

उपरोक्त सहा समीकरणातील प्राक्कलीत चलांची मूल्ये तक्त्यांमध्ये दर्शविली आहेत. या तिन्ही तक्त्यांच्या आधारे उत्तमरित्या अन्वायोजित समीकरणाची निवड करण्यात आली आहे. वरील समीकरणातील a च्या ऋणात्मक मूल्यांसाठी A ही अपूर्णांकात्मक मूल्य घेते. a चे मूल्य वाढत असताना A ची मूल्ये कमी होण्याकडे कल असतो (मात्र ते ऋणात्मक होत नाही).

**प्राक्कलीत प्रतिमानांचे विश्लेषण:**

१) या प्रतिमानातील प्राक्कलन $a = \log_e A =$ =५.९५६१ इतका असून तो A चे मूल्य कमी असल्याचे दर्शवितो. हा प्राक्कलन सांख्यिकीयदृष्टया महत्वपूर्ण नसल्याचे दिसून येते. प्रतिमानामध्ये उत्पादनाची श्रमलवचिकता ०.७४ असून सांख्यिकीयदृष्टया महत्वपूर्ण नाही तर उत्पादनाची भांडवल लवचिकता ०.८१ असून ती १ टक्का महत्वपातळीला सांख्यिकीय दृष्टया महत्वपूर्ण असल्याचे दिसून येते. $\alpha + \beta$ = १.५० इतका असून तो १९८१ ते २००० या कालखंडात वाढते अनुमाप प्रत्यय (Increasing Returns to Scale) दर्शवितो. या प्रतिमानामध्ये निर्धारण गुणांक ($R^2$) हा ९६.६४ टक्के तर समायोजित निर्धारण गुणांक ९६.२२ टक्के इतका असून त्याद्वारे प्रतिपगमन रेषा चांगल्या प्रकारे अन्वायोजित झाली आहे असे दिसून येते.

२) समी. क्र.१ मध्ये काळ चल (T) अंतर्भूत करून या प्रतिमानाची मांडणी करण्यात आली आहे. प्रतिमानातील A चे मूल्य कमी असून तो सांख्यिकीयदृष्टया महत्वपूर्ण नसल्याचे दिसून येते. उत्पादनाची श्रम लवचिकता व भांडवल लवचिकता अनुक्रमे १.१५ व ०.३० असून सांख्यिकीयदृष्टया महत्वपूर्ण नाहीत. $\alpha + \beta$ = १.४५ असून तो वाढते अनुमाप प्रत्यय दर्शवितो. काळ चलाचा सहगुणांक ०.०३९ असून तो १० टक्के महत्वपातळीला सांख्यिकीयदृष्टया महत्वपूर्ण आहे. निर्धारण गुणांक ९६.७ टक्के असून प्रतिपगमन रेषा चांगल्या प्रकारे अन्वायोजित झाली आहे असे दिसून येते.

३) या प्रतिमानाचे प्राक्कलन करत असताना $\alpha + \beta$ = १ गृहीत घेण्यात आले आहे. A चे मूल्य कमी असून १ टक्का महत्वपातळीला सांख्यिकीयदृष्टया महत्वपूर्ण असल्याचे दिसून येते. उत्पादनाची भांडवल लवचिकता ०.८७ असून १ टक्का महत्व पातळीला सांख्यिकीयदृष्टया महत्वपूर्ण दिसून येते. तर $\alpha + \beta$= १ या गृहितावरून श्रमलवचिकता ०.१३ आहे असे म्हणता येते. निर्धारण गुणांक ९५.६९ टक्के तर समयोजित निर्धारण गुणांक ९५.४४ टक्के असून प्रतिपगमन रेषा चांगल्या प्रकारे अन्वायोजित असल्याचे स्पष्ट करतात.

४) समीकरण ३ मध्ये काळ चल (T) अंतर्भूत करून या प्रतिमानाची मांडणी करण्यात आली. A चे मूल्य अल्प असून १ टक्का महत्वपातळीला सांख्यिकीयदृष्टया महत्वपूर्ण आहे. उत्पादनाची भांडवल लवचिकता ०.३५ इतकी असून सांख्यिकीयदृष्टया महत्वपूर्ण नाही. $\alpha + \beta$= १ गृहितावरून श्रमलवचिकता ०.६५ असल्याचे दिसते, काळ चलाचे मूल्य ०.०४०३ असून ५

टक्के महत्वपातळीला सांख्यिकीयदृष्टया महत्वपूर्ण असल्याचे दिसून येते. म्हणजेच अभ्यासकालावधीत तंत्रज्ञानाचा वृध्दी दर ४ टक्के असल्याचे दिसून येते. निर्धारण गुणांक ९६.४८ टक्के तर समायोजित निर्धारण गुणांक ९६.०५ टक्के असून प्रतिमानाचे अन्वायोजन चांगल्या रितीने झाल्याचे दर्शवतात.

५) समी. ४ मध्ये lnL या चलासोबत अतिरिक्त सहगुणक $\alpha + \beta$ - १ अंतर्भूत करून प्रतिमानाचे प्राक्कलन करण्यात आले आहे. प्रतिमानातील A चे मूल्य खूप कमी असून सांख्यिकीयदृष्टया महत्वपूर्ण नसल्याचे दिसून येते. उत्पादनाची भांडवल लवचिकता ०.८१ असून १ टक्का महत्वपातळीला सांख्यिकीयदृष्टया महत्वपूर्ण आहे. $\alpha + \beta$ = १ या गृहीतावरून उत्पादनाची श्रमलवचिकता ०.१९ असल्याचे स्पष्ट होते. अतिरिक्त सहगुणक $\alpha + \beta$ - १ असून सांख्यिकीयदृष्टया महत्वपूर्ण नाही. निर्धारण गुणांक ९५.७७ टक्के तर समायोजित निर्धारण ९५.२१५ टक्के असून चांगल्या प्रकारे अन्वायोजित झाल्याचे दर्शवितो.

६) समी. ५ मध्ये काळ चल (t) अंतर्भूत करून या प्रतिमानाचे प्राक्कलन करण्यात आले. या प्रतिमानातील A चे मूल्य खूप कमी असून सांख्यिकीयदृष्टया तो महत्वपूर्ण नाही. उत्पादनाची भांडवल लवचिकता ०.३० इतकी असून सांख्यिकीयदृष्टया महत्वपूर्ण नाही $\alpha + \beta$ = १ या गृहितानुसार श्रमलवचिकता ०.७० असल्याचे स्पष्ट होते. अतिरिक्त सहगुणक $\alpha + \beta$ - १ असून सांख्यिकीयदृष्टया महत्वपूर्ण नाही. प्रतिमानातील काळ चलाचा सहगुणक ०.०३९ असून तो ५ टक्के महत्वपातळीला सांख्यिकीय दृष्टया महत्वपूर्ण असल्याचे दिसून येते. निर्धारण गुणांक ९६.५४ टक्के तर समायोजन निर्धारण गुणांक ९५.८५ टक्के असून प्रतिपगमन रेषा उत्तम प्रकारे अन्वायोजित असल्याचे स्पष्ट करतात.

वरील सहा प्राक्कलीत प्रतिमानावरून उत्तमरित्या प्रतिपगमन रेषा अन्वायोजित असणारे समीकरण संरचनात्मक बदल तपासून पाहण्यासाठी घेण्यात आले. महाराष्ट्राच्या वस्तुनिर्माण क्षेत्रात झालेला संरचनात्मक बदल तपासून पाहण्यासाठी एकूण कालखंडाचे (१९८१-२०००) दोन उपकालखंडात (१९८०-८१ ते १९९१-९२) (१९९२-९३ ते १९९९-२०००) विभाजन करण्यात आले असून एकूण कालखंडासाठी प्राक्कलीत केलेल्या प्रतिमानाचे या दोन उपकालखंडासाठी स्वतंत्र प्राक्कलन करण्यात आले आहे. संरचनात्मक बदल तपासून पाहण्यासाठी चाऊ (Chow) चाचणी घेण्यात आली (Gujarathi,२००४)[८]. उपरोक्त सहा समीकरणांपैकी समीकरण क्र.६ पुढील प्राक्कलनासाठी उपयोगात आणले आहे. कारण या प्रतिमानातील अंतर्भूत चलांपैकी तांत्रिक प्रगती दर्शविणारे चल हे ५ टक्के महत्वपातळीला सांख्यिकीयदृष्टया महत्वपूर्ण आहे. तसेच या प्रतिमानासाठीचा निर्धारण गुणांक हा उच्च असून तो प्रतिपगमनरेषा उत्तम प्रकारे अन्वायोजीत झाल्याचे दर्शवितो, ते समीकरण पुढीलप्रमाणे आहे.

$\ln (Y/L) = a + \beta \ln (K/L) + (\alpha+\beta-1) + \lambda t + ui$ … (6)

**चाऊ चाचणी** (Chow Test):

चाऊ चाचणीच्या आधारे संरचनात्मक बदल तपासण्यासाठी वरील प्रतिमानाचे दोन उपकालखंडासाठीच्या प्राक्कलनासाठी विभाजन करण्यात आले ते पुढीलप्रमाणे.

$\ln (Y/L) = a + \beta_1 \ln (K/L) + (\alpha+\beta-1)_1 \ln L + \lambda_1 t + u_1 i$ ……….(7)

$\ln (Y/L) = a + \beta_2 \ln (K/L) + (\alpha+\beta-1)_2 \ln L + \lambda_2 t + u_2 i$ ……. (8)

या दोन्ही समीकरणातील सहगुणांकामध्ये सांख्यिकीयदृष्टया बदल झाला की नाही हे पाहण्यासाठी चाऊ चाचणी पुढीलप्रमाणे घेण्यात येते.

समी. ६ एकूण कालखंडासाठी प्राक्कलीत केले असून त्याद्वारे अवशिष्टय मूल्यांची बेरीज मिळविण्यासाठी पुढील समीकरण घेता येते.

$$\sum ep^2 = \sum yp^2 - \sum \hat{y}p^2$$

येथे $\sum ep^2 = 0.0917$ असून त्यासाठी मुक्तीसंख्या **n1 + k = 6** इतक्या असतील. याठिकाणी मुक्तीसंख्या १५ आहेत.

एकूण कालखंडाचे दोन उपकालखंडात विभाजन करण्यात येवून त्यासाठीच्या प्राक्कलनासाठी समीकरण ६ चे विभाजन केलेल्या दोन प्रतिमानांचा (समी.७ व ८) उपयोग करण्यात आला. त्यावरून पहिल्या उपनमुन्यासाठी अवशिष्टय मूल्य मिळविण्यासाठी पुढील समीकरण घेता येते.

$$\sum e_1^2 = \sum y_1^2 - \sum \hat{y}_1^2$$

येथे: $\sum e_1^2 = 0.02703$ असून त्यासाठीच्या मुक्तीसंख्या **n1 + k = 6** इतक्या असतील. दुसऱ्या उपनमुन्यासाठी अवशिष्टय मूल्य मिळविण्यासाठी पुढील समीकरण घेता येते.

$$\sum e_2^2 = \sum y_2^2 - \sum \hat{y}_2^2$$

त्यावरुन $\sum e_2^2 = 0.009796$ असून त्यासाठीच्या मुक्तीसंख्या **n2 – k = 5** इतक्या असतील. त्यानंतर F चाचणी घेतली ती पुढीलप्रमाणे.

$$F = \frac{\sum e_p^2 - (\sum e_1^2 - \sum e_2^2)/k}{(\sum e_1^2 + \sum e_2^2)/(n_1 + n_2) - 2k}$$

येथे K प्रतिमानातील सहगुणाकांची संख्या यानंतर दोन प्रतिमानांमध्ये बदल झाला किंवा नाही हे तपासून पाहण्यासाठी शून्य परिकल्पना घेण्यात आली. मिळालेल्या F मूल्याची तक्ता मूल्याशी तुलना करून F चे प्राप्त मूल्य F च्या तक्ता मुल्यापेक्षा अधिक (F> >F 0.05) असल्यास शून्य परिकल्पना नाकारली जाते. तेव्हा दोन्ही प्रतिपगमनामध्ये महत्वपूर्णरित्या बदल झाला आहे असे म्हणता येते. F चे मूल्य पुढीलप्रमाणे मिळविले जाते.

$$F = \frac{0.0917 - (0.02703 + 0.009796)/4}{(0.02709) + 0.009796/11}$$

$$= \frac{0.0917 - 0.0368/4}{0.0368/11}$$

$$= \frac{0.0137}{0.0033}$$

$F = 4.1515$

N1 = 4 आणि N2 = 11 असताना F चे तक्ता मूल्य $F_{0.01}$ साठी 5.67 व $F_{0.05}$ साठी 3.36 इतके मिळालेले F चे मूल्य $F < F_{0.01}$ तर $F > F_{0.05}$ असल्याने मिळालेले F मूल्य 5 टक्के महत्व पातळीला सांख्यिकीयदृष्टया महत्वपूर्ण असून येथे शून्य परिकल्पना नाकारली जाते. त्यामुळे प्राक्कलीत दोन्ही प्रतिपगमनामध्ये महत्वपूर्ण बदल झाला असल्याचे दिसून येते. थोडक्यात महाराष्ट्राच्या औद्योगिक संरचनेतील बदलांच्या अभ्यासासाठी घेण्यात आलेल्या चाचणीवरून राज्याच्या औद्योगिक संरचनेत संक्रमण झाल्याचे स्पष्ट होते.

**अनुमानः**

आर्थिक सुधारणापूर्व व सुधारणोत्तर कालखंडातील महाराष्ट्राच्या औद्योगिक संरचनेच्या तुलनात्मकदृष्टया अभ्यासावरून लक्षात येते की, सुधारणोत्तर कालखंडात राज्याच्या औद्योगिक क्षेत्राबरोबरच कृषी व सेवा या क्षेत्रामध्येही महत्वपूर्ण परिवर्तने झाली आहेत. चाचणीसाठी उपयोगात आणलेल्या प्रतिमानातील तांत्रिक प्रगती दर्शविणारा सहगुणक सांख्यिकीयदृष्टया महत्वपूर्ण दिसून आला. म्हणजेच औद्योगिक क्षेत्रातील संरचनात्मक संक्रमणास राज्याची झालेली तांत्रिक प्रगती कारणीभूत असून त्याबरोबरच, केंद्राच्या नविन औद्योगिक धोरणाच्या धर्तीवर आखलेले धोरण आणि त्यानंतरच्या विविध धोरणांच्या माध्यमातून सार्वजनिक क्षेत्राची मक्तेदारी कमी करून खाजगी क्षेत्राला प्रोत्साहन देण्याच्या भूमिकेबरोबरच विदेशी भांडवल, आजारी उद्योगांचे संरक्षण, नवनवीन उत्पादन तंत्राच्या वापरास प्रोत्साहन देण्यास प्राधान्य दिले गेल्याने राज्याच्या औद्योगिक संरचनेत संक्रमण झाल्याचे स्पष्ट होते.

**परिशिष्टः**

### १) महाराष्ट्राच्या वस्तूनिर्माण क्षेत्रातील प्रमुख घटकांची वार्षिक आकडेवारी

(कोटी रू., रोजगार = ०००)

| वर्ष | स्थिर भांडवल | मूल्यवृध्दी | उत्पादन | रोजगार |
|---|---|---|---|---|
| १९८०-८१ | ४७३८ | २९८१ | १४३५१ | ११९२१ |
| १९८१-८२ | ५८१६ | ३३१६ | १६९७० | १०९८५ |
| १९८२-८३ | ६५४३ | ३५७५ | १८९७२ | ११३६८ |
| १९८३-८४ | ७४८२ | ३७६२ | १९२३२ | ११११४ |
| १९८४-८५ | ८५०८ | ४३७३ | २२११४ | ११२८८ |
| १९८५-८६ | ९१५१ | ५३२० | २६५८२ | ११४१६ |
| १९८६-८७ | १०८१६ | ६२१८ | २९८८७ | ११३८० |
| १९८७-८८ | १२०७५ | ६२९८ | ३३०६८ | ११३४५ |
| १९८८-८९ | १४७५७ | ७९०४ | ३९२२४ | ११६१४ |
| १९८९-९० | १८९५१ | १००७७ | ५००२८ | ११६२७ |
| १९९०-९१ | २२२१८ | १२२५४ | ६११७५ | ११६८६ |
| १९९१-९२ | २५११४ | १३१४० | ६६२८५ | ११६४६ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १९९२-९३ | ३१७८७ | १५८२१ | ७९६९५ | १२१२१ |
| १९९३-९४ | ३९०५८ | १९३५५ | ९०६५९ | १२२५० |
| १९९४-९५ | ४३५७९ | २२५५४ | १०७२३७ | १२५९० |
| १९९५-९६ | ५६१३१ | २८८८० | १३६९६० | १२७८८ |
| १९९६-९७ | ६५१८४ | २९०१५ | १४३५६४ | १२९१२ |
| १९९७-९८ | ७५६९२ | ३४१६३ | १७१८३० | १२५१८ |
| १९९८-९९ | २९७० | ३३७३२ | १२१५३७ | १२३१५ |
| १९९९-०० | ७०६८६ | ३३९७५ | १८४३५४ | १२४४७ |

*(Source – Economic Survey of Maharashtra for Years)*

## २) महाराष्ट्राच्या वस्तूनिर्माण क्षेत्रातील प्रमुख घटकांची संकोच केलेली मूल्य

| वर्ष | निव्वळ मूल्यवृध्दी | रोजगार | निव्वळ स्थिर भांडवल | निव्वळ उत्पादन |
|---|---|---|---|---|
| १९८० -८१ | २९८१ | १०९८५ | ५८१८ | १६९७० |
| १९८२-८३ | ३२०३.६८४ | ११३६८ | ६३६४.७८५ | १८३३.४३ |
| १९८३-८४ | ३२५५.९२ | ११११९४ | ७०१२.१८३ | १७१५.४८ |
| १९८४-८५ | ३१२६.७०२ | ११२८८ | ७५८२.८८७ | १८८२०.५ |
| १९८५-८६ | ४२७६.५२७ | ११४१६ | ७५३७.८११ | २१३६८.२ |
| १९८६-८७ | ४८१२.६१३ | ११३८० | ८४१६.४६५ | २३१२२.४ |
| १९८७-८८ | ४५०७.५८१ | ११३४५ | ९१२६.९८४ | २३७७८.३ |
| १९८८-८९ | ५२१३.७२ | ११६१४ | ९७८५.८०९ | २५८७२.७ |
| १९८९-९० | ५९७६.८६८ | ११६२७ | ११४०२.५३ | २९६७२.६ |
| १९९०-९१ | ६७०३.५०१ | ११६८६ | १२३२९.६३ | ३३९०३.२ |
| १९९१-९२ | ६४६०.१७७ | ११६४६ | १२०९५.०६ | ३२५८८.५ |
| १९९२-९३ | ७०१२.८५४ | १२१२१ | १३७८४.४८ | ३५३२५.८ |
| १९९३-९४ | ७९५८.४७ | १२५२० | १६४१७.८२ | ३७२१२.४ |
| १९९४-९५ | ८३९६.८७२ | १२५९० | १६५८२.५७ | ३९१२४.४ |
| १९९५-९६ | ९८५३.२९२ | १२७८८ | १९८४८.३ | ४६७२८.१ |
| १९९६-९७ | ९५१३.११४ | १२९१२ | २२०९६.२७ | ४७०७०.२ |
| १९९७-९८ | १०७६० | १२५१८ | २५२८१.२३ | ५४१११.७ |
| १९९८-९९ | ९२५९.४१५ | १२३१५ | १९५१३.०४ | ४५६५७.४ |
| १९९९-०० | १०१८४.३५ | १२४४७ | २५५१२.३२ | ५५२६२ |

## ३) घाऊक किंमत निर्देशांक

| वर्ष | वस्तु निर्माण उत्पादने किंमत निर्देशांक | यत्रे व यत्रसामुग्री किंमत निर्दैशांक |
|---|---|---|
| १९८० -८१ | १०० | १०० |
| १९८२-८३ | १०३.५ | १०२.८ |
| १९८३-८४ | १०९.८ | १०३.७ |
| १९८४-८५ | ११७.५ | ११२.२ |

| | | |
|---|---|---|
| १९८५-८६ | १२४.४ | १२१.४ |
| १९८६-८७ | १२१.२ | १२७.३ |
| १९८७-८८ | १३८.५ | १३२.३ |
| १९८८-८९ | १५१.६ | १५०.८ |
| १९८९-९० | १६८.६ | १६६.२ |
| १९९०-९१ | १८२.८ | १८०.२ |
| १९९१.९२ | २०३.४ | २०८.३ |
| १९९२-९३ | २२५.६ | २३०.६ |
| १९९३-९४ | २४३ | २३७.१ |
| १९९४-९५ | २६८.६ | २६२.८ |
| १९९५-९६ | २९३.१ | १८२.८ |
| १९९६-९७ | ३०५ | २९५ |
| १९९७-९८ | ३१७.५ | २९९.४ |
| १९९८-९९ | ३३१.९ | ३०४.७ |
| १९९९-०० | ३३३.६ | २७६.२ |

*(Source - www.rbi.org.in (Accessed in March 2009))*

## संदर्भसूचिः


1) Sawade (1985). " Industrial Development of Maharashtra", Government of Maharashtra Publication, Mumbai
2) Gondawale (2005). "Impact of Economic Liberalisation on Industrial Structure and Performance: Indian Experience", Unpublished Ph.D. Thesis, University of Pune
3) Burange L.G. (2003). "Industry : Changing Structure, Composition and Slackening Growth, Economy of Maharashtra" (Ed.), Bhalchandra Mungekar, Dr. Ambedkar Institute of Social and Economic Change
4) Baratwal R.R. (1994). "Industrial Economics: An Introductory Text Book", Wiley Eastern Limited, New Delhi
5) Mungekar B. (2003), "Economy of Maharashtra, Changing Structure and Emerging Issues", Dr. Ambedkar Institute of Socio- Economic Change,Mumbai
6) Wishwanath Kumar (2004). "The Structural Changes in the Production Function for Indian Industries : A Comparative Study of Pre and Post Liberalisation Period", Indian Economic Journal
7) (2004). "The Structural Changes in the Production Function for Indian Industries : A Comparative Study of Pre and Post Liberalisation Period", Indian Economic Journal
8) Damodar N. Gujarathi (2004). "Basic Econometrics", Tata McGraw-Hill Publishing Company Ltd, New Delhi
9) Economic Survey of Maharashtra, Directorate of Economics and Statistics, Planning Department, Government of Maharashtra, Mumbai
10) WWW.rbi.org.in

# जागतिक मंदीचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम

**मुरलीधर पंडीत गायकवाड,** मुरुड जंजिरा

वसतराव नाईक कला व वाणिज्य महाविद्यालय, रायगड

गेल्या पंधरा वर्षात जगात आर्थिक मंदीच्या तीन लाटा येऊन गेल्या पहिल्या शाळेत आग्नेय आशियातील कोरिया, तैवान, थायलंड, मलेशिया, सिंगापूर, आदि आठ देश हादरले. मागोमाग ब्राझील व मेक्सिको यांचे दिवाळे वाजले ही लाट ओसरली तोपर्यंत पुन्हा मंदीचे दुसरे चक्र २१ व्या शतकाच्या सुरुवातीला सुरु झाले भारतालाही त्याची झळ सोसावी लागली गेल्या पाच ते सात वर्षात मात्र जगातील सर्वात बलाढ्य देश अमेरिका मंदीच्या चक्रात सापडला आहे. १९३० मध्ये अमेरिका व युरोपमध्ये जी महामंदीची लाट आली होती. तशीच लाट पुन्हा अमेरिकेमध्ये आली आहे. घरांच्या खरेदीसाठी बँकांनी बेसुमार कर्ज वाटप केले त्याची वसुली होईना म्हणून थकबाकीच्या ओझ्याखाली दबलेली लेहमन ही बलाढ्य बँक दिवाळ्यात निघाली मागोमाग हजारो बँका कोसळल्या. अमेरिकेत उलाढाल व्यवस्थाही थंडावली. आर्थिक वृद्धीचा वेग तर केवळ शुन्य ते १ टक्का इतका कमी झाला आहे. बेकारीचे प्रमाण सरासरी दहा टक्के आहे. न्युयॉर्ककडे ते दहा टक्के तर पश्चिम किनाऱ्यांवर आणि अन्य काही राज्यांमध्ये वीस ते तीस टक्कांपर्यंत आहे. अमेरिकन अर्थकारण आणखी काही वर्ष तरी सुधारणार नाही. अशी चिन्हे दिसत असतानांच युरोप मधील ग्रीस, पोर्तुगाल, स्पेन, इटली सह बारा देश जबरदस्त मंदीच्या चक्रात सापडले आहेत. यामुळे संबंध युरोपची अर्थव्यवस्था देखील अडचणीत आली आहे. अमेरिकन मंदीची लाट युरोपातही शिरली युरोप व अमेरिकेमध्ये यामुळे असंतोष पसरला आहे.

**अभ्यासाची उद्दिष्टे -**

१. जागतिक मंदीच्या कारणांचा अभ्यास करणे.

२. भारतीय अर्थव्यवस्थेतील परिणाम अभ्यासणे.

३. जागतिक मंदीत भारतीय अर्थव्यवस्थेने घ्यायाची दक्षता / उपाय सुचविणे.

**अभ्यास पद्धती:**

प्रस्तुत शोधनिबंध लिहिण्यासाठी प्रामुख्याने द्वितीय स्त्रोतांद्वारे माहिती व आकडेवारीचा आधार घेतला आहे. संदर्भग्रंथ, नियतकालिके, शोधनिबंध इत्यादी स्त्रोतांतून माहिती संकलित करण्यात आली आहे.

**घसरण (Recession) म्हणजे काय?**

घसरण म्हणजे अर्थव्यवहारांची अशी अवस्था की त्यात विस्तारापेक्षा संकोचकारक घटक जास्त प्रभावी ठरतात. या अवस्थेत प्रामुख्याने पुढील वैशिष्ट्ये दिसून येतात.

१. आशावादाची परिणती शंका, संशय, भीती, द्विधावस्था यात होते. २. अपेक्षाभंगास सुरुवात ३. बँकाच्या पतनिर्मितीचा संकोच ४. गुंतवणुकीत घट ५. उत्पादनाच्या मागणीत घट ६. जुन्या मागण्या (Old order) रद्द होणे. ७. व्यापार संकोच ८. रोखता प्राधान्यात वाढ ९. बेरोजगारी १०.निराशावादाचा उगम ११. भीतीचे वातावरण

थोडक्यात या अवस्थेत बेकारी, घटते उत्पन्न, घटती मागणी, उतरत्या किंमती, घटता नफा, या सर्व कारणांचा परिणाम होऊन अर्थव्यवस्था कोसळू लागते. व ती वेगाने अधोगामी होवून मंदीच्या टप्पात प्रवेश करते.

**जागतिक मंदीची कारणे:**

**जागतिक मंदीस पुढील कारणे कारणीभूत ठरली.**

१. दुय्यम कर्जाची कर्जे २. चुकीचा आशावाद ३.अनियंत्रित बँकींग पद्धती ४. जागतिकरण ५. बँका व वित्तीय संस्थाचे बेजबाबदार वित्तीय धोरण व धोका पत्करण्याचे साहस, ६. अर्थ व्यवस्थेतील संरचनात्मक असमतोल. ७.आभासी वित्तपुरवठा ८. रोखतेची कमतरता ९. परकीय भांडवल १०. चंगळवाद ११. निर्यातीत घट अशी अनेक कारणे या अरिष्टामागे आहेत असे अभ्यासक मानतात.

**मंदीचा इशारा -**

जगातील प्रमुख केंद्रीय बँक व्याजदर शुन्यावर आणून मंदीला आमंत्रण देत आहेत. त्यामुळे जागतिक पातळीवर खेळत्या पैशात वाढ होईल पुन्हा एकदा हा फुगा फुटेल आणि साऱ्या जगाला पुन्हा एकदा मंदीचा सामना करावा लागेल. असा इशारा रिझर्व्ह बँकेने दिला आहे.

**जगापुढचे आर्थिक संकट वाढतेय -**

गेल्या तीन वर्षामध्ये बाजारातील मुक्त अर्थव्यवस्था हीच साऱ्या जगाची अर्थव्यवस्था झाली त्यात एका बाजुस दरडोई उत्पन्न, उत्पादन, वाढत गेले आणि त्याचप्रमाणात भुकेल्या लोकांची संख्या आणि विषमता वाढली. मुक्त अर्थव्यवस्थेचे समर्थक असणाऱ्या मनमोहन सिंग यांनी संयुक्त राष्ट्र आमसभेपुढे बोलतांना या अर्थव्यवस्थेने निर्माण केलेल्या दु:स्थितीचे चित्र मांडले.

साऱ्या जगाची अर्थव्यवस्था आता धोक्यात आली आहे. अमेरिकेत २००८ मध्ये आलेली मंदी संपुष्टात येण्याची चिन्हे अजूनही दिसत नाहीत. उलट अमेरिकेसारखी मोठी अर्थव्यवस्था पुन्हा एकदा मंदीच्या चक्रात सापडण्याची शक्यता वाढत आहे. अमेरिकेपुढे पुन्हा एकदा मंदीचे संकट उभे राहीले तर जगाच्या अर्थव्यवस्थेला या संकटाचे परिणाम दीर्घकाळ जाणवत राहतील. अशी अवस्था असतांनाच जगाच्या अर्थव्यवस्थेवर प्रभाव असलेल्या युरोपीय देशातील अर्थव्यवस्था कोसळण्याच्या मार्गावर आहे.

युरोप अमेरिकेतल्या अर्थव्यवस्था धोक्यात असतांना जगातील विविध देशातील अर्थतज्ज्ञ जगापुढे आता भारत आणि चीन हे दोनच आशास्थाने आहेत असे म्हणत असतात परंतु या आशा स्थानापैकी भारताची अर्थव्यवस्था ही म्हणाव्या तितक्या आत्मविश्वासाने पुढे जातांना दिसत नाही. भारताच्या विकास वेगाचे उद्दिष्ट दर दोन महिन्यांनी बदलावे लागत आहे.

**भारतीय अर्थव्यवस्थेतील सकारात्मक परिणाम:**

**मंदीतही निर्यात व्यापाराला बहर:** अमेरिका, युरोपमध्ये आर्थिक मंदी असली तरी भारताने सप्टेंबर २०११ मध्ये निर्यातीत वार्षिक ३६.३ टक्के वाढ नोंदविली आहे. सप्टेंबर २०११ मध्ये २४.८ अब्ज डॉलरची निर्यात झाली आहे. याच बरोबर देशाची आयातही याच कालावधीत १७.२ टक्क्यांनी वधारली आहे. ३४.६ डॉलर अब्ज आयातीमुळे देशाच्या वित्तीय तुटीचे प्रमाण ९.८ अब्ज डॉलर झाले आहे. जुलै २०११ च्या तुलनेत ऑगस्टमध्ये देशातील निर्यातीत ४४.२ टक्क्यांनी घट नोंदविली होती. निर्यातीत भारताची मदार अमेरिका आणि युरोप या भागांवर सर्वाधिक म्हणजे सुमारे ३०% इतकी आहे. सध्या ही दोन्ही राष्ट्रे मंदीच्या सावटात असल्याने ऑगस्ट २०११ या महिन्यात देशाचा निर्यातीवर त्याचा परिणाम झाला होता. यंदा मात्र देशाबाहेर मंदीची, स्थिती असूनही सप्टेंबर २०११ मधील निर्यातीत वाढ लक्षणीय आहे. आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहामाहीत भारताची निर्यात ५२.१ टक्क्यांनी वधारुन ती १६० अब्ज डॉलर झाली आहे. यामध्ये अभियांत्रिकी (१०३ टक्के), तेलपदार्थ (५३टक्के), दागिने (२३ टक्के), तयार कपडे (३२ टक्के), मत्स्य पदार्थ, (४८ टक्के) आणि औषधे (३३ टक्के) या क्षेत्राची कामगिरी उल्लेखनिय ठरली आहे.

**बँकाची कामगिरी:**

सध्याच्या जागतिक वित्तीय अरिष्टाने भारताच्या आर्थिक नियामक यंत्रणेची बलस्थाने अधोरेखित केली आहेत. जगभरात सावळागोंधळ असतांनाच भारतीय बँकानी मात्र पतगुणवत्तेशी तडजोड न करता उमदा वृद्धीदर नोंदवण्याची कामगिरी चोख बजावली आहे.

**भारताची पत वाढणार:**

अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेची क्रेडीट रेटींग (पतनामांकन) एएए वरुन एएप्लस घसरल्यामुळे देशातील आर्थिक क्षेत्राचा फायदा होणार आहे. अमेरिकेची पत घसरल्यामुळे भारताची पत वाढणार आहे. अमेरिकेतील पैसा गुंतवणुकीबाबत विश्वास न राहिल्याने भारतातील विदेशी गुंतवणुक वाढण्याचा सर्वाधिक फायदा होणार आहे. चांगल्या परताव्याच्या आशेने विदेशी गुंतवणुकदार भारत आणि चीनकडे मोर्चा वळवतील असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. विदेशी गुंतवणुक वाढल्याने रुपया आणखी मजबुत होऊन तो डॉलरच्या तुलनेत अधिक उच्चस्तरावर राहिल. अमेरिकेची पत जाण्यामुळे देशाला दोन प्रमुख फायदे होतील एक भारतीय चलन मजबुत होईल, दुसरे भांडवलाची उणीव भासणार नाही.

**भारताला दिलासा:**

**ट्रिपल बी पतदर्जा तूर्त स्थीर:** भारताचा सध्याचा 'बीबीबी' पतदर्जा बदलण्याची गरज नाही. असा दिलासा स्टॅण्डर्ड अॅन्ड पूअर्सने **(Standard and poor's)** दिला आहे. स्टॅण्डर्ड

ॲन्ड पुअर्सचे विश्लेषक तकाहिरा ओगावा यांनी वृत्त संस्थेला सांगितले की भारताचे कर्जरोख्यांची पत 'बीबीबी' या पातळीवर कायम असून अमेरिकेचा कमी करण्यात आलेल्या पतमानांकनाचा यावर परिणाम होणार नाही या देशाचे पतधोरण कमकुवत आहे. मध्यम कालावधीत आर्थिक सुधारणा राबवण्यात या देशातील सरकार काहीसे अपयशी ठरत असले. तरी यामुळे भारताचे मानाकंन सध्या तरी कमी करण्याचा प्रश्न नाही. ट्रिपल बी मानांकातून नजीकच्या काळात अर्थव्यवस्थेला धोका नसला तरी जोखीम मात्र सुचित केली जाते.

**२.१५ लाख लोकांना रोजगार:** देशातील अर्थव्यवस्थेला महागाई आणि मंदीने ग्रासले असले तरी एप्रिल ते जुन या तिमाहीमध्ये देशातील नोकऱ्यांच्या संख्येमध्ये २.१५ लाखांची भर पडली आहे. केंद्र सरकारच्या कामगार मंत्रालयाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार या तिमाहीत आयटी आणि बीपीओ क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात रोजगारांच्या संधी निर्माण झाल्या त्याचबरोबरच धातू आणि वाहन क्षेत्रांमध्येही हजारो लोकांच्या हाताला काम मिळाले.

युरोपातील आर्थिक संकटाचा भारतावर प्रत्यक्ष परिणाम असणार नाही कारण भारताचे २०१० चे निर्यात आकडे पाहिले तर भारताची प्रमुख निर्यात उद्योन्मुख राष्ट्रांना (५२%) आहे. त्यात ही चीनचा वाटा मोठा आहे. त्यामुळे चीनला फटका बसला तरच तो नंतर भारतापर्यत येऊ शकेल, विकसित राष्ट्रांपैकी भारताची मुख्य निर्यात अमेरिकेला आहे. त्यामुळे इथेही भारताचा संबंध अप्रत्यक्षपणे येईल.

**नकारात्मक परिणाम:**

**विकास दराची घसरण:** भारताची अर्थव्यवस्था मंद गतीने सुरु असल्याने नुकत्याच जाहीर झालेल्या ढोबळ देशांतर्गत उत्पन्न दराच्या आकडेवारीवरुन स्पष्ट झाले चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत हा दर (जीडीपी) ७.७ टक्के राहिला आहे. वर्षभरापूर्वी हा दर ८.८ टक्के होता. निर्मिती क्षेत्रातील खराब कामगिरीमुळे यंदा हा दर कमी झाला आहे. यंदाच्या पहिल्या तिमाहीत निर्मिती क्षेत्राची वाढ ७.२ टक्के झाली आहे. एप्रिल ते जुन २०१० दरम्यान ही वाढ दुहेरी आकड्यात (१०.६) टक्के होती. देशाची खनिज कर्म क्षेत्राची वाढ तर आधीच्या ७.४ टक्क्यांवरुन एकदम १.८ टक्क्यांवर आली आहे. विमा आणि गृह या सेवा क्षेत्राची वाढ ही ९.८ टक्क्यांवरुन ९.१ टक्के झाली आहे.

भारताने एप्रिल -जुन २०११ या कालावधीत कृषीक्षेत्रात सकारात्त्मक वाढ नोंदविलेली आहे. वर्षापूर्वी ही वाढ २.४ टक्के होती. याच बरोबर देशातील व्यापार, आदरातिथ्य, वाहतुक आणि दळणवळण या क्षेत्रातही आधीच्या १२.१ टक्के वाढीला मागे टाकून १२.८ टक्के विकास वाढला आहे. एकूण चालू आर्थिक वर्षासाठी केंद्र सरकारने देशांतर्गत उत्पन्न दर ८.५ टक्के अभिप्रेत केला आहे. तर रिझर्व्ह बँकेने हा अंदाज आधीच्या ८.५ टक्क्यांवरुन ८ टक्क्यांपर्यत खाली आणला आहे. २०११-१२ या वर्षासाठी नियोजन आयोगालाही विकास दर ८ ते ८.३ टक्के अपेक्षित आहे. गेल्या वर्षातील पहिल्या तिमाहीच्या केंद्र सरकारचा अंदाजही ९.३ टक्के होता तो या वर्षात कमी म्हणजेच ८.८ टक्के

स्थिरावला आहे. जुलै-सप्टेंबर २०११ या तिमाहीत आर्थिक विकास दराच्या (जीडीपी), ६.९ टक्क्यावर झालेल्या घसरणीतून देशावर आथिक मंदीचे संकट दाटले असल्याचा स्पष्ट संकेत मिळतो.

**औद्योगिक उत्पादनात घट:**

सरकारी आकडेवारी प्रमाणे औद्योगिक उत्पादन वाढीचा दर जुलै २०११ मध्ये केवळ ३.८ टक्के असून त्यापूर्वीचा २१ महिन्यांमधील हा सर्वात कमी दर होता औद्योगिक उत्पादन वाढ मंदावली आहे हे निश्चित.

"मुडी" या पतमापन संस्थेने भारताच्या संबंध बॅकींग व्यवस्थेला लक्ष्य करतांना, मालमत्तेची गुणवत्ता, भांडवलीकरण आणि नफाक्षमता या आधाडीवर भारतीय बँकाचे भवितव्य धुसर असल्याचे संकेत दिले आहे. अर्थात भारतीय बॅकींग व्यवस्थेचा स्थिर वरुन धोकादायक असे मानांकन तिने घसरविले आहे.

अमेरिकेसह युरोपमधील जागतिक मंदीमुळे गेल्या काही महिन्यात नावाजलेल्या डझनभर कंपन्यांनी आपले कर्मचारी संख्याबळ कमी केले आहे. यामुळे जगभरातील जवळपास तीन लाख नोकऱ्यांवर गदा येत असतांनाच त्याचा अप्रत्यक्ष परिणाम भारतातील नोकऱ्यांवर ही येऊ घातला आहे.

**महागाई वाढली:**

अन्नधान्याच्या महागाईचा दर फेब्रुवारी २०११ मध्ये कमाल २० % होता. तो जून जुलै २०११ मध्ये ८% पर्यंत, दर २२ ऑक्टोबर २०११ मध्ये १२.२१ % झाला आहे. १२.२१% मुळे महागाई दर गेल्या ९ महिन्यातील उंच्चांकी पातळीवर राहिला आहे. यापुर्वी २९ जानेवारी २०११ च्या आठवडा अखेर हा दर १२.१४ % होता. एकुण महागाई दर हा डिसेंबर २०१० पासून ९ % च्या पुढे राहिला, सप्टेंबर २०११ मध्ये ९.५२ % होता. दुहेरी आकड्यानजीकच्या महागाईवर नियंत्रण मिळविण्यासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेने मार्च २०१० पासून आतापर्यंत १३ वेळा व्याजदरात वाढ केली आहे. नोव्हेंबर २०११ च्या पहिल्या आठवड्यात महागाईचा दर ११ टक्क्यांनी खाली आला. २९ ऑक्टोबरच्या ११.८१ टक्क्यांवरुन हा दर ५ नोव्हेंबर २०११ रोजी संपलेल्या आठवड्यात १०.६३ टक्के झाला आहे. अन्नधान्याच्या व्यतिरिक्त अन्य क्षेत्रातही महागाई वाढू लागली असून ती चिंतेची बाब आहे. जागतिक स्तरावर चलनांच्या मोठ्या फेरबदलांमुळे कच्चा तेलाच्या किंमती वाढण्याची शक्यता आहे. यात १० टक्कांपर्यंत वाढ होऊ शकते. भारत हा ७५% तेल आयात करणारा देश आहे. त्यामुळे या देशातही इंधनाच्या किंमती अधिक वाढू शकतात त्याचे दर यापुर्वीच वाढले आहेत. कच्च्या तेलाच्या वाढीमुळेच सरकारने त्याचा बोजा ग्राहकांवर टाकला आहे आणि एकुण महागाई दर वाढण्यास ते कारणीभूत ठरले आहे.

**मंदीपासून बचावासाठी १०० कोटीच्या विशेष पॅकेजची घोषणा:**

रिझर्व्ह बँकेकडून हस्त कारागीर, हातमाग, गालिचे, आणि लघू निर्यातदारांना व्याजापोटी दोन टक्क्यांची सबसिडी दिली जाण्या व्यतिरिक्त केंद्र सरकारने जागतिक मंदीसदृश्य वातावरणापासून निर्यातदारांचा बचाव करण्याच्या विशेष १०० कोटी रुपयांच्या पॅकेजची घोषणा केली आहे.

**जागतिक मंदीत भारतीय अर्थव्यवस्थेने घ्यावयाची दक्षता / उपाय:**

१. **खंबीर राजकीय नेतृत्व:** अमेरिकी अर्थव्यवस्थेचा विकास दर १.६ टक्के तर युरोपियन युनियनच्या अर्थ व्यवस्थेचा विकास दर केवळ १.७ टक्केच आहे. या पार्श्वभूमीवर आपल्या देशाचा आर्थिक विकास ८ टक्क्यांपेक्षा जास्त असणार आहे. याचा पुरेपुर फायदा उठविण्यासाठी खंबीर राजकीय नेतृत्वाची आज देशाला सर्वात मोठी गरज आहे.

२. भांडवलशाहीच्या सिद्धांतांची कोटेकोर अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

३. भारतीय भांडवल बाजाराचे वास्तव जाणून घेणे.

४. मंदीच्या कालावधीत टिकून राहण्यासाठी दिर्घकालीन गुंतवणूक आवश्यक आहे.

५. निखळ राष्ट्रहित आणि आर्थिक स्वार्थ यांची योग्य सांगड असणे गरजेचे आहे.

६. आर्थिक शिस्तीचे पालन आवश्यक आहे.

७. भविष्य काळात सामाजिक बाजूवर होणाऱ्या परिणामांकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही.

८. जागतिक स्पर्धा आणि जागतिक समन्वय या परस्पर विरोधी गोष्टी एकत्र आणाव्या लागतील.

९. मंदीच्या काळात भारतीय अर्थव्यवस्थेवर विश्वास ढळता कामा नये.

१०. देशपातळीवर प्रयत्नाबरोबरच जागतिक पातळीवरही मंदी दूर करण्याचे प्रयत्न होणे गरजेचे आहे.

११. सर्व समावेशक विकासाची प्रक्रिया गतिमान करण्यात यावी.

१२. भारताने शेती, ग्रामीण उद्योग, तसेच कारखानदारी या बाबींकडे जास्त लक्ष दिले पाहिजे.

**समारोप:**

संयुक्त राष्ट्राने ''जागतिक आर्थिक स्थिती आणि शक्यता'' या अहवालानुसार जगभर पुन्हा एकदा मंदीचे वारे वाहणार आहेत. नववर्ष २०१२ मंदीचेच असून याचा जबर फटका भारत आणि चीन सारख्या आगामी महासत्तांनाही बसेल, असा इशारा युनो ने दिला आहे.

जागतिक अर्थव्यवस्थेतील धोका कायम आहे. तेव्हा संकट दूर करण्यासाठी सर्वांनी एकीने काम करणे आवश्यक आहे. आपण सर्व भारतीयांनी मंदीवर मात करण्यात अग्रेसर राहण्याचा चंग बांधायला हवा अन् सुज्ञान नेतृत्वाच्या हाकेला आपआपली भुमिका व्यवस्थित पार पाडून प्रतिसाद द्यायला हवा. विकसित देशांना सांगू या की, काल तुमचा होता, आज आपला आहे, नि उद्या आमचा असेल.

**संदर्भ:**


१. वर्तमानपत्रे

१. दैनिक सागर(रायगड)दि. २२ ऑक्टोबर २००१ पान क्र. ४

२. दैनिक महाराष्ट्र टाईम्स्, मुंबई, २० ऑक्टोबर २०११.

३. दैनिक लोकसत्ता मुंबई १८ सप्टेंबर २०११ पान क्र.८

४. दैनिक लोकसत्ता, मुंबई अर्थवृत्तांत दि. १४ नोव्हेंबर २०११ पान क्र. ८

५. दैनिक प्रहार अर्थजगत, १८ नोव्हेंबर २०११ पान क्र. ९

६. दैनिक प्रहार शनिवार २ डिसेंबर २०११.

२. अर्थसंवाद एप्रिल-जुन २०१० खंड ३४ अंक १

३. डॉ. विनायक देशपांडे, *जागतिक वित्तीय संकट, सैद्धांतिक आणि व्यावहारिक दृष्टिकोन*, अध्यक्षीय भाषण, मराठी अर्थशास्त्र परिषद, ३३ वे राष्ट्रीय अधिवेशन बारामती-२०१०

४. *National Seminor on world Recession in the context of Indain Economy*, Held at KMC college, Khopoli, (Raigad)

५. डॉ. ओ. पी. शर्मा २०१०, भारतीय अर्थव्यवस्था ज्वलंत मुद्दे और व्यूहरचना, पोइन्टर पाब्लिशर्स जयपूर, ३०२००३ (राज.)

६. विकल्प वेध - १६ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर २०११.

- * -

# बुलढाणा जिल्ह्यातील राज्यशासन पुरस्कृत विविध योजनांचे विश्लेषण

**जे. डी. सांगोडे, अमरावती**
मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालय

आपल्या देशात अजुनही २०% लोक दारिद्र्य रेषेखाली जीवन जगत आहे. तसेच जवळ-जवळ १४% लोक सर्वस्वी निराधार आहेत. असे समजले जाते, अशा लोकांच्या सामाजिक सुरक्षिततेसाठी कार्य करणे ही राज्याची जबाबदारी असते. म्हातारपणामुळे किंवा एखाद्या गंभीर स्वरूपाच्या शारीरिक विकलांगतेमुळे किंवा एखाद्या दुर्धर रोगामुळे जे लोक अगतिक बनले आहेत. अशा लोकांना मदतीचा आधार देणे गरजेचे आहे. काही विधवा स्त्रिया निराधार तर असतातच शिवाय ज्यांच्या मुलांचेही पालन पोषण करावे लागते. अशांना सुद्धा आर्थिक मदतीची गरज असते. तसेच समाजात अन्य विविध सामाजिक कारणाने स्त्रियांची दडपशाही आणि पिळवणूक होत असते. त्यांचेकडे समाज वेगळ्या दृष्टीने पाहतो अशा कमजोर स्त्रियांना आर्थिक आधार देणे राज्यांची नैतिक जबाबदारी असते.

निराधार उपेक्षित पडलेली किंवा टाकून दिलेली लहान मुले किंवा किशोर अपराध्यांच्या बाबतीत १६ वर्षाखालील मुले किंवा १८ वर्षाखालील मुली यांच्या पालन पोषणाची सोय विविध सरकारी संस्थांतून केली जाते. त्यांच्यासाठी अशी सोय ही एक तर सन १९८८ मध्ये मुंबईच्या मुलांबाबत अधिनियमच्या कायद्यांच्या तरतुदीनुसार केली जाते, किंवा सरकारच्या तरतुदीनुसार केली जाते किंवा सरकारच्या अथवा स्वयंसेवी संस्थेच्या सामाजिक कल्याणाच्या कायद्याच्या तरतुदीनुसार केली जाते, राज्यातील निराधार व्यक्तींना आणि दरिद्र्य रेषेखालील कुटुंबांना सामाजिक सुरक्षिततेच्या भावनेतून काही आर्थिक मदत दिली जावी म्हणून विशेष सहाय्य योजना शासनाने सुरू केल्या आहेत. अर्थसहाय्याच्या या योजनेमधून बहुसंख्य लाभार्थ्यांना लाभ मिळावा हा शासनाचा हेतू आहे.

राज्य शासनाने सन १९८० साली निराधार वृद्ध व्यक्ती शारीरिक व मानसिकदृष्ट्या निराधार अपंग व्यक्ती आणि स्वत:च्या १८ वर्षाखालील मुलांच्या संगोपनाची जबाबदारी असलेल्या निराधार विधवा स्त्रिया यांना विहित पात्रता सिद्ध झाल्यास आर्थिक सहाय्य देण्यासाठी संजय गांधी निराधार अनुदान योजना सुरू केली. या योजनेखाली ६० वर्षावरील निराधार स्त्रिया व ६५ वर्षावरील निराधार

पुरूष तसेच शारीरिक व मानसिकदृष्ट्या अपंग असणाऱ्या निराधार व्यक्ती असाध्य रोगाने जर्जर झालेल्या दुर्बल ज्यांना स्वत:चे चरितार्थ चालविणे अशक्य असते. अशा व्यक्तीकडे उत्पन्नाचे साधन नाही ज्यांना कोणाचाही आर्थिक आधार नाही किंवा उत्पन्न देणारी मालमत्ता नाही अशा व्यक्तींना या योजनेंतर्गत दरमहा अर्थसहाय्य देण्यात येते. १८ वर्षाखालील एकापेक्षा अधिक अपत्ये असलेल्या मुलांच्या संगोपनाची जबाबदारी असलेल्या निराधार महिला तसेच ज्या व्यक्तींना काम करून स्वत:चा उदरनिर्वाह करणे शक्य नसेल अशा अंध, शारिरीक अपंग, पक्षाघात, प्रमस्तिष्काघात, महारोग, क्षयरोग, कर्करोग यासारख्या मानसिक व शारिरीक विकलांग व्यक्तींनाही या योजनेअंतर्गत अनुदान देण्यात येते.

संजय गांधी स्वावलंबन योजना ही २ ऑक्टोबर १९८० पासुन सुरू करण्यात आली. राज्यातील रोजगार हमी योजनेअंतर्गत तसेच रोजगार कार्यालयात नावाची नोंद केलेल्या बेरोजगार व्यक्तींना सुतारकाम, लोहारकाम, चर्मकाम, कुंभारकाम, टोपल्या विणणे, दोर वाळविणे, इ. पिढीजात धंदा करण्यासाठी त्याचप्रमाणे भाजी, फळे यांची विक्री, चहाचे दुकान, सायकल स्टोव्ह दुरूस्ती इ. छोटे उद्योगधंदे करण्यासाठी विनातारण बिनव्याजी कर्ज देण्याचे संजय गांधी स्वावलंबन योजनेअंतर्गत तरतुद करण्यात आली आहे.

सन १९९१ साली शासनाने इंदिरा गांधी भुमिहिन वृद्ध शेतमजुर सहाय्य योजना सुरू केली या योजनेअंतर्गत राज्याच्या ग्रामिण भागामध्ये शेतमजुरी करून वास्तव्य करीत असलेल्या परंतु वृद्धापकाळामुळे शेतमजुरी करणे अशक्य झालेल्या वृद्ध शेतमजुरांना या योजनेअंतर्गत दरमहा रू. १००/- प्रमाणे अनुदान देण्याची तरतूद केली आहे. त्यामध्ये आणखी वाढ करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत सध्या रू. ४५०/- दरमहा अर्थसहाय्य दिले जाते. या योजनेचा लाभ घेण्यासाठी तहसिलदार कार्यालयाची मदत घ्यावी लागते.

श्रावणबाळ सेवा योजनेअंतर्गत ६५ वर्षावरील निराधार स्त्री-पुरूष यांना दरमहा रू. १७५/- इतके अर्थसहाय्य दिले जाते. यात लाभार्थ्यास राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्ती वेतन योजनेअंतर्गत केन्द्र शासनाच्या हिश्श्याची रू. ७५/- इतकी रक्कम दिली जाते. अशा तऱ्हेने या योजनेतून लाभार्थ्यास दरमहा रू. २५०/- इतके अर्थसहाय्य मिळते. या योजनेचा लाभ तहसिलदार कार्यालयाशी संपर्क साधून घेता येतो.

वर नमूद केलेल्या तीन योजना राज्य शासन पुरस्कृत व अर्थसहाय्यक योजनांपैकी संजय गांधी स्वावलंबन योजना वगळता संजय गांधी निराधार योजना आणि इंदिरा गांधी वृद्ध भूमिहीन शेतमजुर सहाय्य योजना यांच्या लाभार्थींची वर्गवारी व्यवस्थीत करता यावी आणि केन्द्र पुरस्कृत राष्ट्रीय

वृद्धापकाळ निवृत्तीवेतन योजनेशी सांगड घालण्यासाठी शासनाने जुलै २००० रोजी या योजनांमध्ये बदल घडवून आणले. तद्नंतर या तीन योजनांचे स्वरूप निश्चित करणे व योजनेअंतर्गत देण्यात येणाऱ्या अनुदान वाटपाच्या कार्यपद्धतीत बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. शासनाने राज्य पुरस्कृत वरील दोन सहाय्य योजनांच्या नावात बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. तसेच यापूर्वी लाभार्थींना देण्यात येणारे अर्थसहाय्य बँकेमार्फत वितरित करण्याचा निर्णय घेतला होता. त्या निर्णयात बदल करून लाभार्थीला त्याच्या इच्छेनुसार बँकेमार्फत किंवा पोस्टाद्वारे अनुदान घेता येते.

**तक्ता क्र.१**

**वित्तीय वर्षे २००८-०९ मध्ये बुलडाणा जिल्ह्यात विविध योजनांना प्राप्त अनुदान**

| अ. क्र. | तहसिल | संजय गांधी निराधार योजना | | इंदिरा गांधी निराधार भुमीहीन शेतमजुर महीला योजना | | श्रावणबाळ सेवा योजना | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्राप्त अनुदान | एकुण लाभार्थी संख्या | प्राप्त अनुदान | एकुण लाभार्थी संख्या | प्राप्त अनुदान | एकुण लाभार्थी संख्या |
| १ | बुलडाणा | २२,७०,००० | १,२९९ | ५,००,००० | ३६८ | ४६,८४,७०० | ४६५५ |
| २ | चिखली | २०,०५,००० | १,०३४ | ६,२०,००० | १,२८५ | ३५,९६,३०० | ३५०५ |
| ३ | दे. राजा | १२,००,००० | ५५७ | ५,८०,००० | ५४५ | १९,४१,३०० | २२४० |
| ४ | मेहकर | १८,५०,००० | १५३५ | ८,४०,००० | १,००६ | ७०,८५,४२५ | ५८६९ |
| ५ | लोणार | १२,३०,००० | ९८३ | ४,८०,००० | १,१३० | ५०,५९,३६३ | ४७९९ |
| ६ | सि. राजा | १६,००,००० | ७०८ | ३,५०,००० | १७५ | ३०,४६,१५० | ३४९१ |
| ७ | मलकापुर | १६,३०,००० | १,००९ | ४,००,००० | २२४ | २६,६०,५०० | २१२८ |
| ८ | नांदूरा | १०,००,००० | ४२६ | ४,२०,००० | ९५ | १२,३१,५५० | १३२१ |
| ९ | मोताळा | २०,००,००० | ४८० | १,३०,००० | २९ | १५,२०,८०० | १३२१ |
| १० | खामगांव | १२,३०,००० | ९३२ | ४,००,००० | ४४९ | ४८,७८,२५० | ५०३४ |
| ११ | शेगांव | १२,००,००० | ५७६ | ४,८०,००० | ८९५ | ३०,०२,४०० | २१६७ |
| १२ | जळगांव जा. | १०,००,००० | ३६३ | ३,००,००० | ३० | १४,११,८५० | १५१० |
| १३ | संग्रामपुर | १२,१५,००० | ५२५ | ४,७०,००० | ४४६ | ३०,०९,४१२ | २७८१ |
| | एकूण | १,९४,३०,००० | १०,४२७ | ५४,९०,००० | ६,६७७ | ४,३१,३६,००० | ४१,६२२ |

*( स्रोत - अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय बुलडाणा, २००९)*

तक्ता क्र.१ वरून असे दिसून येते की बुलडाणा जिल्ह्यातील १३ तहसिलमध्ये संजय गांधी निराधार योजनेसाठी प्राप्त अनुदान १,९४,३०,००० असुन एकूण लाभार्थी संख्या १०,४२७ आहे. म्हणजेच प्रती लाभार्थी अनुदान जिल्ह्यामध्ये २००८-२००९ या वित्तीय वर्षात १८६३ रू. प्रती व्यक्ती एकूण वर्षभरात प्राप्त झाल्याचे दिसून येते.

इंदिरा गांधी भूमिहीन शेतमजूर महिला योजनेमध्ये २००८-२००९ या वर्षामध्ये एकूण १३ बुलडाणा जिल्ह्यातील तहसिलामध्ये एकूण खर्च रू. ५४,९०,००० झाला व एकूण लाभार्थी संख्या ६६७७ इतकी असून प्रति लाभार्थी २००८-२००९ या वर्षात रु. ८२२ इतके देण्यात आले.

श्रावण बाळ सेवा योजना सुद्धा बुलडाणा जिल्ह्यात राबविण्यात आली या योजनेमध्ये २००८-२००९ या वित्तीय वर्षात एकूण अनुदान वाटप रु.४,३१,३६,००० इतके वाटण्यात आले असुन एकूण लाभार्थी संख्या ४१६२२ इतकी आहे. म्हणजे २००८-२००९ या वर्षात प्रतिव्यक्तीला श्रावण बाळ सेवा योजने अंतर्गत रू. १०३६ इतके प्राप्त झाल्याचे दिसून येते. याचाच अर्थ असा दिसून येतो की या तीन योजनासाठी वाटण्यात येणारे अनुदान फारच कमी, २००८-०९ या वित्तीय वर्षात दिल्याचे दिसून येते.

**शोध निबंधाचा उद्देश (Objective of Research):**

केंद्र व राज्य शासन नागरिकांच्या विकासासाठी अनेक योजना राबवित असते दरवर्षी अर्थसंकल्पात या योजनांवर कोट्यवधी रूपये खर्ची पडतात. परंतू दुर्दैवाने त्यांचा लाभ नागरिकांना होत नाही. शासन केवळ योजना जाहीर करते. परंतू त्या नागरिकांपर्यंत पोहचण्याची यंत्रणाच मुळात लाल फितीची आल्याने अनेक योजना केवळ कागदावरच राहतात आणि विकासाचा अनुशेष निर्माण होतो. शासनाच्या या योजना नागरिकांपर्यंत पोहोचण्यात व त्यांचा लाभ सामान्य लोकांना प्राप्त व्हावा हा या संशोधनाचा मुळ उद्देश आहे.

**प्रस्तुत शोध निबंधाचा उद्देश:**

१. बुलडाणा जिल्ह्यातील आर्थिक व सामाजिक स्थितीचे अध्ययन होईल.
२. बुलडाणा जिल्ह्यातील राज्यशासन पुरस्कृत संजय गांधी, इंदिरा गांधी व श्रावण बाळ सेवा योजनांचा सखोल अभ्यास होईल.
३. लाभार्थीची निवड योग्य झाली किंवा नाही हे शोधता येईल.
४. लाभाच्या वितरणातील उणिवा शोधणे.
५. शासनाकडून प्राप्त रक्कम व निवडीची प्रक्रिया यात सुधारणा सुचविणे.
६. अनुदान प्राप्त लाभाच्या जीवनमानात झालेल्या सुधारणांचा आढावा घेणे.
७. योजनेतील अंमलबजावणीतील दोषांची चर्चा करणे.
८. लाभार्थींना प्राप्त होणारे अनुदान पुरेसे आहे काय? त्यांचा अभ्यास करणे.
९. उद्देशावर आधारीत निष्कर्ष व सुचना तसेच शिफारसी सादर करणे.

**निष्कर्ष :**

केन्द्र व राज्य शासन नागरिकांच्या विकासासाठी अनेक योजना राबवित असते. दरवर्षी अर्थसंकल्पात अनेक योजना राबवित असते. दरवर्षी अर्थसंकल्पात अनेक योजनांवर कोट्यावधी रूपये खर्ची पडतात. परंतु दुर्दैवाने त्यांचा लाभ सामान्य नागरिकांना व दारिद्र्य रेषेखालील लोकांना झाला पाहिजे त्या प्रमाणात होतांना दिसुन येत नाही. शासन केवळ योजना जाहीर करते परंतू त्या नागरिकांपर्यंत पोहचविणारी यंत्रणा मुळात लालफितीची असल्यामुळे अनेक योजना केवळ कागदावरच राहतात आणि त्यामुळे विकासात अनुशेष निर्माण होतो. तेव्हा शासनाच्या लोककल्याणकारी योजना ह्या संजय गांधी, इंदिरा गांधी व श्रावण बाळ सेवा योजना नागरिकापर्यंत पोहचाव्यात व बुलडाणा जिल्ह्याच्या विकासात हातभार लागावा. सर्वसामान्य जनतेला योजनांची माहिती व्हावी व त्याद्वारे त्यांचा विकास साधला जावा तसेच राष्ट्रीय स्तरावर, जिल्हा स्तरावरील या संशोधनामुळे नवी दिशा मिळेल तसेच नवीन संशोधन कार्याला सुद्धा नवी दिशा मिळेल अशी अपेक्षा आहे. तसेच आर्थिक व सामाजिक बदल या कल्याणकारी योजनामुळे घडून येवून जिल्ह्यांच्या आर्थिक विकासावर होणारा परिणाम व त्यांचे विश्लेषण केल्यास सामाजिक न्यायासह आर्थिक विकास ही महत्वाकांशी अभिलाषा या संशोधनामुळे पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे.

**संदर्भ ग्रंथः**


१) श्रम अर्थशास्त्र, प्राचार्य डॉ. बोधनकर सुधीर, साईनाथ प्रकाशन नागपूर - १०, प्रथमावृत्ती २००८

२) *Post Economic Rerforms Scenario of Indian Economy*, Dr. Jahagirdar, Dr.Sushama Deshmukh, center of Economic and social studies, Amravati, 2003

३) *वित्तीय संस्था आणि वित्तीय बाजार*, देशपांडे विनायक, देशपांडे श्रीधर, हिमालया पब्लिशिंग हाऊस, नागपूर, २९.०८.२००४

४) *अर्थशास्त्रीय संकल्पना*, प्रा. देशमुख राम, विद्या प्रकाशन, नागपुर, २००४

५) *भारतीय नियोजनाची पन्नास वर्षे*, डॉ. कानेटकर मेधा, श्री साई प्रकाशन, नागपूर, फेब्रुवारी २००७

६) भारतीय अर्थव्यवस्था, डॉ. शास्त्री सुधाकर, विश्व पब्लिकेशर्स ॲण्ड डिस्ट्रीब्युटर्स, नागपूर, २०००

७) *महाराष्ट्राची आर्थिक पाहणी*, भोसले द.रा.

८) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन बुलडाणा जिल्हा, (२००१-२००२ ते २००८-२००९).


- * -

पीएच्.डी. प्रबंधाचा सारांश

# महाराष्ट्र राज्यातील ठाणे जिल्ह्यातील आदिवासींचा आर्थिक - सामाजिक अभ्यास

**जयंवत शंकरराव इंगळे**, सातारा
व्यावसायिक अर्थशास्त्र विभाग प्रमुख
शरदचंद्र पवार महाविद्यालय, लोणंद

**प्रास्ताविक:**

'आदिवासी' या मराठी शब्दास इंग्रजीत "Aborigingal" आणि "Aborigines" हे शब्द आहेत. 'आदि' म्हणजे 'मूळचे' आणि 'वासी' म्हणजे 'निवासी' होय. भारतीय राज्यघटनेत आदिवासींचा उल्लेख 'अनुसूचित जमाती' असा केला आहे. सर्वसाधारणपणे एकाकी, डोंगरावर व जंगलात राहणारे आणि ज्यांना आधुनिक संस्कृती व जीवन पद्धतीचा जवळ जवळ परिचय होऊ शकला नाही त्यांना आदिवासी म्हणावे असे भारतीय राज्यघटनेत स्पष्ट केले आहे. भारतात ४२५ तर महाराष्ट्रात ४७ अनुसूचित जमाती आहेत. सन २००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील आदिवासींची लोकसंख्या ८५.५७ लक्ष असून राज्याच्या एकूण ९.६८ कोटी लोकसंख्येशी तिचे प्रमाण ८.८५ टक्के आहे.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत संशोधन हे प्राथमिक आणि दुय्यम साधन सामग्रीवर आधारित आहे. ठाणे जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यात एकूण १९२ गावे आणि पाडे असून त्यापैकी सरासरी ९०.०० टक्केपेक्षा जास्त आदिवासी लोकसंख्या असलेल्या ३७ (१९.२७ टक्के) गावे व पाड्यांची निवड करून घरोघरी जाऊन तेथील आदिवासींच्या मुलाखती घेतल्या. त्यांना प्रश्न विचारून त्यांनी दिलेली उत्तरे स्वतः मुलाखत पत्रकात भरून घेतली. तसेच काही दिवस आदिवासींमध्ये वास्तव्य करून 'सहभागी निरीक्षण' या पद्धतीचाही संशोधनासाठी अवलंब केला. मोखाडा तालुक्यात एकूण सात आदिवासी जमाती असून आदिवासी कुटुंबाची संख्या १३७०३ इतकी आहे. यापैकी प्रत्येक जमातीतील ६० याप्रमाणे ४२० कुटुंबांची निवड केली.

**गृहितके :**

१) आदिवासीमध्ये अनेक अंधश्रद्धा असून भुताटकी, जादूटोणा, मंत्रतंत्र, करणी इत्यादींवर त्यांचा विश्वास आहे.

२) आदिवासी भगतांची उपचार पद्धती प्रभावी आहे.

३) बहुसंख्य आदिवासींना पोटापाण्यासाठी दरवर्षी स्थलांतर करावे लागते.

४) आदिवासीमध्ये निरक्षरतेचे प्रमाण बरेच आहे.

५) आदिवासीमधे दारिद्र्याचे प्रमाण बरेच आहे.

६) बहुसंख्य आदिवासींच्या राहणीमानाचा दर्जा निकृष्ट आहे.

**विषय निवडीमागची पार्श्वभूमी:**

अर्थशास्त्र विषयातील पीएच.डी. या पदवीसाठी शिवाजी विद्यापीठास *'महाराष्ट्रातील ठाणे जिल्ह्यातील आदिवासींचा आर्थिक आणि सामाजिक अभ्यास'* या शीर्षकाचा प्रबंध सादर करण्यामागे असणारी कारणे किंवा विषय निवडीमागची पार्श्वभूमी स्पष्ट करणे आवश्यक आहे. नोकरीच्या निमित्ताने आदिवासी भागात काही वर्षे वास्तव्य करण्याची संधी प्रस्तुत अभ्यासकाला मिळाली. नोकरीच्या काळात आदिवासींचे आर्थिक आणि सामाजिक जीवन जवळून पाहता आले. दारिद्र्य, कर्जबाजारीपणा, बेरोजगारी, वेठबिगारी, व्यसनाधिनता, अंधश्रद्धा इ. विविध समस्यांना आदिवासींना तोंड द्यावे लागत असल्याचे आढळले. या समस्या सरकार, सेवाभावी संस्था यांच्या पर्यंत पोहचविता याव्यात यासाठी पीएच.डी. पदवीसाठी हा विषय निवडला.

**संशोधन विषयाची उद्दिष्ट्ये:**

१) आदिवासींच्या आर्थिक स्थितीचा आणि समस्यांचा अभ्यास करणे.

२) आदिवासींच्या सामाजिक स्थितीचा आणि समस्यांचा अभ्यास करणे.

३) आदिवासींसाठी असणाऱ्या शासकीय सवलतींचा आढावा घेणे.

४) आदिवासींच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी उपाय सुचविणे.

**प्रकरणांची रूपरेषा:**

या संशोधन विषयाची एकूण आठ प्रकरणे आहेत. यामध्ये

१.विषयाची तोंडओळख आणि संशोधन पद्धती

२.ठाणे जिल्ह्याची आर्थिक आणि सामाजिक माहिती

३.भारत, महाराष्ट्र आणि ठाणे जिल्ह्यातील आदिवासी

४.आदिवासींच्या विकासासाठी शासनाचे प्रयत्न

५.आदिवासींची सामाजिक स्थिती

६ : आदिवासींची आर्थिक स्थिती

७ : आदिवासींची समस्या

८ : निष्कर्ष आणि शिफारसी :

**निष्कर्ष:**

१) सर्वेक्षित ४२० आदिवासी कुटुंबातील एकूण २३२५ व्यक्तीमध्ये पुरूषांचे प्रमाण ५२.४४ टक्के आहे. तर स्त्रियांचे प्रमाण ४७.५६ टक्के आहे. आदिवासी कुटुंबाचा सरासरी आकार ५.५३ इतका आहे. सर्वेक्षित ४२० कुटुंबामध्ये एकत्र कुटुंबाचे प्रमाण ४९.०४ टक्के आहे. तर स्वतंत्र कुटुंबांचे

प्रमाण ५०.९६ टक्के आहे. लहान आकाराच्या कुटुंबांचे प्रमाण ३५.७२ टक्के आहे. तर मोठ्या आकाराच्या कुटुंबांचे प्रमाण ६४.२८ टक्के इतके आहे. सर्वेक्षित ४२० कुटुंबामध्ये मिळविल्या व्यक्तींचे प्रमाण ५३.९७ टक्के आहे. तर अवलंबित व्यक्तींचे प्रमाण ४६.०३ टक्के आहे. एकूण ४२० कुटुंबामध्ये कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया केलेल्या व्यक्तींचे प्रमाण ३२.५८ टक्के आहे. तर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया न केलेल्या व्यक्तींचे प्रमाण ६७.४२ टक्के आहे.

२) सर्वेक्षण केलेल्या विविध सात आदिवासी जमातीतील ४२० कुटुंबांतील २३२५ व्यक्तींपैकी ० ते ६ वयोगटातील ४५९ बालके वगळून उर्वरित १८६६ व्यक्तींमध्ये निरक्षर स्त्री-पुरूषांचे प्रमाण ५३.०० टक्के एवढे मोठे आहे.

३) सर्वेक्षित ४२० आदिवासी कुटुंबातील ८६ मुले-मुली शाळेत जात नाहीत. त्यास आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक आणि कौटुंबिक कारणे जबाबदार आहेत. यामध्ये गरीबीमुळे किंवा आर्थिक कारणामुळे शाळेत न जाणाऱ्यांचे प्रमाण ५०.०० टक्के आहे. सामाजिक कारणांमुळे शाळेत न जाणाऱ्यांचे प्रमाण ३८.३८ टक्के आहे.

४) सर्वेक्षित ४२० आदिवासी कुटुंबातील शिक्षण अर्ध्यावर सोडलेल्या मुला-मुलींची संख्या २४८ इतकी आहे. यामध्ये सामाजिक घटकामुळे शिक्षण सोडलेल्यांचे प्रमाण ३५.४८ टक्के आहे. तर गरीबी किंवा दारिद्र्यामुळे शिक्षण सोडलेल्यांचे प्रमाण ३३.४६ टक्के आहे.

५) सर्वेक्षित ४२० कुटुंबांतील मृत व्यक्तींची एकूण संख्या १४७ इतकी असून यामध्ये ० ते ६ या वयोगटातील बालकांच्या मृत्यूचे प्रमाण सर्वात जास्त आहे (५२.२८ टक्के). माता अशक्त असणे, अपुऱ्या दिवसात बाळंतपण, भगताने केलेले चुकीचे व अयोग्य उपचार, शेतीतील कामाच्या व्यापामुळे आजारी बालकांकडे झालेले दुर्लक्ष ही बालमृत्यूची कारणे आहेत.

६) काही आदिवासी दूषित पाणी, अस्वच्छता यामुळे आजार उद्‌भवतात असे मानत नाहीत. भूत-पिशाच्च, करणी, जादूटोणा इ. मुळे मनुष्य आजारी पडतो असे त्यांना वाटते. आजार उद्‌भवल्यानंतर आदिवासी दवाखान्यात व भगताकडेही जातात. परंतु आदिवासींचा डॉक्टरांपेक्षा भगतावर जास्त विश्वास आहे. पोटदुखी, ताप, कावीळ, सर्पदंश इ. विविध आजारांवर भगत झाडपाला, वेलींचे खोड, विविध वनस्पतींच्या मूळ्या इ. वनस्पती देऊन उपचार करतात. तसेच अंगारा, मंत्रतंत्र यानेही उपचार करतात.

७) सरकारी आरोग्य यंत्रणेविषयी आदिवासींचा अनुभव फारसा चांगला नाही. दवाखान्यातील काही कर्मचारी चांगली वागणूक देत नाहीत. दवाखान्यामध्ये काही वेळा डॉक्टर हजर नसतात. दवाखान्यातील कर्मचारी खाजगी दुकानातून काही औषधे विकत आणावयास सांगता. अशा सरकारी दवाखान्याविषयी आदिवासींच्या तक्रारी आहेत.

८) आदिवासी समाजातील स्त्रियांना बरेच आर्थिक अधिकार आहेत. मिळविलेले उत्पन्न खर्च करण्याचा त्यांना अधिकार आहे. बाजारहाट करणे, जंगली उत्पादनांची विक्री करणे, दूध विकणे इ. कामे आदिवासी स्त्रिया करतात.

९) शेती आणि मजुरी हे आदिवासींचे प्रमुख दोन व्यवसाय आहेत. मजुरी करणाऱ्या कुटुंब प्रमुखांचे

प्रमाण ४५.७२ टक्के एवढे आहे. तरी शेती आणि मजुरी करणाऱ्या कुटुंब प्रमुखांचे प्रमाण ४४.७६ टक्के आहे. केवळ शेती करणाऱ्या कुटुंब प्रमुखांचे प्रमाण ७.६२ टक्के आहे.

१०) सर्वेक्षित ४२० कुटुंबांमध्ये स्वत:च्या मालकीची शेतजमीन असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण ५२.१४ टक्के एवढे आहे. तर भूमिहीन कुटुंबांचे प्रमाण ४७.८६ टक्के एवढे आहे.

११) आदिवासी शेतकऱ्यांचे शेतीपासूनचे दर एकरी सरासरी वार्षिक उत्पन्न १४९८.६७ रूपये आहे. कृषी उत्पादनाचा दर एकरी सरासरी वार्षिक खर्च ९७४.१३ रूपये एवढा आहे. तर उत्पन्नातून खर्च वजा जाता शेतीपासून मिळालेले दर एकरी निव्वळ वार्षिक उत्पन्न ५२४.५४ रूपये इतके आहे.

१२) दर एकरी कृषी उत्पादकता २.०९ क्विंटल इतकी अल्प असून खते व सुधारित बियाणांच्या वापरास विरोध, जमिनीची धूप, निकृष्ट जमीन, लहान आकाराचे धारणक्षेत्र ही शेतीच्या अल्प उत्पादकतेची कारणे आहेत.

१३) बचत करण्याची क्षमता असलेल्या व बचत केलेल्या कुटुंबांचे प्रमाण १५.२३ टक्के एवढे अल्प आहे. वेगवेगळ्या आदिवासी जमातीतील बचत केलेल्या कुटुंबांचे प्रमाण विचलन ८५.६७ एवढे मोठे असून त्याचा विचलन गुणांक १२८६.३३ आहे.

१४) सर्वेक्षित ४२० कुटुंबांपैकी कर्ज काढलेल्या कुटुंबांचे प्रमाण ८६.१९ टक्के एवढे मोठे आहे. उपभोग, शेती, घरबांधणी, पूरक व्यवसाय, लग्न, आजारपण इ. विविध सहा उद्देशासाठी आदिवासींनी कर्ज काढले असून त्यामध्ये उपभोगासाठी कर्ज काढलेल्या कुटुंबांचे प्रमाण ७६.३२ टक्के एवढे मोठे आहे.

१५) उपभोगाचे कर्ज काढलेल्या ३३९ कुटुंबांनी सन २००३-२००४ या वर्षात ५,८३,००० रूपये एवढे उपभोग कर्ज घेतले असून प्रतिकुटुंब सरासरी उपभोग कर्ज १७२० रूपये इतके आहे. एकूण १३६ आदिवासी कुटुंबांनी १६९५९५०

रूपयांचे बिगर उपभोगाचे कर्ज घेतले असून प्रतिकुटुंब सरासरी बिगर उपभोग कर्ज रूपये १२४७० आहे. सर्वेक्षित ४२० कुटुंबांपैकी ३६२ कुटुंबांनी २२७८९५० रूपयांचे कर्ज काढले असून यामध्ये उत्पादक कर्जाचा वाटा १८.४६ टक्के असून अनुत्पादक कर्जाचा वाटा ८१.५४ टक्के आहे.

१६) सहकारी संस्थांचे सभासद असलेल्या कुटुंबांचे प्रमाण अत्यंत अल्प असून ते ४.२८ टक्के एवढे आहे.

१७) खाजगी व्यापारी किंवा दुकानदार यांच्याकडून होणारी आदिवासींची पिळवणूक नाहीशी करण्यासाठी व आदिवासींच्या सर्वांगिण विकासासाठी सन १९७२ मध्ये सरकारने महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाची स्थापना केली असून महामंडळामार्फत एकाधिकार आणि खावटी कर्ज योजना राबवल्या जातात. एकाधिकार योजनेविषयी आदिवासींच्या प्रमुख तक्रारी म्हणजे (१) महामंडळ खाजगी व्यापाऱ्यांपेक्षा मालास कमी दर देते. (२) महामंडळ व्यापाऱ्यांना माल विकू देत नाही. (३) महामंडळ माल खरेदीचे जे दर जाहीर करते त्यात सतत चढउतार होतात. खरेदीचे दर कालांतराने वाढविले की ज्यांनी अगोदर माल विकलेला असतो त्यांचे नुकसान होते. त्यांना भरपाई मिळत नाही.

१८) महामंडळाचे खावटी कर्जे थकलेल्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाण ९२.६२ टक्के एवढे मोठे आहे. सरकारचे कर्ज विशेषतः खावटी कर्ज बुडविले तरी सरकार आपले काही करू शकत नाही ही बहुसंख्य आदिवासींच्या मनात असलेली भावना आणि सरकारचे कर्ज भरू नका असा जमातीतील काही लोकांकडून होत असलेला अपप्रचार ही प्रमुख कारणे आदिवासींनी खावटी कर्जाची परतफेड न करण्यास जबाबदार आहेत.

१९) बहुसंख्य आदिवासी कुटुंबांच्या घराचा किंवा निवासाचा दर्जा अत्यंत साधा किंवा निकृष्ट आहे. सर्वेक्षित ४२० आदिवासी कुटुंबांपैकी ६८.५८ टक्के कुटुंबांची घरे कौलारू आणि कुडाच्या भिंती असलेली आहेत. १५.८४ टक्के कुटुंबांची घरे साध्या छपराची व कुडाची आहेत. घरात वीजेची सुविधा नसणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण निम्म्यापेक्षा जास्त आहे (५०.२४ टक्के). पिण्याचे व वापराचे पाणी बुडक्यातून आणावे लागणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण ९९.५३ टक्के एवढे आहे. तर ०.४७ टक्के कुटुंबांना पाईपने व बुडक्यापासून पाणी मिळते. पाईप लाईनने मिळणारे पाणी केवळ भांडी धुण्यासाठी किंवा स्नानासाठी वापरले जाते.

२०) सर्वेक्षित ४२० कुटुंबांपैकी केवळ ८७ कुटुंबे (२०.७१ टक्के) सरकारमान्य स्वस्त धान्य दुकानातून माल खरेदी करतात. उर्वरित ३३३ कुटुंबे (७९.२९टक्के) अधूनमधून माल खरेदी करतात. गरीबीमुळे त्यांना नियमित माल खरेदी करता येत नाही.

२१) वर्षातील काही दिवस अन्नाची टंचाई जाणवणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण मोठे असून ते ७५.२४ टक्के एवढे आहे. या कुटुंबांना उपासमारीच्या काळात रोज पाच ते दहा टक्के सुद्धा भात किंवा भाकरी खावयास मिळत नाही. उपासमारीच्या दिवसात आदिवासी जमिनीतील कंद, रानभाज्या, बांबूचे कोंब, करवंदे, आंबे इतर वनस्पती खाऊन उपजीविका करतात. उपासमारीच्या काळात वनस्पती, उंदीर, मेलेल्या जनावरांचे मांस आदिवासींना खावे लागते. त्यामुळे उलट्या,जुलाब, पोटदुखी इत्यादी विकार जडतात.

२२) दरवर्षी उपजीविकेसाठी स्थलांतर कराव्या लागणाऱ्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाण ६४.२८ टक्के एवढे मोठे आहे. भूमिहीनता, कुटुंबांचा मोठा आकार, खर्चिक विवाह पद्धती, उपासमार हे स्थलांतरास जबाबदार असणारे प्रमुख घटक आहेत.

२३) सर्वेक्षित विविध सात जमातीतील ४२० कुटुंबांकडे वेगवेगळ्या २९ प्रकारच्या एकूण १६३०२ घरगुती वस्तू आहेत. त्यांचे एकूण मूल्य १७०७७४० रूपये एवढे असून प्रत्येक आदिवासी कुटुंबांजवळ सरासरी ४०६६ रूपये मूल्याच्या घरगुती वस्तू आहेत. सर्वेक्षित ४२० कुटुंबांपैकी केवळ १४.२८ टक्के कुटुंबांजवळ सुखसोईच्या वस्तू आहेत. ४२० कुटुंबांपैकी १३.८० टक्के कुटुंबांजवळ मनोरंजनाची साधने आहेत. स्वतःच्या मालकीची वाहतूकीची साधने असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण २.६१ टक्के इतके अल्प आहे.

२४) सर्वेक्षित सर्व ४२० आदिवासी कुटुंबांचे सन २००३-२००४ या वर्षातील वार्षिक सरासरी उत्पन्न २४५७० रूपये एवढे आहे. दरडोई वार्षिक सरासरी उत्पन्न ४५०२ रूपये आहे. आदिवासी कुटुंबांचा वार्षिक सरासरी उपभोग खर्च २२९८० रूपये आहे. दरडोई वार्षिक सरासरी खर्च ४१७३ रूपये आहे. सर्वेक्षित सर्व ४२० आदिवासी कुटुंबांमध्ये उत्पन्नापेक्षा उपभोग खर्च जास्त

असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण ८३.५७ टक्के एवढे मोठे आहे.

२५) ज्या कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न २०,००० रूपये किंवा त्यापेक्षा कमी आहे ती कुटुंबे दारिद्रयेरेषेखालील कुटुंबे अशी शासनाची दारिद्र्याची व्याख्या असून या व्याख्येनुसार सर्वेक्षित ४२० कुटुंबांपैकी ४८.८० टक्के कुटुंबे दारिद्रयरेषेखाली आहेत. प्रस्तुत अभ्यासकाने गृहीत धरलेल्या दारिद्र्याच्या उपासमार, स्थलांतर, उपभोग कर्ज इत्यादी विविध १४ निकषानुसार सर्वेक्षित ४२० कुटुंबांपैकी ८०.७२ टक्के कुटुंबे दारिद्रयरेषेखालील आहेत.

२६) अन्नाचा चांगला दर्जा, निवास, पाण्याची सुविधा, वीज सुविधा इत्यादी विविध ११ निकषानुसार राहणीमानाचा दर्जा चांगला असणाऱ्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाण ११.३८ टक्के एवढे अल्प आहे. म्हणजे ८८.६२ टक्के आदिवासी कुटुंबांचा राहणीमानाचा दर्जा निकृष्ट आहे.

२७) दारिद्र्य, कर्जबाजारीपणा, स्थलांतर, उपासमार, बेरोजगारी, मजुरीचे कमी दर आणि राहणीमानाचा निकृष्ट दर्जा इत्यादी आदिवासींच्या प्रमुख आर्थिक समस्या आहेत. व्यसनाधिनता, उच्च-नीचता, निरक्षरता, अंधश्रद्धा, वेठबिगारी, शोषण, फसवणूक आणि भ्रष्टाचार या आदिवासींना भेडसावणाऱ्या प्रमुख सामाजिक समस्या आहेत.

**शिफारशी:**

आदिवासींच्या आर्थिक आणि सामाजिक स्थितीत सुधारणा व्हावी यासाठी प्रस्तुत अभ्यासकाने काही शिफारशी खालीलप्रमाणे सुचविल्या आहेत.

१) आदिवासींसमोरील उपासमारीचा प्रश्न गंभीर असून हा प्रश्न सोडविण्यासाठी शासनाने भूमिहीनांना जमिनीचे वाटप करणे, पुरेसा रोजगार निर्माण करणे इ. उपाय योजले पाहिजेत.

२) बहुसंख्य आदिवासींचा करणी, जादूटोणा इ. अंधश्रद्धांवर मोठा विश्वास आहे. या अंधश्रद्धा नष्ट करण्यासाठी त्यांना सकस व समाजाभिमुख शिक्षण देणे, निरक्षरता व अज्ञानाचे उच्चाटन करणे इ. उपाय योजले पाहिजेत.

३) आदिवासींच्या विकासासाठी असणाऱ्या योजनांची प्रभावीपणे व प्रामाणिकपणे अंमलबजावणी केली पाहिजे.

४) आदिवासी विद्यार्थ्यांची गळती रोखण्यासाठी अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना पेलेल असा तयार करणे, आदिवासी पालकांना शिक्षणाचे महत्व पटवून देणे इ. उपाय योजले पाहिजेत.

५) शासन आणि आदिवासी यांच्यातील दुवा म्हणून भगतांनी काम करावे असे प्रयत्न व्हावयास हवेत. भगत शासनमित्र बनले पाहिजेत.

६) कुपोषण आणि बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी सर्व स्त्रियांची बाळंतपणे दवाखान्यात व्हावीत यासाठी प्रयत्न करणे, दवाखान्यात बालरोग तज्ज्ञांच्या नेमणुका करणे, भगताऐवजी दवाखान्यात बालकांना उपचारासाठी नेण्यास आदिवासींना प्रवृत्त करणे इ. उपाय योजावेत.

७) स्थलांतराचे प्रमाण कमी व्हावे यासाठी दारिद्र्य निर्मुलन कार्यक्रमांची प्रभावीपणे अंमलबाजवणी करणे आवश्यक आहे.

८) शासनाने दुष्काळात कर्ज वसूल करू नये. तसेच खावटी कर्ज बिनव्याजी देण्यात यावे.

९) स्वस्त धान्य दुकानातून आदिवासींना चांगल्या

दर्जाचे धान्य व डाळी पुरवाव्यात.

१०) आदिवासींच्या शेतीची उत्पादकता खूपच कमी आहे. ती वाढविण्यासाठी शेतीत खंताचा वापर करण्यास आणि सुधारित बियाणांचा वापर करण्यास आदिवासींना प्रवृत्त केले पाहिजे.

११) आदिवासींना भेडसावणारा पाणी टंचाईचा प्रश्न सोडविण्यासाठी जास्तीत जास्त तलाव, तळी, बुडके आणि विहिरी निर्माण केल्या पाहिजेत.

१२) दुर्गम भागात रस्ते, वीज, पाणी या सुविधा उपलब्ध करण्याची गरज आहे.

१३) आदिवासींच्या कर्ज वापराकडे लक्ष दिले पाहिजे. आदिवासींनी कर्जाचा दुरुपयोग टाळल्याशिवाय त्यांच्या उत्पन्नात वाढ होणार नाही.

१४) शासन, बँक, शिक्षण संस्था यांनी आदिवासी भाग म्हणजे आपल्या कर्मचाऱ्यांसाठी शिक्षेचे ठिकाण मानू नये. चांगल्या कर्मचाऱ्यांचीच बदली तेथे करावी.

१५) आदिवासी भागात मोठ्या प्रमाणात लहान आकाराच्या कृषी उद्योग संस्था स्थापन कराव्यात. डिंक, हिरडा, बेहडा यावर प्रक्रिया करणाऱ्या संस्था स्थापन झाल्या तर रोजगार, उत्पन्न वाढून आदिवासींमधील कुपोषण, दारिद्र्य इ. चे प्रमाण कमी होईल.

**समारोप:**

अशा प्रकारे आदिवासींच्या आर्थिक आणि सामाजिक उन्नतीसाठी प्रस्तुत अभ्यासकाने वरीलप्रमाणे काही शिफारसी सुचविल्या आहेत. सरकार आदिवासींच्या विकासासाठी शेकडो योजना राबवित आहे तरीही आदिवासींच्या विकासाची गती मंदच आहे. सरकार, सेवाभावी संस्था समाजिक कार्यकर्ते इत्यादींनी आदिवासींच्या विकासासाठी अथक प्रयत्न केल्यास आदिवासींच्या विकासाची गती वाढू शकेल.

(लेखकास डॉ. एम.एन.शिंदे, अर्थशास्त्र विभाग प्रमुख, के.बी.पी. कॉलेज, इस्लामपूर, जि. सांगली यांच्या मार्गदर्शनाखाली मे २००९ मध्ये शिवाजी विद्यापीठाची अर्थशास्त्र विषयातील पीएच्.डी. ही पदवी प्राप्त झाली असून या पदवीसाठी त्यांना 'महाराष्ट्र राज्यातील ठाणे जिल्ह्यातील आदिवासींची आर्थिक सामजिक स्थिती' हा प्रबंध सादर केला आहे. त्या प्रबंधाचा हा सारांश.)

- * -

# अर्थ शब्दांची वाट पाहे

शि. ना. माने, सातारा

**प्रस्तावनाः**

पुढील टिपणात तथाकथिक इन्ट्राप्रेनर या संज्ञेच्या मराठी पर्यायाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. तूर्तास या इन्ट्राप्रेनर व्यक्तीला आपण निगम पुरूष (Corporation Man) या सामान्य नावाने संबोधू. प्रस्तुत संज्ञेत सूचित व्यक्तीच्या विकासाचा मार्ग सरळ रेषेत नाही. उलट, त्या मार्गावर अनेक चढ-उतार टप्पे आहेत. त्यांची संक्षेपात नोंद केल्याशिवाय मराठी पर्यायाचा शोध घेणे योग्य नाही.

**टप्पेः**

(१) मालकी संस्था (Propietary concern): व्यवसायाची सुरूवात मालकी संस्थेपासून झाली. वैयक्तिक मालकी हे तिचे एक वैशिष्ट्य. पूर्वी व्यवसायाचा मालक त्याच्या व्यवसायाचा कप्तान होता. साहस व बेपर्वा हा त्याचा स्वभाव होता. लोकलंड ('Public-be-damned') किंवा लोकाविषयी बेपर्वा ही त्याची प्रवृत्ती होती.

(२) भागीदारी मालकी संस्था(Partnership): हा व्यवसायाचा दुसरा टप्पा होय. मालकी किमान दोन किंवा अधिक व्यक्तींमध्ये विभागली जाते.

(३) उपक्रमी(Entrepreneur): उपक्रमीची वैशिष्ट्ये स्पष्ट करण्यासाठी पुढील दोन व्याख्यांचा उल्लेख करू. (अ) *व्यवसायात वैयक्तिक कौशल्य व नवप्रवर्तनशील दृष्टिकोन यांच्या माध्यमातून उपक्रमाचे यशस्वीपणे व्यवस्थापन व विकास करते अशी व्यक्ती.* जॉन डी.रॉकफेलर, फोर्ड मोटर्सचे हेन्री फोर्ड, आय.बी.एम.चे थॉमस वॅटसन (वरिष्ठ), मायक्रोसॉफ्टचे बिल गेट्स् व ब्रँडेड मीट उत्पादनाचे अग्रणी गस्टावस स्मिथ अशा काही विश्वविख्यात उपक्रमींची आवर्जून नोंद करावयाला हवी. या व्याख्येत कौशल्य व नवप्रवर्तन यांच्यावर विशेष जोर देण्यात आला आहे.

(ब) *संपत्ती व चिरंतन मूल्य यांची निर्मिती करण्याच्या अपेक्षेने स्वतःहून व्यवसायात पडणारे लोक* या व्याख्येत संपत्ती बरोबर चिरंतन मूल्याचा विचार करण्यात आला आहे. भेदक कल्पनाशक्ती, निर्मितीक्षमतेचा स्फुल्लिंग व बाजाराभिमुखता ही उपक्रमीची गुणवैशिष्ट्ये आहेत.

(४) निगम (Corporation): काळानुरूप व्यवसायसंस्थेचा आकार वाढला. व्यवसायाच्या संरचनेत व तंत्रात मूलभूत बदल झाले. नवीन प्रबंधकाची गरज निर्माण झाली. गालब्रेथ यांच्या तंत्र संरचनेतून (Technostructure, 1967) ती गरज पूर्णही झाली. तंत्रसत्ताधाऱ्याचा (Technocrat) उदय झाला. निगम पर्व सुरू झाले. उद्योगाबरोबरच सरकारवर त्याचा राजकीय प्रभाव वाढला. कौशल्य व व्यवस्थापन यांच्या बाबतीत तो स्वयंभू (Self-made) असला तरी तो हार्वर्ड बिजनेस स्कूलच्या पदवीधराइतकाच तज्ज्ञ होता. क्रीस्लरचे ली आयोका व जी.ई.चे जॉन एफ. वेल्श म्हणजे त्याच्या जीवंत आख्यायिका होत. अगदी आजचे सी.एम्.एस्. इन्फो सिस्टिम्सचे राजीव कौल येथे नोंदणी करणे जरूर आहे. कारण आजच्या इन्ट्राप्रेनर या संज्ञेचे ते एक समुचित उदाहरण आहे. कसे ते पाहू.

**इन्ट्राप्रेनरची व्याख्या:** *निगमांतर्गत (Within) अशी व्यक्ती की जिला नवीन वस्तूउत्पादनाचे अवतरण करण्यास व व्यवसायांचा प्रारंभ करण्यास स्वातंत्र्य दिले जाते.*[४] येथे विदिन या शब्दाची लक्षणीयता ध्यानात घेणे जरूर आहे. उपक्रमीच्या तुलनेत ही व्याख्या पुढील सूक्ष्म फरकावर प्रकाश टाकते. इन्ट्राप्रेनर व्यक्ती निगमाची असते. निगम त्या व्यक्तीचे नव्हे. (Intrapeneur is corporation's. Corporation is not his) उलट, निगम उपक्रमीचा असतो. उपक्रमी निगमाचा नव्हे. (Corporation is entrapeneur's. Entrapreneur is not his).

आता परत राजीव कौल यांच्या उदाहरणाकडे वळू. कौल स्वतःला निगम उपक्रमी (Corporate entrapreneur) समजतात. त्यांनी मायक्रोसॉफ्टमध्ये ११ वर्षे काम केले. नंतर ते मायक्रोसॉफ्टच्या भारतीय संस्थेत रुजू झाले. त्या संस्थेचे प्रमुख असताना सीॲटल येथे आशीयायी देशांच्या उदयोन्मुख बाजारांचे संचालक म्हणून धुरा सांभाळली. २००६ मध्ये मध्यम आँकाराच्या ॲक्टिक्स (Actics) खाजगी समभाग उपक्रमात (Private equity firm) रुजू झाले. सहमालक म्हणून स्वतःच्या संस्थेत काम करण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा त्यांना गप्प बसू देईना. अखेर सहभागीदारीत २००१ मध्ये रु.६०० कोटींची सी.एम.एस. इन्फो सिस्टिम्स ही आय.टी. संस्था खरेदी केली. कौल म्हणतात की त्यांच्या नवीन संस्थेत त्यांना पूर्ण जबाबदारी व स्वायत्तता मिळते. ते पुढे म्हणतात की मायक्रोसॉफ्ट मध्ये प्रबंधक/व्यवसायी (Professional) म्हणून ते केवळ एक टोपी परिधान करत (नेमून दिलेले ठराविक एकच काम करत). आता नवीन साहसी उपक्रमात व्यवसायी, मालक, संस्थांतर्गत ग्राहक तसेच संस्थातीत लोक यांच्याप्रति दायित्वधारक (Stakeholder) अशा निरनिराळ्या तीन टोप्या ते परिधान करू लागले.[५] अशा प्रकारे प्रबंधक/व्यवसायी-उपक्रमी-दायित्वधारक यांच्या संकरातून तंत्रसत्ताधारकांच्या एका नव्या पैदासीचा/वाणाचा

(Breed) उदय झाला.

दुसऱ्या शब्दात, एका व्यक्तीत संमिश्रित(Blended) होणाऱ्या मालक/उपक्रमी, प्रबंधक/व्यवसायी व दायित्वधारक यांच्या कार्यभागांतील सीमारेषा काहीशी धूसर (Nebulous) आहे. एकीकडून राजीव कौल यांना मालक म्हणावे तर दुसरीकडून ते व्यवसायीची वस्त्रे परिधान करतात. अशा परिस्थितीत इन्ट्राप्रेनरला प्रतिरूप उपक्रमी किंवा समरूप उपक्रमी हे मराठी पर्याय सुचविले आहेत. एकाच व्यक्तीची रूपे (कार्यभाग) काही प्रमाणात भिन्न आहेत. तसेच ती संपूर्णपणे स्वतंत्र (Separate) नाहीत किंवा एकरूपही नाहीत. सम म्हणजे संपूर्णपणे एक नव्हेत. आणि भिन्न म्हणजे संपूर्ण स्वतंत्र नव्हेत.

**संदर्भ सूचिः**

1 Samuelson P.A., Economics, McGraw- Hill, Kogakusha, Ltd., 1973, P.114.

2 Collins Paperbacl Encyclopedia, Herper Collins, 1998.

3 Knowledge Exchange Business Encyclopedia, 1997.

4 Websters New World College Dictionary, Wiley Dreamtech India (Private) Ltd., New Delhi, 2000.

5 Vijayraghavan Kala and Singh Shelley, 'From Managers to Intrapreneurs', The Economic Times (Special Feature), Aug. 9, 2011.

- * -

## 'अर्थसंवाद' या त्रैमासिकाच्या स्वामित्व व इतर बाबींविषयी निवेदन
## (फॉर्म ४, नियम ८ नुसार)

| | | |
|---|---|---|
| १. प्रकाशन स्थळ | : | मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा/डॉ.अनिल सूर्यवंशी, गोदाई, शिवशक्ती मैदानाजवळ, शिवाजीनगर, बार्शी-४१३ ४११, जिल्हा-सोलापूर. |
| २. नियतकाल | : | त्रैमासिक. |
| ३. मुद्रकाचे नाव | : | डॉ.अनिल सूर्यवंशी |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | गोदाई, शिवशक्ती मैदानाजवळ, शिवाजीनगर, बार्शी-४१३ ४११, जिल्हा-सोलापूर. |
| ४. मुद्रण स्थळ | : | सातपुडा ऑफसेट, एमआयडीसी एरिया, जळगाव |
| ५. प्रकाशकाचे नाव | : | बाब क्र.३ प्रमाणे |
| ६. संपादकाचे नाव | : | डॉ.अविनाश रामलाल निकम |
| ७. राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | मातृपितृ कृपा, प्लॉट नं.३०, परिमल कॉलनी, यशवंत क्लासेसच्या मागे, शहादा-४२५ ४०९, जिल्हा - नंदुरबार. |
| ८. मालकाचे नाव | : | मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा:सेंटर फॉर दी स्टडी ऑफ सोशल चेन्ज, एम्.एन्.रॉय ह्यूमन डेव्हलपमेन्ट कॅम्पस, प्लॉट क्र.६, एफ् ब्लॉक, कार्डिनल ग्रेशियस स्कूल जवळ, सरकारी वसाहत इमारत क्र.३२३ समोर, बांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१. |

मी अनिल सूर्यवंशी असे जाहीर करतो की वर दिलेला तपशील माझ्या माहिती आणि समजुतीनुसार खरा आहे.

**डॉ.अनिल सूर्यवंशी,**
मुद्रक व प्रकाशक

# मराठी अर्थशास्त्र परिषद
# अर्थसंवाद वर्गणीचे नवे दर

नांदेड येथे ८ नोव्हेंबर २०११ रोजी संपन्न झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत एकमताने मंजूर झालेल्या ठरावानुसार अर्थसंवाद त्रैमासिक वर्गणीचे नवीन दर एप्रिल २०१२ पासून पुढीलप्रमाणे राहतील.

**शैक्षणिक संस्था, महाविद्यालये, ग्रंथालये यांच्यासाठी त्रैवार्षिक वर्गणी रु.१०००/-(रुपये एक हजार), पंचवार्षिक वर्गणी रु.१५००/-(रुपये एक हजार पाचशे)**

अर्थसंवाद साठी वार्षिक वर्गणी यापुढे स्विकारली जाणार नाही. केवळ त्रैवार्षिक व पंचवार्षिक वर्गणीच स्विकारली जाईल. एप्रिल २०१२ पासून फक्त नवीन दरानुसारच वर्गणी स्विकारली जाईल, याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

| | |
|---|---|
| **डॉ. अविनाश निकम** | **डॉ. अनिल सूर्यवंशी,** |
| प्रमुख संपादक | कार्यवाह-खजिनदार |

ती

नांदेड एज्युकेशन सोसायटीचे,

# पीपल्स कॉलेज, नांदेड

(स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड संलग्नित व नॅक कडून B+ दर्जा प्राप्त)

**महाविद्यालयाची वैशिष्ट्ये:**

- विद्यापीठ अनुदान आयोगाकडून College with Potential for Excellence दर्जा प्राप्त.
- स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड कडून शहरी भागातील आदर्श महाविद्यालय पुरस्कार (२००९-१०)
- नुकताच महाविद्यालयाने आपला हिरक महोत्सव साजरा केला.
- मराठी, हिन्दी, इंग्रजी, राज्यशास्त्र, इतिहास, अर्थशास्त्र, वाणिज्य, समाजशास्त्र या विषयात संशोधनाची (पीएच्.डी.) सुविधा.
- मराठी, हिन्दी, इंग्रजी व राज्यशास्त्र या विषयात एम.फील.ची सुविधा.
- मराठी, हिन्दी, इंग्रजी, राज्यशास्त्र, इतिहास, अर्थशास्त्र, वाणिज्य या विषयात पदव्युत्तर अभ्यासक्रमाची सुविधा.
- बी.बी.ए., पी.जी.डी.बी.एम. व डी.टी.एल. या व्यावसायिक अभ्यासक्रमाची सुविधा.
- बी.कॉम. व एम.कॉम साठी मराठी आणि इंग्रजी माध्यमाची सुविधा.
- मराठवाड्यातील सर्वात मोठे व सुसज्ज ग्रंथालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर वातानुकूलीत अभ्यासिका.
- नेट-सेट तयारी वर्गाची सुविधा उपलब्ध.
- स्पर्धात्मक परीक्षा तयारी वर्गाची सुविधा.

**डॉ. व्यंकटेश काब्दे**
अध्यक्ष
नांदेड एज्युकेशन सोसायटी,
नांदेड

**डॉ. व्ही.एन. इंगोले**
प्राचार्य
पिपल्स कॉलेज, नांदेड